# आगरकरांचे सांस्कृतिक आणि साहित्यविषयक विचार

प्रा. तानाजी ठोंबरे



MR
891.46
T 368 A

MR
891.46
T368A

INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA

# आगरकरांचे सांस्कृतिक आणि साहित्यविषयक विचार

प्रा. तानाजी ठोंबरे

लोकवाङ्मय गृह

आगरकरांचे सांस्कृतिक आणि साहित्यविषयक विचार / प्रा. तानाजी ठोंबरे
Agarkaranche Sanskrutic Ani Sahityavishayak Vichar
Prof. Tanaji Thombre

Library IIAS, Shimla
MR 891.46 T 368 A
00124282

म / ८७४
© प्रा. तानाजी ठोंबरे
पहिली आवृत्ती (I) : एप्रिल २००५

MR
891.46
T368A
124282
31.3.08

मूल्य : ४० रुपये

ISBN : 81-88284-57-2

मुद्रक/प्रकाशक
प्रकाश विश्वासराव
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५

मुद्रणस्थळ
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई ४०० ०२५

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| | प्रास्ताविक | पाच |
| | कृतज्ञतेचे दोन शब्द | सात |
| १. | देव न मानणारा देवमाणूस | १ |
| २. | आगरकरांचे शिक्षणविषयक विचार | १६ |
| ३. | आगरकरांचे अंधश्रद्धा निर्मूलनाबद्दलचे विचार | २९ |
| ४. | भारतीय कला व तिचा विकास | ४१ |
| ५. | आगरकरांचे व्याकरणविषयक विचार | ४८ |
| ६. | आगरकरांचे साहित्यविषयक विचार | ५७ |
| | गोपाळ गणेश आगरकर यांचा जीवनपट | ७२ |
| | संदर्भ ग्रंथ | ७४ |

# प्रास्ताविक

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत ज्या महापुरुषांनी वैचारिक योगदान दिले आणि समाजाला प्रगतीची नवी वाट दाखवली त्या महापुरुषांच्या विचारांचा परिचय करून देणाऱ्या अनेक पुस्तिका 'लोकवाङ्मय गृहा'ने गेल्या १५ वर्षांत प्रकाशित केल्या आहेत. आमच्या म. फुले, डॉ. आंबेडकर आणि महर्षी वि. रा. शिंदे यांचे जीवनकार्य व विचार समजावून सांगणाऱ्या पुस्तिकांना वाचकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. यातील काही पुस्तिकांच्या तीन तीन आवृत्त्याही प्रकाशित झाल्या आहेत. आता 'लोकवाङ्मय गृह' थोर समाजसुधारक आणि विचारवंत गोपाळ गणेश आगरकर यांच्या विचारांचा परिचय करून देणाऱ्या काही पुस्तिका प्रकाशित करीत आहे. 'आगरकरांचे सांस्कृतिक आणि साहित्यविषयक विचार' ही पुस्तिका प्रा. तानाजी ठोंबरे यांनी लिहिली आहे.

या पुस्तिकेत प्रा. ठोंबरे यांनी आगरकरांच्या संकीर्ण विचारांची मांडणी केली असून त्याचे मूल्यमापनही केले आहे. त्यांनी त्यात शिक्षण, अंधश्रद्धानिर्मूलन, भारतीय कला, व्याकरण व साहित्य या विषयांवर आगरकरांनी जे मर्मग्राही विवेचन केले आहे त्याचा परिचय करून दिला आहे. त्यांच्या मते आगरकरांचे विचारविश्व एकांगी वा एकदेशीय नव्हते तर ज्ञानक्षेत्रातील विविध विषयांबद्दल त्यांच्या मनात आवड होती. भारतीय कला, मराठी भाषेचे व्याकरण व मराठी भाषेतील साहित्यविचार यावर त्यांनी लिखाण केले. साहित्यातील वाङ्मयीन माहात्म्याच्या प्रश्नाबाबत त्यांनी विचार मांडले असून संस्कृतीचा व इतर भाषांतील थोर कलाकृतींचा परिचय करून देण्यासाठी भाषांतर अत्यंत आवश्यक आहे, असे मत व्यक्त केले आहे. प्रा. ठोंबरे यांनी आपल्या शेवटच्या प्रकरणात आगरकरांच्या वाङ्मयीन कार्याचे यथायोग्य असे

मूल्यमापन केले आहे. आगरकरांच्या दुर्लक्षित अशा लिखाणावर प्रकाशझोत टाकून त्याचे आजच्या काळातील महत्त्व प्रा. ठोंबरे यांनी मांडले आहे. आगरकर विचारमालेतील पुस्तिका प्रकाशित करण्यासाठी मुंबईच्या 'आगरकर प्रतिष्ठान'ने आर्थिक सहकार्य केले त्याबद्दल प्रतिष्ठानचे आभार. या मालिकेतील इतर पुस्तकांप्रमाणेच याही पुस्तकाचे वाचक स्वागत करतील, अशी आशा मी व्यक्त करतो.

**अशोक चौसाळकर**

# कृतज्ञतेचे दोन शब्द

आज आपण २१व्या शतकात, एका नव्या सहस्रकात प्रवेश केला. या शतकाचा माहिती-तंत्रज्ञानाचे व त्यांच्या क्रांतीचे शतक म्हणून गौरव केला जात आहे. लवकरच भारत जगातील 'महासत्ता' म्हणून उदयाला येणार असे समाजधुरीणांकडून स्वप्न रंगवले जात आहे. मनाला निराशेने ग्रासून टाकण्याचे कारण नाही. परंतु हा आशावाद, नव्हे स्वप्नरंजन वास्तवात येण्यासारखे आहे काय? आजच्या समाजजीवनाची दुर्दशा पाहता, धर्मांधता व अंधश्रद्धा यांचा वाढता जोर पाहता, आकसत जाणारे व विकृत बनू पाहत असलेले शिक्षणक्षेत्र, स्त्री-शूद्र, दलित-शोषित, आदिवासी यांची अवस्था पाहता स्वातंत्र्य मिळाले, परंतु समाजपरिवर्तन अपेक्षेप्रमाणे घडले नाही, असेच म्हणावे लागेल. परिवर्तनाच्या चळवळीतील एक कार्यकर्ता या नात्याने खऱ्या समाजसुधारणेची गरज मनाला तीव्रतेने बोचते. अशा वेळी आपल्यासारख्या कार्यकर्त्यांना पुन्हा म. फुले, आगरकर, डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे मार्गदर्शन आवश्यक ठरते. या गरजेपोटीच आगरकरांच्या संकीर्ण विचारांचा परामर्श घेण्याचा हा अल्पसा प्रयत्न म्हणजेच या पुस्तिकेचे लेखन होय. माझ्या आजपर्यंतच्या लेखनाला ज्यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभत आले आहे, असे प्रसिद्ध मार्क्सवादी विचारवंत कॉ. ॲड्. गोविंद पानसरे यांचे आभार मानण्याऐवजी मी त्यांच्या ऋणात राहणे अधिक पसंत करीन.

तसेच या पुस्तिकेच्या लेखनात महाराष्ट्रातील एक विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांचे मोलाचे मार्गदर्शन व प्रस्तावना लाभली. बार्शी येथील श्री. शिवाजी महाविद्यालयाच्या 'राज्यशास्त्र विभागा'चे प्रा. टी. एस. मोरे, ग्रंथपाल प्रा. पी. एन. इंगळे, पेण येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्रा. राजेंद्र गोरे, मा. ग्रंथपाल, मुंबईच्या केतकी प्रकाशनाचे

श्री. चंद्रकांत जाधव यांचे सहकार्य लाभले. या पुस्तिकेच्या शेवटी नमूद केलेल्या संदर्भ यादीतील आदरणीय ग्रंथकारांचा मी ऋणी आहे. 'लोकवाङ्मय गृहा'चे प्रकाशक श्री. प्रकाश विश्वासराव व त्यांचे सर्व सहकारी यांच्यामुळे ही पुस्तिका प्रकाशित करता आली. आणखी एक कृतज्ञतेचा उल्लेख, माझी पत्नी सौ. लता हिच्या सहकार्यामुळे व तगाद्यामुळे विलंबाने का होईना पुस्तिका लिहून झाली. या सर्वांचे अंत:करणपूर्वक आभार!

अर्थात, उणिवांची जबाबदारी माझी!

**प्रा. तानाजी ठोंबरे**
'लताकुंज', शिवाजीनगर, बार्शी

# १. देव न मानणारा देवमाणूस

इ.स. १८१८मध्ये पेशवाईचा शेवट झाला. म्हणजे शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या मराठी राज्याचा शेवट होय. शिवाजी महाराजांच्या पूर्वीही अनेक राजे येथे राज्य करीत होते. त्यांपैकी बरेच परकीय देशांतून आले होते. इंग्रज आपल्या देशात येण्यापूर्वी मुसलमान राज्यकर्त्यांनी कमी-अधिक प्रदेशांवर सात शतके राज्य केले. एव्हढेच नव्हे तर डच-पोर्तुगिजांनीही काही काळ राज्य केले. परंतु पेशवाईनंतर आलेल्या इंग्रजांच्या रूपाने एका नव्या राज्यव्यवस्थेचा प्रारंभ झाला. पेशवाई गेली आणि इंग्रजी अंमल सुरू झाला. म्हणजे एकाच्या जागी दुसरा आला, असा वरवरच्या स्वरूपाचा हा सत्ताबदल नव्हता. इंग्रजांनी आपली सत्ता स्थिर व बळकट करण्यासाठी जे उपाय योजले ते मूलत: नवे होते. आपल्या समाजाला ते सर्वस्वी अपरिचित होते. त्यांच्या शासनव्यवस्थेची घडी इतरांपेक्षा पूर्णपणे वेगळी होती. मुसलमानांनी आक्रमण केले, धर्मांतरे घडवून आणली, काही वेळा जाचक कर बसवले, परंतु मुख्यत: सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रांत त्यांना बदल घडवून आणता आला नाही. ती त्यांची दृष्टी नव्हती. येथील राजे-रजवाड्यांना अंकित करून जुन्या मार्गानेच ते आपली शासनव्यवस्था चालवीत होते. त्यामुळे शेकडो वर्षे शिक्षण आणि समाज यांची ताटातूट झाली होती. जीवनाच्या सर्वच अंगांवर धर्मश्रद्धेचा जबरदस्त पगडा होता. जनसामान्यांची लूट राजेशाही व सरंजामशाही तर करीत होतीच पण धर्माच्या आधाराने लादलेली चार्तुवर्ण्यव्यवस्था देव-धर्मनिर्मित व म्हणूनच अपरिवर्तनीय मानली जात होती. वेदप्रामाण्य, व्रतवैकल्ये, ऐहिक जीवनाविषयी उदासीनता, सामाजिक जीवनात कमालीची विषमता, स्त्री-शूद्रांना पशूपेक्षाही हीन लेखण्याची वृत्ती अशा सर्व अनिष्ट गोष्टींचा गदारोळ माजला होता.

या सर्वांचा परिणाम समाजजीवनावर होणे अपरिहार्य होते. आपल्या सभोवताली काय स्थिती आहे? इतर मानव समाजांच्या जीवनात काय काय परिवर्तन घडून येत आहे? फ्रेंच राज्यक्रांतीसारख्या प्रयत्नांनी सामाजिक जीवनात कोणती मूल्ये जन्माला घातली आहेत? दबले, दडपले गेलेले समाजगट इतरत्र आपल्या हक्कांसाठी कशा प्रकारची क्रांतिकारक वाटचाल करीत आहेत? विज्ञान-तंत्रज्ञान यांच्यामुळे मानवी जीवनात सुखकारक बदल कसे घडून येत आहेत? यांपैकी कशाचीही पर्वा आपल्या समाजाला नव्हती. एखाद्या अंधाऱ्या गुहेत बंदिस्त केल्याप्रमाणे आपला समाज जगत होता. हा अंधार दूर करण्याच्या उदात्त हेतूने इंग्रज आपल्या देशात आले नव्हते. परंतु या खंडप्राय देशावर आपली शासकीय यंत्रणा चालवण्यासाठी हा अंधार काही प्रमाणात का होईना दूर करणे त्यांना गरजेचे होते.

इंग्रजांच्या आगमनाबरोबर अगदी २-३ दशकांतच आपल्या आणि त्यांच्या संस्कृती-संघर्षाची बीजे रोवली गेली. कारण त्यांच्या शासनव्यवस्थेबरोबर इंग्रजी शिक्षणपद्धतीने या देशात प्रवेश केला. त्यामागून धिम्या पावलाने विज्ञान आले. दळणवळणाची नवी साधने आली. परिणामतः अलग पडलेल्या ग्रामीण जीवनात हालचाल सुरू झाली. ग्रामीण जीवनाचे साचलेपण अंशतः का होईना कमी होऊ लागले. या सर्वांमुळे नव्या विचारांचे वारे देशात वाहू लागले. व्यापार-धंद्यांना व आर्थिक उलाढालीला चालना मिळाली. परंपरेने दीर्घ काळ चालत आलेल्या हस्तव्यवसायांची जागा घेण्यासाठी यांत्रिकीकरण हळूहळू पुढे सरसावू लागले. समाजातील वरच्या स्तराला शास्त्रीय ज्ञानाची, विज्ञानाची, पाश्चात्त्य संस्कृतीची, नव्या शिक्षणपद्धतीची ओळख वाढू लागली.

आपल्या समाजजीवनात होत असलेला हा बदल जुनाट धर्मविचारांना, भावनांना धक्का देणारा ठरू लागला. नवे शिक्षण घेणाऱ्यांपैकी काहींना नव्या जाणिवा लाभल्या. त्यांच्या लक्षात येऊ लागले की, येथील जातिभेदाची पद्धत अमानवी आहे. समाज धार्मिक कर्मकांडात बुडाला आहे. परिणामी इतिहास-भूगोलाचे आपले ज्ञान जुनाट आहे. त्यामुळे समाज मागासलेला आहे. जीवनाचा प्रवाह चैतन्य व गती हरवून बसलेला आहे. हे सर्व थांबले पाहिजे. अज्ञान, कर्मकांड, जुलूम यांच्या बेड्या तोडल्या पाहिजेत. त्यासाठी समाजाला नव्या विचारांची, नव्या जीवनपद्धतीची ओळख झाली पाहिजे. यांचा व्यापक प्रमाणावर स्वीकार झाला पाहिजे. या सर्वांचे भान काहींना आले. कारण त्यांनी नवी विद्या घेतली होती. त्यात आगरकर होते.

१४ जुलै १८५६ रोजी टेंभू या लहानशा खेड्यात आगरकरांचा जन्म झाला. टेंभू हे खेडे कृष्णा नदीच्या काठावर कऱ्हाडपासून तीन मैलांच्या अंतरावर आहे. आगरकरांच्या जन्मापूर्वी त्यांचे घराणे सुखी-समृद्ध होते. परंतु आगरकरांच्या जन्मापर्यंत या घराण्याला एका सामान्य गरीब ब्राह्मण घराची स्थिती प्राप्त झाली. त्यांच्या आईचे नाव सरस्वती होते. घरच्या अत्यंत गरिबीमुळे आगरकरांना अगदी बालवयातच आपल्या आजोळी कऱ्हाडला आश्रय घ्यावा लागला. येथेच त्यांच्या शिक्षणाला सुरुवात झाली. कृष्णा नदीत मनमुराद पोहावे, मित्रांबरोबर खेळावे व मिळेल ते वाचावे अशी आयुष्याची सुरुवात झाली. इयत्ता तिसरीपर्यंतचे शिक्षण कऱ्हाडला झाले आणि त्यांच्यापुढे प्रश्न उभा झाला. कारण इंग्रजी तिसऱ्या इयत्तेपर्यंतच्याच शिक्षणाची तेथे सोय होती. पुढील शिक्षणाची उत्कट इच्छा आगरकरांना दडपून टाकावी लागली. गरिबीमुळे काही काळ त्यांना माघार घ्यावी लागली. वयाच्या बाराव्या वर्षी मोठ्या जड अंत:करणाने मामलेदार कचेरीत उमेदवारी करावी लागली. त्यात त्यांचे मन रमले नाही व रमणे शक्यही नव्हते. मोठ्या आशेने ते कऱ्हाड सोडून आपल्या नातलगांकडे रत्नागिरीला गेले. त्यांनी पुन्हा एकदा आपल्या शिक्षणाला सुरुवात केली. वार लावून व माधुकरी मागून ते शिकू लागले. पण येथेही त्यांच्या वाट्याला निराशा आली. अनेक अडचणींमुळे शिकणे बंद पडले. पुन्हा कऱ्हाडला परतावे लागले. काही काळ आपल्या मनाविरुद्ध त्यांनी दवाखान्यात कम्पॉउंडरची नोकरी केली. आशेचा किरण दिसला. आयुष्याला कलाटणी देणारी संधी चालून आली. मामीला सोबत म्हणून ते अकोल्याला गेले. येथेच त्यांच्या शिक्षणाची गाडी रुळाला लागली. श्री. विष्णू महाजनी यांच्यासारख्या विद्वान, जातिवंत शिक्षकाच्या मार्गदर्शनाची संधी त्यांना मिळाली. आपण शिक्षणक्षेत्रात अधिकाधिक पुढे जाऊ शकतो, नव्हे आपल्याला पुढे गेलेच पाहिजे अशी महत्त्वाकांक्षा त्यांच्यात निर्माण झाली. १८७५ मध्ये आगरकर मॅट्रिक परीक्षा पास झाले. मन कॉलेज-शिक्षणाकडे धाव घेत होते, तर आर्थिक अडचणी मार्गात उभ्या होत्या. इच्छाशक्तीने परिस्थितीवर मात केली. शाळेतील शिक्षकांनी साठ रुपये गोळा करून आगरकरांच्या हातात दिले. तेवढ्या तुटपुंज्या शिदोरीवर आगरकर शिक्षणासाठी पुण्यात दाखल झाले. डेक्कन कॉलेजात त्यांनी प्रवेश घेतला. वर्तमानपत्रांत लेख लिहून, स्पर्धेत बक्षिसे मिळवून गरिबीशी ते झुंज देत होते. अत्यंत काटकसरीत राहूनही त्यांनी आपले मन मजबूत ठेवले. प्राध्यापकांची भाषणे, थोर ग्रंथकारांचे ग्रंथ हा त्यांचा आधार व आनंद होता. विनोदी, स्पष्टवक्ते, वादविवादात आग्रही

अशी त्यांची महाविद्यालयात प्रसिद्धी होती. त्यांचा वैचारिक पिंड मिल, स्पेन्सर, गिबन, रुसो, व्हॉलतेर, दिदेरो यांच्यासारख्या महान तत्त्ववेत्त्यांच्या व विचारवंतांच्या ग्रंथांवर पोसला गेला. पुढील आयुष्यात त्यांनी जे प्रबोधनाचे अपूर्व कार्य उभे केले त्यामध्ये या विचारवंतांच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. कुशाग्र बुद्धिमत्ता व प्रखर ध्येयवाद या समान गुणवैशिष्ट्यांमुळे त्यांची लोकमान्य टिळकांशी मैत्री जमली. आपला देश पारतंत्र्यात आहे याची टोचणी या दोन्ही तरुणांना अस्वस्थ करीत होती. त्यामुळेच या दोघांनीही उच्च शिक्षण आत्मसात करून देशाच्या सेवेसाठी आपले आयुष्य खर्च करायचे असा निश्चय केला. अखेर त्यांनी अभंग इच्छाशक्तीने, अमाप कष्टाने व सहनशीलतेने शिक्षणाच्या आड येऊ पाहणाऱ्या गरिबीचा पराभव केला. आगरकरांनी पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. या शिक्षणावर त्यांना आरामशीर जीवन जगण्याएवढी नोकरी त्या काळी सहज मिळू शकत होती. परंतु आगरकरांसारखा ध्येयवादी, सुधारक या मळलेल्या वाटेने जाण्यासाठी जन्माला आला नव्हता. आपल्याबरोबर आईचेही गरिबीने हाल केले होते, याची त्यांना जाणीव होती. आईबद्दल नितांत श्रद्धा बाळगून त्यांनी पत्राद्वारे आपला भावी प्रवास आईला स्पष्टपणे पुढील शब्दांत कळवला. एखाद्या अभिमानास्पद शिलालेखासारखे ते शब्द होते. ते म्हणतात, "आपल्या मुलाच्या मोठाल्या परीक्षा होत आहेत, आता त्याला मोठ्या पगाराची चाकरी लाभेल व आपले पांग फिटतील, असे मोठाले मनोरथ, आई, तू करीत असशील. पण मी आताच तुला सांगून टाकतो की, विशेष संपत्तीची, विशेष सुखाची हांव न धरता मी फक्त पोटापुरत्या पैशावर संतोष मानून सर्व वेळ परहितार्थ खर्च करणार आहे."

देशसेवेचे ध्येय आगरकर-टिळकांनी निश्चित केले. ध्येय ठरले होते परंतु त्याच्या सिद्धीचा मार्ग अद्याप ठरलेला नव्हता. न्यायमूर्ती रानडे यांचे देशाला नव्या विचारांकडे घेऊन जाणाऱ्या प्रयत्नाकडे या दोन तरुणांचे लक्ष होते. न्यायमूर्ती रानडे यांच्याबद्दल त्या दोघांना आदरही वाटत होता. त्यांच्या लढाऊवृत्तीला न्यायमूर्तींप्रमाणे शासकीय सेवेचे माध्यम मानवण्यासारखे नव्हते. या क्षेत्रात इतर काही जण ज्या मार्गाने प्रवास करतात त्यांचे अनुकरण करणे आगरकरांना मान्य नव्हते. आपल्या बुद्धीला पटणारा मार्गच आपण शोधला पाहिजे, याबाबत आगरकर सावध होते. लोकमान्यांसारख्या काहींना 'राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यावर आपला समाज सुधारेल', असा विश्वास वाटत होता. समाज सुधारल्याशिवाय राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीला खरा अर्थ प्राप्त

होणार नाही, अशी आगरकरांची स्पष्ट भूमिका होती. मात्र या दोघांत विचारांच्या पातळीवर एक महत्त्वपूर्ण समान दुवा होता. तो म्हणजे चळवळ सामाजिक असो की, राजकीय असो तिला शिक्षणाचा आधार असणे गरजेचे आहे. देशसेवा शिक्षणप्रसाराच्या माध्यमातून करता येऊ शकते, याबद्दल या दोन ध्येयवाद्यांचे एकमत झाले. शिक्षणाच्या प्रचारासाठी, विचारांच्या जागरणासाठी टिळक, आगरकर, चिपळूणकर एकत्र आले. त्यांनी १८७९मध्ये पुण्यात न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. आगरकरांना त्याच वर्षी सीनिअर फेलोशिप मिळाली. त्यामुळे एम.ए.ची पदवी संपादन करून १८८०मध्ये आपल्या सहकाऱ्यांबरोबर न्यू इंग्लिश स्कूलमध्ये अध्यापनाला सुरुवात केली. या सर्वांच्या अविरत कष्टांमुळे अल्पावधीतच ही शाळा लोकप्रिय झाली. आगरकर व त्यांच्या सहकाऱ्यांच्या महत्त्वाकांक्षा वाढल्या. शिक्षण घेणाऱ्या वयातील विद्यार्थ्यांची सोय शाळा काढून झाली. त्याबरोबरच सामान्य जनतेच्या शिक्षणाची सोय करण्याची तीव्र गरज त्यांना भासू लागली. त्यासाठीच १८८१मध्ये लोकशिक्षणाचे साधन म्हणून त्यांनी 'केसरी' व 'मराठा' ही दोन वृत्तपत्रे सुरू केली. आगरकर हे 'केसरी'चे पहिले संपादक होते. पहिली सात वर्षे आगरकरांनी 'केसरी'चे संपादन केले. या धडपड्या तरुणांनी आश्चर्यकारक असा कामाचा पल्ला गाठला होता. परंतु तेवढ्यावर त्यांचे समाधान झाले नाही. आपल्या विद्यार्थ्यांनाही उच्च शिक्षणाची संधी मिळावी, म्हणून १८८५मध्ये पुणे येथे त्यांनी 'फर्ग्युसन कॉलेज'ची सुरुवात केली. लहान वयात शिक्षणासाठी ज्यांना माधुकरी मागावी लागली ते गोपाळ गणेश आगरकर या कॉलेजचे प्राचार्य झाले. आगरकर इतिहास व तर्कशास्त्र या विषयांचे अध्यापन करीत. अध्यापनाची जबाबदारी चोखपणे पार पाडीत असतानाच 'केसरी'च्या संपादनाची जबाबदारीही तेवढ्याच समर्थपणे ते पेलत होते. लोकमान्यांच्या नेतृत्वाखाली 'मराठा' चालू होता. वामनराव आपटे अध्यापनात सहभागी झाले. माहितीपूर्ण लेख, आकर्षक शैली व चुरचुरीत टीका यामुळे आगरकरांच्या 'केसरी'चा प्रभाव थोड्याच दिवसात महाराष्ट्रात जाणवू लागला.

वर एके ठिकाणी उल्लेख केल्याप्रमाणे टिळक व आगरकर या ध्येयवादी व देशभक्त तरुणांनी आपला शिक्षणाचा काळ संपत असताना अत्यंत गांभीर्याने, विचारपूर्वक व निश्चयपूर्वक आपल्या भावी कार्याचा निर्णय घेतला. केवळ व्यक्तिगत सुखासाठी नोकरी करायची नाही व तिच्या चाकोरीत अडकून आपल्या निर्णयापासून दूर जायचे नाही, देशसेवा करायची, शिक्षणाचा प्रसार

करायचा, नव्या विचारांचे जागरण करायचे, नवी शिक्षणपद्धती आपल्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यायची, त्याबरोबर जनसामान्यांस परिवर्तनात सहभागी करून घेण्यासाठी, त्यांच्या शिक्षणासाठी, प्रबोधनासाठी वृत्तपत्रे काढायची या सर्व योजना टिळक-आगरकर या मित्रांनी एकदिलाने आखल्या होत्या. डेक्कन कॉलेजात असताना या दोघा मित्रांनी रात्रीच्या रात्री आपल्या कार्याच्या विचारांसाठी घालवल्या होत्या. त्या दिशेने शाळा, कॉलेज, वृत्तपत्रे या योजना प्रत्यक्ष कृतीत उतरल्या होत्या. पण लवकरच या दोघा मित्रांना एका गंभीर घटनेला सामोरे जावे लागले. 'केसरी'तील लेखाबद्दल टिळक व आगरकर यांच्यावर कोल्हापूर संस्थानचे कारभारी श्री. बरवे यांनीच फिर्याद केली. न्यायालयात खटला चालू झाला, निकाल लागला. या दोन तरुण संपादकांना तीन महिन्यांची शिक्षा झाली. दोघांची रवानगी डोंगरीच्या तुरुंगात करण्यात आली. या खटल्याचे व कारावासाचे वर्णन करणारे 'डोंगरीच्या तुरुंगातील आमचे १०१ दिवस' हे पुस्तक आगरकरांनी लिहिले. तुरुंग माणसांना विचार करण्यास निवांतपणा देतो. आगरकरही निवांतपणे विचार करू लागले. या तुरुंगवासाने त्यांना अधिक वास्तववादी बनवले. त्यांच्या लक्षात आले की, आपले देशसेवेबद्दल एकमत आहे. त्यासाठी आपण प्रामाणिकपणे प्रयत्नही करीत आहोत. परंतु आपल्या व टिळकांच्या स्वभावात एकसारखेपणा नाही. एवढेच नव्हे तर त्यांच्यात आणि आपल्यात मतभेद आहेत. आपला उद्दिष्टाकडे जाण्याचा मार्ग एक नाही. आपला मार्ग वेगळा आहे, आपण आपल्या विचारानेच चालले पाहिजे, त्याच्याशी आपल्याला प्रतारणा करता येणार नाही. यामुळेच या तुरुंगवासात चर्चेच्या ओघात, दोघांत वादविवाद होत. दोघेही आपापल्या मार्गाचे ठामपणे समर्थन करीत. समन्वयाचा दृष्टिकोन आता फार काळ टिकवता येणार नाही, याची आगरकरांना खात्री पटली.

मनात धुमसत असणारा वाद आणि मतभेद उघड झाले. त्याला निमित्त घडले बालविवाह प्रतिबंधक कायद्याचे. १८८४मध्ये असा कायदा असावा की नसावा, या चर्चेचे वादळ उठले. आगरकरांनी आपल्या विचारसरणीप्रमाणे या कायद्याची सामाजिक गरज समर्थ व जोरदारपणे मांडली. लोकमान्यांनीही त्यांच्या भूमिकेप्रमाणे, "सरकारने सामाजिक बाबतीत ढवळाढवळ करू नये" असा पवित्रा घेत आगरकांच्या विरोधी भूमिका घेतली. दोघेही आग्रही स्वभावाचे व आपल्या विचारांना मुरड न घालणारे. परिणाम स्पष्ट होता. दोघे एकमेकांपासून दूर जाऊ लागले. त्यात होळकर ग्रँट प्रकरणाने भर घातली.

अखेर टिळकांनी 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' व 'फर्ग्युसन कॉलेज' या संस्थांचा राजीनामा दिला. साहजिकच आगरकरांना 'केसरी' सोडावा लागला. 'केसरी' सोडल्यामुळे आगरकर वृत्तपत्रसृष्टीतून दूर गेले नाहीत. केवळ संधी मिळाली किंवा कामांची वाटणी ठरली म्हणून आगरकर 'केसरी'चे संपादक बनले नव्हते. त्यांनी सात वर्षे 'केसरी'चे संपादन केले. या सात वर्षांत आपल्याला ध्येयपूर्तीकडे जायचे आहे, त्यासाठी वृत्तपत्र हे एक प्रभावी आणि आवश्यक साधन आहे, याची आगरकरांना खात्री पटली होती. वृत्तपत्रातूनच आपण लोकशिक्षण व प्रबोधनाच्या चळवळीचे काम अधिक चांगले करू शकतो, हे त्यांना जाणवले. त्याचप्रमाणे त्यांच्या ठिकाणी असलेली लेखनाची उत्कट इच्छा त्यांना स्वस्थ बसू देणेही शक्य नव्हते. त्यामुळेच सामाजिक सुधारणांच्या विचारांचा घनघोर संग्राम मांडणारे 'सुधारक' हे साप्ताहिक आगरकरांनी १८८८मध्ये सुरू केले.

टिळक-आगरकरांच्या मतभेदांची चर्चा अनेक विद्वानांचा लेखनविषय बनली आहे. हा केवळ दोन व्यक्तींमधील वाद नव्हता. देश ज्या स्थितीत होता, त्यातून त्याला बाहेर काढून उज्ज्वल भवितव्याकडे त्याची वाटचाल कशी होऊ शकेल, या संबंधांतील हे दोन विचारप्रवाह होते. राजकीय स्वातंत्र्याची चळवळ कशी व्यापक बनली पाहिजे, त्यासाठी आपण मतभेदांच्या सामाजिक गोष्टी बाजूला ठेवल्या पाहिजेत, या टिळकांच्या भूमिकेचा गाजावाजा होणे साहजिकच आहे. त्या काळी राजकीय स्वातंत्र्याची भूमिका मांडणाऱ्यांना लोकप्रियता मिळणे, हेसुद्धा तितकेच स्वाभाविक होते. परंतु सामाजिक सुधारणेची मशाल हाती घेणाऱ्यांना लोकनिंदेला, हेटाळणीला व छळवादाला सामोरे जावे लागते. त्यातही हे सर्व आपल्या लोकांकडूनच केले जात असते, परक्यांकडून नव्हे. परकीयांविरुद्ध उभे राहणाऱ्याला सहानुभूती मिळते, स्वकीयांविरुद्ध लढणाऱ्यांचा हेतू लक्षात घेतला जात नाही. टिळक-आगरकर व त्यांचे सहकारी एका ठरावीक धोरणांच्या आधारे काम करीत होते. त्याला अनुसरूनच आगरकर 'केसरी' चालवीत होते. याचा अर्थ असा नाही की, उघडपणे विचार-विवेकाची गळचेपी करणाऱ्या जुनाट धर्मविषयांपुढे त्यांनी मान तुकवली. या संदर्भात महाराष्ट्रातील श्रेष्ठ विचारवंत श्री. य. दि. फडके म्हणतात, "धर्मविषयक वादविवादाच्या भरीस न पडण्याचे सर्वसाधारण धोरण असले तरी समाजात प्रचलित असलेल्या अनेक दुष्ट रूढींवर किंवा वेडगळ चालीरीतींवर लिहिताना धर्मविषयक अज्ञानाची किंवा समजुतीची दखल घ्यावीच लागे. उदाहरणार्थ, नहाण आलेल्या मुलीची मिरवणूक काढण्याचा त्या काळी

पुण्यात प्रघात होता. या रिवाजावर टीका करणारे 'न्हाणवळी' या शीर्षकाचे लेख केसरीच्या १८८३ मधील चार अंकांत आले आहेत. ...सरतेशेवटी वाचकांस आमचे (आगरकरांचे) आणखी एकवार सांगणे आहे की, उगाच धर्माची उठाठेव करून लोकांची मने दुखविण्याचा केसरीचा इरादा नाही. ब्राह्मोसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज वगैरे भानगडीत मी आपण होऊन पडणार नाही. तथापि, व्यवहारावर लिहिणे आपले कर्तव्य आहे, असे त्यास वाटते म्हणून जेव्हा एखादी चाल निरर्थक व ग्राम्य असून तिचा अज्ञानाने धर्माशी संबंध जोडला जातो, तेव्हा त्यातील बिंग बाहेर काढण्यास मी कधीही मागे-पुढे पाहणार नाही. मग तेवढ्याकरिता धर्मावर लिहावयास लागले तरी हरकत नाही.''

'आधी राजकीय सुधारणा की सामाजिक सुधारणा?' या टिळक-आगरकरांमधील मतभेदाने व वादाने पुढे अत्यंत आक्रमक असे रूप धारण केले. दोन्ही पक्ष एकमेकांवर अक्षरशः तुटून पडले. शब्दांच्या फटकाऱ्यांनी एकमेकांना जखमी केले. ही दोन थोर माणसे या वादात कधी कधी मर्यादा विसरून एकमेकांच्या व्यक्तिगत पातळीवर घसरली. त्यामुळे काहींचा असा समज झाला किंवा आजही आहे की टिळक लोकांची मने वळवून सुधारणा कराव्यात या मताचे होते. मात्र आगरकर लोकांची मने अकारण दुखवत होते. तसेच आगरकरांना 'स्वराज्या'बद्दल काही ममत्व नव्हते. या दोन ठळक समजुतींसंदर्भात य. दि. फडके यांनी 'शोध : बाळ-गोपाळांचा' या आपल्या चिकित्सक ग्रंथात नोंदवला. पुढील अभिप्राय अधिक प्रकाश टाकणारा आहे. ''लोकांचे मन वळवून सुधारणा करण्याचा आपला सारखा प्रयत्न चालला आहे. असे टिळक म्हणत असले तरी एक मद्यपान बंदीचा प्रश्न सोडला तर दुसरी कोणतीही सुधारणा घडवून आणण्यासंबंधी टिळकांनी सक्रिय पुढाकार घेतल्याचे दिसून येत नाही. मद्यपानबंदीचा प्रश्न धसाला लावणे, हे त्यांच्या भारतीय परंपराअभिमानाच्या विरुद्ध नव्हते. कारण शेकडो वर्षे भारतीय लोक मद्यपान करीत असले तरी मद्यपान हे शिष्टसंमत गणले जात नव्हते.''

''आगरकर हे पक्के स्वराज्यवादी होते. ...अगदी पहिल्या वर्षी राजकीय विषयांवर 'केसरी'त आलेले लेखदेखील आगरकरांच्या जहाल राजकीय मतांची साक्ष देण्यास पुरेसे आहेत. रशियाच्या झारवर प्राणघातक हल्ला झाल्यानंतर 'केसरी'त आलेल्या पहिल्या स्फुट सूचनेचे शीर्षकच बोलके होते. 'जुलमी राजांनो सांभाळून असा!' 'केसरी'कर्त्याने लिहिले होते, ''गेल्या रविवारी

रशियन बादशहावर जो प्रसंग गुदरला त्यावरून सर्व जुलमी राजांना बेताबेतानेच वागण्याविषयी सक्त ताकीद मिळाली आहे. 'लोकांचे हक्क चिखलाप्रमाणे पायी तुडविणाऱ्यांनी' या प्रसंगापासून चांगला बोध घ्यावा.''

१८८८ पासून आगरकर 'सुधारका'च्या संपादनात अक्षरशः बुडाले. या साप्ताहिकाच्या कामात श्री. गोपाळ कृष्ण गोखले यांनी साथ दिली. 'सुधारका'चे संपादनही आगरकरांनी सात वर्षे मोठ्या ताकदीने केले. त्या वेळी 'केसरी' जसा लोकप्रिय झाला होता तसाच 'सुधारका'नेही थोड्याच काळात आपला दबदबा निर्माण केला. या साप्ताहिकामुळे आगरकरांना आपल्या विचारांना बंधन घालण्याचे कारण उरले नाही. त्यांची लेखणी एखाद्या महानदीच्या प्रवाहाप्रमाणे प्रचंड वेगाने धावत राहिली. आगरकरांच्या लेखणीला अस्त्राचे रूप आले. त्यांच्या लेखणीची धार 'सुधारका'मधील दर लेखात वाढत गेली. टिळकांचा 'केसरी' आणि आगरकरांचा 'सुधारक' हे दोन पक्ष समोरासमोर उभे ठाकले. दोन योद्धे एकमेकाला पुऱ्या शक्तिनिशी भिडावेत, तसे आगरकर-टिळक एकमेकांवर लेखणीचे वार करू लागले. त्यामुळे आता केवळ मतभेद राहिले नाहीत तर काही वेळा वैराचे दर्शन घडले. दोघांतील कटुता वाढतच गेली.

'सुधारक' साप्ताहिक आपण कशासाठी काढत आहोत, या संबंधांत आगरकरांनी आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांच्या मते केवळ राजकीय प्रश्नांचा विचार करून चालणार नाही. प्रथम आपल्या समाजातील दुष्ट रूढी, परंपराप्रियता, अज्ञान, दैववाद, जातिभेद, अंधश्रद्धा, स्त्रीचा छळवाद, शिक्षण यांसारख्या सामाजिक प्रश्नांची जाहीर चर्चा आवश्यक आहे. आगरकरांनी या प्रश्नांची चर्चा ज्या काळात निर्भयपणे सुरू केली, त्या काळचा महाराष्ट्र जुन्या मतांना चिकटून राहणारा; रूढी, परंपरा, वेद, धर्मग्रंथ यांचे प्रामाण्य मानणारा; देव-देवतांचा पसारा मांडून बसलेला होता. तो समाज आपल्या वास्तव जीवनाकडे पाठ फिरवून बसला होता. पण त्याच वेळी तो पारलौकिक जीवनाची काळजी घेण्यात धन्यता मानत होता. इंग्रजांच्या आगमनामुळे नव्या विद्या, नवी भाषा, नवे विज्ञान यांचे आगमन येथे झाले होते. या सर्वांचा प्रभाव आपली सामाजिक, आर्थिक अवस्था किती हीन दर्जाची आहे हे स्पष्ट करणारा होता. एखादा प्रखर प्रकाशझोत डोळ्यांवर पडल्यानंतर जी अवस्था होते, तशीच स्थिती आपल्या समाजाची झाली होती. असे असूनही डोळे उघडत नव्हते. आगरकरांना या समाजाला जागे करायचे होते. साहजिकच मनोरंजनाचे एक साधन, मूठभरांच्या प्रश्नांची चविष्ट चर्चा, धर्माभिमानाचा

आव आणून पुराणांचा चिखल चिवडीत बसायचे नव्हते. त्यांच्या 'सुधारका'ला हे मान्य होण्यासारखे नव्हते. कारण आगरकर हे अव्वल दर्जाचे प्रबोधनकार होते. आपल्या विवेकाला अनुसरून 'इष्ट वाटेल ते लिहिणारच' अशी त्यांची प्रतिज्ञा होती. समाजजीवनाच्या मंदिरातील जुनाट, निर्जीव मूल्यांवर त्यांनी प्रहार सुरू केले. या लेखांचा संग्रह आज आपल्यापुढे निबंधसंग्रह भाग १,२ व ३ या स्वरूपात आहे. या निबंधांमधून आगरकरांनी जीवनाच्या विविध अंगांचा परामर्श घेतला आहे. या लेखनाला तत्त्वज्ञानाचा, तर्काचा, विवेक व वैज्ञानिकतेचा भक्कम आधार आहे. आपल्या लेखनाद्वारे त्यांना लोकांच्या डोळ्यांवरची झापड नाहीशी करायची होती. लोकांना जागे करून, त्यांचा विश्वास संपादन करून, या देशाच्या उज्ज्वल भवितव्यात त्यांना सहभागी करून घ्यायचे होते. त्यामुळे ते लोकांचे दोष दाखवीत असले तरी अकारण कटुता निर्माण होणार नाही याची काळजी घेत. आगरकर प्रखर बुद्धिवादी होते. तरीही केवळ बौद्धिक जीवनच सत्य व श्रेष्ठ आहे असा अहंकार त्यांनी कधीही मानला नाही. त्यामुळेच त्यांच्या बुद्धिवादाचे स्वरूप उथळ, आक्रमक, संकुचित कधी झाले नाही. तरीही ते माणसाची कृती व विचार यांच्या योग्यायोग्यतेचा विवेक बुद्धिवादाच्या आधारानेच करीत. त्यांच्या बुद्धीचा आवाका व झेप प्रचंड असूनही ते केवळ बौद्धिक विलासात रममाण झाले नाहीत. आपली बुद्धी आपल्या बांधवांना जागे करण्यासाठी उपयोगात आणायची आहे, तेच तिचे काम आहे, याचा त्यांनी कधीही विसर पडू दिला नाही. दीर्घ काळच्या नीरस जीवनशैलीमुळे आपल्या समाजाला ऐहिक जीवनाची लाज वाटते, ही एक प्रकारची विकृती आहे, असे आगरकरांचे स्पष्ट मत होते. ही विकृत जीवनशैली कशातून आली, या प्रश्नाच्या उत्तराचा शोध घेताना त्यांच्या लक्षात आले की, खुळचट धार्मिक आचार-विचार व समजुती ही तिची उगमस्थाने आहेत. जीवन सुंदर व्हायचे असेल तर जीवनांतील रस, रूप, रंग, गंध, ध्वनी आदींचे रसिकतेने आस्वाद घेण्याचे सामर्थ्य माणसांत असले पाहिजे. ते निसर्गत: असतेच, पण आपण मात्र निवृत्तिवादामुळे या सामर्थ्याला पारखे होत चाललेलो आहोत असे आगरकरांचे मत होते. थोडक्यात, आगरकरांनी आपल्या 'सुधारका'मधून जीवनाच्या सर्वांगाची एका देशभक्ताप्रमाणे काळजी वाहिली.

जनसामान्यांचे जीवन सर्वांगाने सुंदर व आनंदी व्हावे याचा ध्यास आगरकरांच्या लेखनातून स्पष्ट होतो. मात्र आगरकर भोगवादी नव्हते. व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करताना त्यांनी रूढींच्या शृंखला तोडण्याचा आदेश

दिला. पण हे करताना व्यक्तीला स्वैराचारांचा अवलंब करून समाजजीवन धोक्यात आणता येणार नाही असा स्पष्ट इशाराही दिला. व्यक्तिस्वातंत्र्याचा आग्रह धरणाऱ्या आगरकरांना समाजाची सुख-समृद्धी वाढली पाहिजे असे वाटत होते. समाजाच्या वाढलेल्या संपत्तीत सर्वांना वाटा मिळाला पाहिजे; म्हणजेच इतरांच्या सुखासाठी स्वत:च्या सुखाचा त्याग करता आला पाहिजे; ही आगरकरांची जीवनविषयक धारणा होती. आगरकरांचे व्यक्तिगत जीवन या धारणेनुसारच होते. आगरकरांनी जन्मावर आधारलेल्या जातिव्यवस्थेचा व तिचा पुरस्कार करणाऱ्या धर्मसंस्थेचा धिक्कार केला. कारण त्यांच्यामुळे कित्येकांच्या जीवनाचा विकास खुंटला आहे. आगरकरांनी या सर्व विषयांचा आपल्या 'सुधारका'त परामर्श घेतला. त्यांचे हे विचार आजच्या पुरोगामी कार्यकर्त्यांना आपले वाटतात. त्यामुळेच आगरकरही अगदी आपल्यातले वाटतात. परंतु आपुलकीचे हे प्रेम आगरकरांना त्यांच्या आयुष्यात लाभले नाही. त्यांच्या विचाराने जुनाट विचारांची मंडळी पेटून उठली. आगरकरांबरोबर त्यांनी वैर धरले. संधी मिळेल त्या ठिकाणी त्यांनी टीकेची, निंदेची राळ उडवली. शिव्यांचा वर्षाव केला. करता येईल तेवढा छळ केला. व्यक्तिगत जीवनासंदर्भात असभ्य उद्‌गार काढले. एव्हढेच नव्हे तर आगरकांची जीवंतपणी प्रेतयात्रा काढण्याचा असभ्य प्रकार काही सभ्य पुणेकरांनी केला. भरीस भर म्हणून टिळकांसारख्या मित्राकडून 'गंजीवरील कुत्रा' अशी उपाधी मिळाली. तसे आगरकरांनी आपल्या व्यक्तिगत जीवनाबद्दल फारसे काही लिहिले नाही. त्यांच्यावरील चरित्रग्रंथातूनही प्रामुख्याने पत्रकार आगरकर, 'सुधारक'कार आगरकर या संदर्भातच व्यापक विश्लेषण व माहिती आढळते. त्यातूनही काही मान्यवरांनी आगरकरांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंची, काही कारुण्यपूर्ण घटनांची जी नोंद केली आहे, ती कार्यकर्त्यांना प्रेरणास्रोत ठरणारी आहे.

"आगरकरांच्या आयुष्याची शेवटची सात वर्षे खूप त्रासाची व दगदगीची गेली. फर्ग्युसनचे प्राचार्य व 'सुधारका'चे संपादक या दोन्ही जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या. प्रा. वा. शि. आपटे व प्रा. वा. वा. केळकर यांच्यासारखे सहकारी मृत्यू पावले. टिळकांच्यासारख्या मित्राशी झालेले मतभेद विकोपाला गेले. समाजात अप्रियता सहन करावी लागली तरी आगरकरांच्या मनाची शांतता ढळली नाही. दारिद्र्य त्यांनी स्वखुषीनेच स्वीकारले होते. फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य असताना त्यांना महिन्याला ७५ रुपये मिळत. त्यांच्या सहधर्मचारिणी यशोदाबाई यांच्यामुळे मात्र त्यांचे कौटुंबिक जीवन अतिशय

समाधानाचे गेले. आपली पत्नी व तीन मुले यांच्या भविष्याची आपण काहीच तरतूद करीत नाही याबद्दल आगरकरांच्या मनाला अनेकदा यातना होत. परंतु यामुळे त्यांच्या ध्येयसाधनेत मात्र कधी खंड पडला नाही. आगरकरांची राहणी कमालीची साधी होती व 'चित्तेवाचि क्रियायां एकरूपता' हे त्यांच्या जीवनाचे वैशिष्ट्य होते. बौद्धिक प्रामाणिकपणा व निष्कलंक चारित्र्य यांचा त्यांच्या जीवनात अपूर्व संगम झालेला होता. दम्याने आगरकरांना सतत छळले. त्यांची प्रकृती पुढे एकसारखी खालावत गेली. मृत्यूची वाटचाल आपल्या दिशेने चालू आहे हे आगरकरांनी जाणले होते. पण यामुळे चित्त विचलित होऊ न देता शेवटपर्यंत त्यांनी आपला कर्मयोग चालू ठेवला. अखेर १७ जून १८८५ रोजी त्यांची प्रकृती फारच बिघडली व त्या रात्रीच ते कालवश झाले. मरणसमयी त्यांचे वय अवघे ३९ वर्षांचे होते. *(आगरकर लेखसंग्रह, संपादक : ग. प्र. प्रधान).*

स्वानुभवातून आगरकरांचे व्यक्तिमत्त्व घडले होते. त्यामुळे त्यांच्या विचारांत त्यांचा आविष्कार झाला आहे. आयुष्यभर संघर्ष करणाऱ्या या युगप्रवर्तक पुरुषाचे पुढील बोल अत्यंत मार्मिक आहेत.

"विचाराने चांगली गोष्ट कोणती व वाईट गोष्ट कोणती याचा पूर्ण निश्चय करून वाईट टाकण्याचा व चांगली स्थापण्याचा प्रयत्न एका बाबतीत केला असता जे धैर्य अंगी येते तेच पुढे तसली दुसरी गोष्ट करण्यास प्रवृत्त करते व ही दुसरी गोष्ट करताना धैर्याचे भांडवल पहिल्यापासूनच अधिक असल्यामुळे पहिल्या प्रसंगातून विशेष सुलभ रीतीने यशप्राप्ती होते. याप्रमाणे एका गोष्टीत यश आले, दुसरीत आले, तिसरीत आले, असे होता होता नवीन नवीन गोष्ट करण्याचे धैर्य दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत जाऊन त्याचा पाहिजे त्या कामी उपयोग करण्यास उल्हास वाटू लागतो" अशा शब्दांत आगरकरांच्या यशाचे गमक 'आगरकर' या राष्ट्रीय चरित्रमालेतील ग्रंथात संपादकांनी नमूद केले आहे.

या ग्रंथातच आगरकरांच्या विलोभनीय जीवनाचे चित्र रेखाटताना म्हटले आहे, कऱ्हाडहून रत्नागिरी, अकोला अशी शिक्षणासाठी भटकंती करणारे कम्पाउंडर आगरकर, शिक्षकाची नोकरी करणारे आगरकर, फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपॉल आगरकर, केसरीचे संपादक आगरकर, टिळकांशी वैचारिक पातळीवर दोन हात करणारे आगरकर यांचे जीवन खरोखर विलोभनीय आहे. त्यांचे जीवन, कार्य आणि विचार यांमध्ये सुसंगती आहे. एकाच दिशेने आणि

ध्येयाने त्यांनी वाटचाल केली. अखंड परिश्रम घेतले. वैचारिक संघर्षात कोणाशी तडजोड केली नाही. ज्या संस्थेच्या कार्यात आपल्या उपस्थितीमुळे किंवा आपल्या संबंधामुळे अडथळे निर्माण होत आहेत असे त्यांना वाटले, त्या संस्थेशी त्यांनी स्वखुषीने आपले संबंध तोडून टाकले. आगरकरांना कसलाही अहंकार नव्हता. "माझ्या पावशेर मिशा फिल्टरसाठी उपयोगी पडतात" असा विनोद करून दुसऱ्याला हसविणाऱ्या माणसास अहंकाराचा स्पर्शही होणे शक्य नाही. अशा अंहकाररहित महापुरुषाने आपण आता फार दिवस जगू शकत नाही याची जाणीव होताच एका पुरचंडीत वीस रुपये ठेवून त्यावर माझ्या प्रेतदहनार्थ असे शब्द लिहून ठेवले होते.

"आगरकरांच्या साधेपणाच्या मुळाशी जे संयमाचे आणि सामाजिक जबाबदारीचे तत्त्वज्ञान होते. तेच त्यांच्या आचारा-विचारांत आणि उच्चारांत सदैव दिसून येत होते... ते वरचेवर म्हणत, आम्ही विद्यार्थ्यांना शिकविणार, तयार करणार, आमचे आचरण पाहून विद्यार्थी तयार होणार... आम्ही जर नाटकी आणि व्यसनी लोकांत राहू लागलो, त्यांच्यासारखेच झालो, तर आमच्यापासून आमचे विद्यार्थी शिकणार तरी काय? हेच का? समाजाचे नेतृत्व स्वीकारणाऱ्या मनुष्याने मग त्याचा पेशा शिक्षकाचा असो वा लेखकाचा असो, समाजसेवकाचा असो किंवा राजकारणी पुरुषाचा असो. या सर्वांनी शुद्ध चरित्र्याची चाड बाळगली पाहिजे, या गोष्टींविषयी त्यांचा कटाक्ष होता." *(आगरकर : व्यक्ति आणि विचार, वि. स. खांडेकर).*

आगरकर गेल्यानंतर फर्ग्युसन कॉलेजवर शोककळा पसरली. आपल्या तेजस्वी व ध्येयनिष्ठ प्राचार्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी गो. कृ. गोखले यांना बोलवले होते. सभागृह विद्यार्थ्यांनी गच्च भरले होते. सारे गोपाळ कृष्णांचीच वाट बघत होते. जड पावलांनी गोपाळ कृष्ण सभास्थानी आले. व्यासपीठावर जाऊन उभे राहिले. गोपाळ कृष्ण आता आगरकरांविषयी काय बोलतात ते ऐकायला विद्यार्थी शांतपणे बसले होते. पण गोपाळ कृष्णांच्या तोंडून एक शब्दही उमटेना, काही वेळाने ते सावरतील व बोलतील असं वाटलं पण व्यर्थ. सुन्न बधिरपणे ते समोरच्या विद्यार्थ्यांकडे पाहत तसेच उभे होते. शेवटी तर बांध फुटला आणि जमलेल्या विद्यार्थ्यांसमोर ते ढसाढसा रडू लागले. त्या समयी नेत्याला स्वत:चे अश्रू सावरून औपचारिक पद्धतीत आगरकरांविषयी काही बोलणं केवळ अशक्य होतं. जमलेले विद्यार्थीही रडत होते. या मूक रुदनानंच शोकसभा संपली. एक शब्दही न बोलता गोपाळ कृष्ण गोखले व्यासपीठावरून उतरले आणि निघून गेले. इतकी सच्ची, व्याकूळ करणारी

शोकसभा क्वचितच होत असेल. *(सुधाकर अग्रणी आगरकर : प्रबोधन प्रकाशन माला, वर्ष ६वे १९९५, पुस्तक पहिले, लेखक : प्रसाद कुलकर्णी)*

इतर कोणत्याही क्षेत्रातील कामापेक्षा समाजसुधारणेचे काम व सुधारकाचे जीवन किती कष्टदायक व क्लेषदायक आहे, याची ओळख आगरकरांच्या चरित्र्याच्या ओझरत्या दर्शनानेही होते. आगरकरांच्या पूर्वी हा दाह म. फुले, सावित्रीबाई यांनी तर आगरकरांनंतर म. शिंदे, डॉ. आंबेडकर यांच्यासारख्या समाजसुधारकांनी सोसला. आगरकर म्हटले की केवळ काही विशिष्ट समाजगटाशी संबंधित असलेल्या समाजसुधारणा करणारे, असा काहीसा संकुचित समज अनेकांचा झालेला असतो. तर काही जण टिळक-आगरकर यांची तुलना करीत असताना आगरकरांच्या पुढील पिढीच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शक ठरतील अशा गुणवैशिष्ट्यांकडे काहीसे दुर्लक्ष करीत असतात. राजकीय क्षेत्रातील नेत्यांची जेवढी दखल घेतली जाते, जेवढी व्यापक चर्चा होते, तशी संधी समाजसुधारकांच्या संदर्भात प्राप्त होत नाही. म्हणूनच आज शाळा-कॉलेजातून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या जनसामान्यांच्या पिढीला म. फुले, विठ्ठल रामजी, आगरकर यांसारख्या समाजसुधारकांबद्दल आवश्यक ती माहिती असते असा समज करणे चुकीचे ठरेल. देशाच्या सामाजिक जीवनात आज भयावह परिस्थिती निर्माण केली जात आहे. जुनाट रूढी, परंपरांना धार्मिक उन्मादांचा रंग चढवला जात आहे. काही वरवरच्या बदलापेक्षा स्त्री-शूद्रांची स्थिती फारशी बदलली नाही. आगरकरांनी, म. फुल्यांनी, राजर्षी शाहूंनी ज्या प्राथमिक शिक्षणाचा आग्रह धरला ते आजही सर्वांना योग्य प्रकारे उपलब्ध होत नाही. प्रश्न अनेक आहेत. त्या सर्वांची उत्तरे आगरकर चरित्रात मिळतील अशी भाबडी अपेक्षा करणे गैर व अवाजवी आहे. परंतु पुरोगामी कार्यकर्त्यांची आगरकरांशी चांगली ओळख होणे निश्चित फलदायी ठरणार आहे. लोकमान्य टिळकसुद्धा आगरकरांना, त्यांच्यातील प्रेमळ माणसाला ओळखू शकले नाहीत, असेच म्हणावे लागेल. आपला अंतकाळ जवळ आला असे वाटताच, केवळ कर्तव्यासाठी टिळकांना करावा लागलेला विरोध विसरून जाऊन डेक्कन कॉलेजात किंवा डोंगरीच्या तुरुंगात ज्या जिव्हाळ्याने आपण आपल्या या जिवलग मित्राशी तासन्तास बोलत होतो, तो एकदाचा शेवटचा गोड घास म्हणून अनुभवावा, अशी तीव्र इच्छा आगरकरांच्या मनात आली. परंतु त्या अगोदरच त्यांची व मृत्यूची भेट झाली.

आपण आगरकरांना देव न मानणारा देवमाणूस म्हणतो. कारण आगरकरांची प्रखर देशभक्ती, त्यागाची परिसीमा गाठून त्यांनी केलेली

देशसेवा, विवेकवादावर आधारलेला त्यांचा निर्भीडपणा, समाजाच्या सुखवृद्धीसाठी त्यांनी स्वीकारलेली वैज्ञानिक दृष्टी, लोकशिक्षकाच्या भूमिकेतून तेजस्वीपणे केलेली पत्रकारिता, निष्कलंक चारित्र्याचा त्यांनी घालून दिलेला आदर्श, समाजात उपेक्षित ठरलेल्या स्त्री-शुद्रांच्या मुक्ततेसाठी, शिक्षणासाठी व प्रगतीसाठी त्यांच्या लेखणीने मांडलेला यज्ञ, मानवी समाजाला जखडून टाकणाऱ्या रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यांच्यावर चढवलेला तुफानी हल्ला, ढोंगी धर्ममार्तंडांचा फाडलेला बुरखा हे आगरकरांचे कार्य, 'बुडते हे जन न देखवे डोळा' या तुकारामांच्या उक्तीप्रमाणे जनहितासाठी सर्व संकटांचा सामना करणारे आहे. आगरकरांनी आपले अल्पसे आयुष्य अक्षरशः समाजसुधारणेसाठी पणाला लावले. आगरकरांच्या ठिकाणी असणारे हे असाधारण गुण एखाद्या देवमाणसाला शोभतील अशा प्रकारचे आहेत. त्याच अर्थाने आपण त्यांना देवमाणूस म्हणत आहोत.

आगरकरांनी आपल्या लेखनातून अनेक वेळा धर्मचिकित्सा केली आहे. धर्म हा अत्यंत व्यापक विषय आहे. त्याची चर्चा, समीक्षा अनेक विचारवंत दीर्घ काळापासून करीत आले आहेत व ही चर्चा पुढेही चालू राहणार आहे. 'देव' हा धर्माचाच एक अत्यंत महत्त्वाचा विभाग आहे. या देवाची उत्पत्ती कशी झाली? देवाविषयीच्या विचारात बदल कसे होत गेले? देवाची देवळे कशी अस्तित्वात आली? त्या देवळात देवाचा अवतार म्हणून मूर्ती कशा आल्या? मूर्तिपूजेत विविधता कशामुळे आली? यांसारख्या मूलभूत प्रश्नांची चर्चा आगरकरांनी हिंदू धर्माच्या संदर्भात तात्त्विक पातळीवर केली आहे. अज्ञानातून देवाचा जन्म झाला; विज्ञानाने व ज्ञानाने देवाचे अस्तित्व नाकारले; म्हणजेच देव नाही असे विचाराअंती स्पष्ट झाले. असे देव न मानणाऱ्यांपैकी आगरकर एक होते. परंतु मी देव मानत नाही एवढे सांगून ते थांबले नाहीत. आपल्या सभोवतालच्या समाजाचा देवभोळेपणा त्यांना नाहीसा करायचा होता. त्यासाठीच त्यांना समजेल अशा भाषेत क्रमाक्रमाने व्यवहारातील उदाहरणे घेऊन, सविस्तरपणे देवाचे अस्तित्व पुसून काढले. म्हणूनच त्यांना 'देव न मानणारा देवमाणूस' हे विशेषण खऱ्या अर्थाने शोभून दिसते.

# २. आगरकरांचे शिक्षणविषयक विचार

शिक्षणाच्या अभावी कोणताही समाज अधोगतीला पोहोचतो. रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, अज्ञान यांचा जोर या समाजात वाढलेला असतो. कालबाह्य झालेल्या जुनाट कल्पनांना कवटाळणे आणि कालसुसंगत अशा नव्या मूल्यांकडे विचार-आचारांकडे पाठ फिरवणे असाच या समाजाचा जीवनक्रम असतो. त्याला एक प्रकारची बधिरता, स्थितिशीलता प्राप्त होते. असा मानवी समाज दुबळा बनतो. आक्रमकखोर अशा सबळ सत्तांची तो शिकार बनतो. असा इतिहासाचा दाखला आहे. कारण या समाजाने गतीचा कायदा पाळलेला नसतो. जे मारण्याच्या, जाळण्याच्या, पुरण्याच्या लायकीचे असते, त्यालाच कवटाळून तो एका ठिकाणी सडत उभा राहिलेला असतो. आपला देशही याच अवस्थेतून गेला. जुनं ते सोनं म्हणत आपण बसलो. काळाने आपणाला सावध केले. परंतु आपण त्याची हाक वेळीच ऐकली नाही. वेदवाक्य प्रमाण मानून नव्या शास्त्रांचा, तर्कांचा व तत्त्वज्ञानांचा आपण अव्हेर केला. विचार, अभ्यास, व्यासंग करणाऱ्या मूठभरांची एक व्यवस्था आपण जन्माला घातली. या व्यवस्थेने ज्ञानक्षेत्रात आपली मक्तेदारी निर्माण केली. जनसामान्यांना या क्षेत्रात प्रवेशबंदी जाहीर केली. त्यामुळेच येथील बहुजन समाज अज्ञानात, गरिबीत, सर्व प्रकारच्या विवंचनेत, सत्त्वहीन जिणे जगत राहिला. ही अंधारयात्रा पिढ्यान्‌पिढ्या चालत राहिली. ज्ञानक्षेत्रावर कब्जा करून बसलेल्यांचीही फारशी वेगळी स्थिती नव्हती. त्यांना कष्टाशिवाय खाण्याची सवय जडली. ही सोय त्यांना जुनाट परंपरेने करून दिलेली होती. त्यामुळे त्यांनी सर्वच क्षेत्रातील नवतेकडे पाठ फिरवली. परिणाम उघड होता. कूपमंडूक वृत्ती धारण केलेल्या या व्यवस्थेने दर पिढी अर्थाशिवाय पोकळ घोकंपट्टी सुरू केली. हेच त्यांच्या दृष्टीने ज्ञान होते, विद्वत्ता होती. शिक्षणाचे खरे तेज फाकले नाही वा शक्ती

उगवली नाही. परिणाम तर होणारच होता. कधी शक, हूण, तर कधी मोंगल, पोर्तुगीज, इंग्रज यांच्या आक्रमणात देश चिरडला गेला. या सर्व आक्रमणखोरांत इंग्रज अतिशय प्रभावी होते. नव्या शास्त्रांनी व शस्त्रांनी ते सज्ज होते. डावपेचांत व कारस्थानांत ते तरबेज होते. मूठभर स्वदेशीय सहकाऱ्यांच्या साहाय्याने त्यांना या अवाढव्य देशावर आपले अधिराज्य कायम करायचे होते. स्वाभाविकच त्यांना त्यांच्या प्रशासनाला सोयीची अशी येथील लोकांची पिढी तयार करायची होती. त्यांनी आपल्याला अपरिचित असलेल्या नव्या शिक्षणपद्धतीचा प्रारंभ केला. अल्पकाळातच या शिक्षणपद्धतीचा परिणाम दिसू लागला. इंग्रजी शिक्षण घेतलेली पहिली पिढी विचार करू लागली. त्यापैकी काहींना आपल्या देशाची अवनत अवस्था असह्य झाली. या अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी आपल्या समाजाची सुधारणा होणे गरजेचे आहे, याची तीव्र जाणीव झाली.

सुधारणेचे प्रश्न केवळ तळमळीने सुटत नसतात. त्यासाठी प्रयत्नांची व कष्टाची पराकाष्ठा करावी लागते. सुधारणेला चालना देणारी मूलभूत ऊर्जा म्हणजे शिक्षण. जनसामान्यांच्या शिक्षणाचे महत्त्व आगरकरांच्याही अगोदर म. फुल्यांनी ओळखले होते. बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी यांसारख्या धुरीणांनीही ज्ञान-विज्ञानाचे स्वागत आपल्या लेखनातून केले होते. समाजातील वर्णव्यवस्थेवर प्रहार करण्यावर म. फुल्यांचा मुख्य रोख होता. हा प्रहार ज्या साधनाने करायचा ते शक्तिशाली साधन म्हणजे शिक्षण. शिक्षण केवळ वरच्या थरातल्या मूठभरांना मिळून भागणार नाही. ते जनसामान्यांतील स्त्री-शूद्रांपर्यंत जाऊन पोहोचले पाहिजे. शिक्षणाने व नव्या विचारांनी जुनाट पोथीपुराणातून व वर्णश्रेष्ठत्वाच्या कल्पनेतून सुटका होऊ शकेल, हे जोतीरावांनी ओळखले. स्वर्ग-नरकाच्या काल्पनिक विषयांच्या आहारी जाऊन आपले आयुष्य व्यर्थ घालवू नका, असा त्यांच्या सार्वजनिक सत्य धर्माचा संदेश होता. फक्त मुलांना व समाजातील वरचढ वर्गाला शिक्षण देऊन ही अवस्था संपणार नाही हे त्यांनी जाणले. त्यामुळे स्त्री-शिक्षणाची नवी क्रांतिकारी कल्पना त्यांनी मांडली.

केवळ कल्पना मांडून ते थांबले नाहीत. त्यांनी मुलींच्या शाळा सुरू केल्या. या कार्यात त्यांना सावित्रीबाईबरोबर काही सहकाऱ्यांची साथ मिळाली. म. फुल्यांनी स्त्री-शिक्षणासंदर्भात अनेक प्रयोग केले. या शिक्षणाला नवी दिशा दिली. हंटर आयोगापुढे त्यांनी आपल्या शिक्षणविषयक विचारांची मांडणी केली. प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य देण्याविषयी आग्रह धरला. अस्पृश्य मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय करावी, खेड्यांत शाळा काढाव्यात, पारंपरिक

शिक्षणाबरोबर धंदेशिक्षणाची व्यवस्था करावी, शेतकरीवर्ग दृष्टीसमोर ठेवून धंदे-अभ्यासक्रमांची आखणी करावी. अशा अनेक मूलभूत कल्पना त्यांनी इंग्रज सरकारपुढे मांडल्या व आपल्या शैक्षणिक उपक्रमांत पूर्ण शक्तिनिशी राबवल्या. 'एका अविद्येमुळे किती अनर्थ होतात?' हा परिवर्तनाचा मूलमंत्र त्यांनी बहुजनांना दिला.

समाजसुधारणेच्या चळवळीत शिक्षणाचे महत्त्व ओळखून म. फुल्यांनंतर त्या संदर्भात प्रत्यक्ष कृती करणारे श्रेष्ठ समाजसुधारक म्हणून आगरकरांचे नाव घ्यावे लागते. गरिबीच्या परिस्थितीत शिक्षणाच्या उत्कट इच्छापूर्तीसाठी आगरकरांनी जो अजोड संघर्ष केला, त्याच्या मुळाशी शिक्षणाचे त्यांनी ओळखलेले सामर्थ्य होते. अत्यंत खडतर आयुष्यात, उपाशीपोटी मिळेल तो आधार घेत, देहाला व मनाला अपार कष्ट उपसायला लावून त्यांनी पदव्युत्तर शिक्षण संपादन केले. १८८०मध्ये आगरकरांनी एम.एम.ची पदवी संपादन केली. आणि लगेचच शिक्षकाचा व्यवसाय स्वीकारून त्यात आपली सर्व हयात घालवली. केवळ चार भिंतींच्या आत शिक्षण देणे शक्य आहे, ही कल्पना आगरकरांना मानवण्यासारखी नव्हती. त्यांनी स्वीकारलेला शिक्षकी पेशा हे त्यांच्या उदरनिर्वाहाचे केवळ साधन नव्हते. ते शिक्षणाद्वारे पारतंत्र्यात व सामाजिक मागासलेपणात खितपत पडलेल्या समाजाला शिक्षणाद्वारे जागे करू इच्छित होते. या समाजाचे ध्यान नव्या शिक्षणाकडे, विचारांकडे, विज्ञानाकडे जावे अशी त्यांची उत्कट इच्छा होती. या वाटचालीत अविद्येचे, अंधश्रद्धेचे अनेक चकवे होते. संकुचिततेची, थिजलेपणाची डबकी होती. गुलामगिरीच्या बेड्यांतून समाज मुक्त करायचा तर शिक्षणाने या सर्वांवर मात करता आली पाहिजे. ठरावीक अभ्यासक्रमांचे धडे देऊन समाजाचे व्यापक शिक्षण करता येणार नाही, याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच त्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या साहाय्याने लोकशिक्षणाचे प्रभावी साधन उपयोगात आणता यावे म्हणून वृत्तपत्राचे काम करण्याचे ठरवले. १८८१ पासून 'केसरी'चा प्रारंभ झाला आणि सतत सात वर्षे आगरकरांनी या पत्राची धुरा यशस्वी व प्रभावीपणे वाहिली. त्याबद्दल श्री. स. मा. गर्गे म्हणतात, "समाजाच्या विचारांना नवे सुधारणावादी वळण देण्याचे आगरकरांनी ठरवले, तसे सामर्थ्य आगरकरांच्या लेखणीत होते. समाजातील रूढिग्रस्त विचार नाहीसे झाले पाहिजेत, अशी मनात तळमळ होती आणि हाती घेतलेल्या कार्याला वाहून घेण्याएवढी प्रखर निष्ठाही मनात होती. वृत्तपत्रकाराला आणि त्या वृत्तपत्राद्वारे समाजाला शिक्षण देऊ इच्छिणाऱ्या संपादकाला जे आवश्यक गुण गरजेचे असतात ते

आगरकरांच्या ठिकाणी होते. त्यात नावीन्य तर होतेच पण त्याबरोबरच वाचकांच्या विचारांना चालना देण्याची शक्तीही होती.''

वर्तमानपत्राचा लोकशिक्षणासाठी अत्यंत प्रभावी उपयोग करता येतो याची आगरकरांना खात्री होती. या साधनाद्वारे समाजाच्या विविध क्षेत्रांत जी जुनाट जळमटे परिवर्तनाला विरोध करीत असतात त्यांना झाडून समाजमन स्वच्छ करता येते; त्याला प्रवासाची नवी दिशा दाखवता येते. परंतु या अत्यंत महत्त्वाच्या कार्याकडे दुर्लक्ष करून तथाकथित विद्वान ''विलायतेची कारस्थाने कुटण्यासाठी व नवे धर्म तयार करण्याच्या खटपटीखालीच बेजार झाले होते'' असे ते म्हणत असत. आगरकर म्हणतात, ''लोकशिक्षण हा विषय देशस्थितीच्या संबंधाने पाहता एवढ्या महत्त्वाचा असताना व विद्याखात्याकडे देशातील उत्पन्नाची एवढी मोठी रक्कम दर वर्षी खर्ची पडत असताना तिचा विनियोग कसा काय होत असतो या गोष्टीकडे कोणी फारसे लक्ष दिले नाही. जे आंधळे गारूड आज कित्येक वर्षे चालू आहे तेच पुढेही चालू आहे.'' लोकशिक्षणाच्या जुन्या पद्धतीत आम्ही नव्या काळाला साजेशी अशी काही सुधारणा करीत नाही. अशी तक्रार करून आगरकर म्हणतात, ''आम्ही मोठे झालो तरी आमचे जुने आंगडे-टोपडे आम्हांस अद्याप सुटत नाही.''

काही शिक्षित लोक गोऱ्या साहेबांच्या समोर किती हांजीखोरपणा करतात याचे अत्यंत विदारक चित्र आगरकरांनी एका लेखात मांडले आहे. ते म्हणतात, ''रस्त्यावर एखादे ओले हाड पडलेले पाहिले म्हणजे ग्रामसिंहांची झुंडच्या झुंड त्यावर जाऊन पडते. त्याप्रमाणे एखादी जागा रिकामी झाल्याची वार्ता ऐकली की सर्टिफिकेट्स आणि अर्जांच्या सुरळ्या घेऊन लागले साहेबांच्या बंगल्यावर धावायला. अधिकाऱ्यांची मर्जी संपादन करून बदलीची जागा पटकाविण्यासाठी चुगल्या सांगण्यास, ग्लास झोकण्यास, पोरे उचलण्यास, बुट पुसण्यास आणि यापेक्षाही निंदाकर्मे करण्यास हांजीखोरपणाची धडपड चालते.'' आगरकरांचा हा निष्कर्ष आणि निरीक्षण आज स्वातंत्र्योत्तर काळातही अस्वस्थ करणारा आहे. बदल असेल तर कदाचित एवढाच की परकीय साहेबांच्या जागी स्वकीय साहेब!

शिक्षणाचा एवढा व्यापक अर्थ घेऊन लोकशिक्षणाला एवढे महत्त्व देणाऱ्या आगरकरांनी आपल्या सहकाऱ्यांच्या बरोबर व विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या नेतृत्वाखाली पुण्यात 'न्यू इंग्लिश स्कूल'ची स्थापना केली. त्याच शाळेत ते शिक्षक म्हणून रुजू झाले. पण तेवढ्यावर त्यांचे समाधान

झाले नाही. समाजात देशभक्तीने प्रेरित झालेला असा नव्या विचारांचा तरुणवर्ग महाविद्यालयीन शिक्षण घेऊन तयार व्हावा आणि त्यांनी सार्वजनिक जीवनात सहभागी व्हावे, हा ध्यास आगरकर-टिळकांना लागलेला होता. या दोघांनी समविचारी सहकारी मिळवले. त्यांनी सुरू केलेल्या 'केसरी'-'मराठा' या दोघांबद्दल समाजात आपुलकीची भावना निर्माण झाली होती. अनुकूल परिस्थितीचा लाभ उठवण्याचे ठरवून आगरकर-टिळकांनी 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना केली. आणि या संस्थेच्या नेतृत्वाखाली १८८५मध्ये 'फर्ग्युसन् कॉलेज'चा प्रारंभ केला. आगरकर व त्यांच्या सहकाऱ्यांच्या या शैक्षणिक कार्यामुळे महाराष्ट्रात राष्ट्रीय शिक्षणाला व राष्ट्रीय भावनेच्या एका नव्या परंपरेला चालना मिळाली. आगरकरांनी आपल्या कॉलेज स्थापनेच्या कार्यात न्या. रानडे त्याचप्रमाणे प्रा. सेल्बी, सर विल्यम् वेडर बर्न यांच्यासारख्या मान्यवरांचा सल्ला घेतला. त्या वेळच्या मुंबई प्रांतांचे गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन यांच्या सहकार्याने मुंबई विद्यापीठाची कॉलेजला मान्यता मिळवली. समाजातील श्रीमंत व अधिकारी मंडळाचे आर्थिक साहाय्य मिळवण्यातही ते यशस्वी झाले.

एकीकडे वृत्तपत्रांतून जुनाट व्यवस्थेवर घणाघाती प्रहार तर दुसरीकडे शाळा-कॉलेजांतून नव्या विचारांचे, विज्ञानाचे स्वागत असे शिक्षणकार्य आगरकरांनी मोठ्या जोमाने सुरू केले. वृत्तपत्रांतून लोकशिक्षणाच्या हेतूने लेखन करणे हे आजच्या इतके सहज, सोपे व फावल्या वेळचे काम नव्हते. आगरकरांच्या लेखणीचा फटकारा बसताच रूढिग्रस्त स्थितिशील लोकांचा कंपू सापासारखे विषारी फूत्कार टाकू लागले. आगरकरांवर खोट्यानाट्या नव्हे तर अत्यंत असभ्य शब्दांत जाहीरपणे टीकेचा भडिमार केला जात होता. सुधारणेचे क्षेत्रच असे असते की, येथे कौतुकाचे शब्द फार कमी कानावर पडतात. आगरकरांपूर्वी या शेणसड्यांचा व खड्यांचा मारा सावित्री-जोतीबांनी आपल्या ध्येयावर अढळ निष्ठा ठेवून सहन केला होता. आगरकर हे त्याच मार्गावरील प्रवासी होते. शेवटपर्यंत गरिबीची परिस्थिती, रोगग्रस्त शरीर, घरातील मंडळींच्या चाकोरीबद्ध आशा-आकांक्षांना द्यावा लागलेला नकार, टिळकांच्या बरोबर मतभेद झाल्यानंतर टीकेचा झालेला भडिमार, वेळ येताच कच खाणारे तथाकथित सुधारक या सर्वांवर मात करीत आगरकर एखाद्या पाषाणावर आलेख रेखाटावा त्याप्रमाणे गरजले की, 'इष्ट असेल ते बोलणार आणि शक्य असेल ते करणार.'

'केसरी' साप्ताहिकाचे एक यशस्वी, वाचकप्रिय व निर्भीड संपादक म्हणून आगरकरांचा प्रभाव अगदी अल्पावधीत महाराष्ट्रात दिसू लागला. त्यांनी तो

वैचारिक दबदबा 'केसरी'सोडेपर्यंत सात वर्षे कायम ठेवला. टिळक-आगरकरांच्या मतभेदाचा परिणाम म्हणून आगरकरांना 'केसरी' सोडावा लागला. आपल्या हाताशी सहजरीत्या 'केसरी' साप्ताहिकासारखे साधन होते म्हणून आगरकर लोकशिक्षणाच्या भूमिकेतून लिहीत नव्हते. 'केसरी'चा त्यांना त्यांच्या विचारांच्या प्रचारासाठी जरूर उपयोग झाला. परंतु 'केसरी'पासून वेगळे झाल्यावर आगरकर शांत बसले नाहीत. ते त्यांना शक्यही नव्हते. कारण शाळा-कॉलेजांतील साचेबंद अध्यापनावर समाधान मानणारा आगरकरांचा पिंड नव्हता. तुकारामासारखे संत आपल्या आयुष्यभर लोकशिक्षणाचे काम करीत होते. त्याप्रमाणेच आगरकरांनीही काम केले. आपले स्नेही श्री. गोखले यांच्या सहकार्याने आगरकरांनी आपल्या ध्येयपूर्तीसाठी 'सुधारक' काढण्याचे निश्चित केले. 'सुधारक कशासाठी?' या संबंधीची आपली भूमिका त्यांनी एक जाहीर पत्रक काढून स्पष्ट केली. या पत्रकाचे वाचन करताच स्पष्ट होते की, केवळ बातम्या देणे यासाठीच वृत्तपत्र नसते. तर वृत्तपत्राने आपल्या सभोवतालच्या समाजाला मोठ्या ध्येयनिष्ठेने जागे करायचे असते. या पत्रकात आगरकर म्हणतात, ''ज्यांना हिंदुस्थानचा इतिहास यत्किंचित अवगत असेल त्यांना येथे इंग्रजांचा अंमल कायम होण्यापूर्वी आमची स्थिती कशी होती व तो अंमल कायम झाल्यापासून तीत किती बदल झाला आहे आणि पुढे किती बदल होण्यासारखा आहे हे स्पष्ट विचारांती समजण्यासारखा आहे. मोगलांच्या तीन-चारशे वर्षांच्या किंवा मराठ्यांच्या दीड-दोनशे वर्षांच्या अमलात राज्याविषयक, नीतीविषयक व शास्त्रविषयक विचारांचा लोकांत आविर्भाव झाला नाही. ते विचार इंग्रज लोकांचे राज्य सर्वत्र स्थापित झाल्यापासून पुरती शंभर वर्षे झाली नाहीत तोच चोहिकडे पसरून जाऊन हिंदुस्थानच्या स्थितिस्थापकताप्रिय लोकांत एक प्रकारची अज्ञातपूर्व जागृत अवस्था झाल्यासारखी दिसत आहे.'' या नूतन जागृत अवस्थेचा परिणाम होणार तरी काय? या प्रश्नाचे उत्तरही जाहीर पत्रकात स्पष्ट केले आहे. त्यात म्हटले आहे, ''भारतीय आर्यत्व अगदी नष्ट न व्हावे हे इष्ट असेल तर जपान, चीनप्रमाणे आपण आपले डोळे नीट उघडे ठेवून व जीवनार्थ कलहात आमचा निभाव कसा लागेल हे शोधून काढून तदनुसार वर्तन करण्यास प्रवृत्त झाले पाहिजे. आणि म्हणून आपले पाऊल पुढे पडण्यास्तव राजकीय, सामाजिक, नैतिक व शास्त्रीय विचारात आम्हांस कोणत्या प्रकाराचे वळण लावून घेतले पाहिजे. हे लोकांच्या नजरेस वारंवार आणण्यास प्रस्तुत स्थितीत वर्तमानपत्रासारखे सोयीचे दुसरे साधन नाही, असे वाटल्यावरून 'सुधारक' नावाचे नवीन



124282

साप्ताहिक आम्ही काढणार आहोत.'' लोकशिक्षणाच्या हेतूने काढलेले आपले साप्ताहिक लोकमनाची पकड घेणारे असले पाहिजे याची जाणीव आगरकरांना होती. म्हणूनच या साप्ताहिकात काही भागात निवडक वर्तमान सार, कधी मजेदार विनोद, कधी बोधपर सुरस गोष्टी, कधी एखाद्या विख्यात पुरुषाचे मनोवेधक चरित्र, कधी आश्चर्यजनक वस्तूची हकिगत असा मजकूर दिला जाईल. थोडक्यात, आपले साप्ताहिक वैविध्यपूर्ण व लोकमनाची पकड घेणारे असेल याची खात्री आगरकरांनी दिली होती. त्याबरोबरच सुशिक्षित स्त्रियांना लेखन करण्यास प्रोत्साहन म्हणून त्यांच्या लेखनासाठी स्वतंत्र जागा राखून ठेवली जाईल असा आवर्जून उल्लेख केला होता. थोडक्यात, समाजाची सर्वांगीण उन्नती आणि सुधारणा करणे हे मुख्य ध्येय असले तरी त्याबरोबरच मनुष्याची बौद्धिक आणि मानसिक जिज्ञासा वाढावी यासाठी विविध प्रकारचे लेखन करण्याचे त्यांनी जाहीर केले होते.

लोकशिक्षणाचे एक प्रभावी साधन म्हणून आगरकरांनी 'केसरी', 'सुधारक'सारख्या साप्ताहिकाची निवड केली होती. या क्षेत्रात वृत्तपत्र किती महत्त्वाची कामगिरी पार पाडू शकते हे आपण आगरकरांच्या विचारांच्या आधारे स्पष्टही केले आहे. स्वत: आगरकरांनी अडचणीचा, टीकेचा भडिमार होत असलेल्या काळात आपल्या ध्येयवादापासून थोडीशीही माघार घेतली नाही. एखाद्या योद्ध्याने आपल्या हातातील शस्त्राच्या साहाय्याने शत्रूवर घनघोर युद्धात तुटून पडावे त्याप्रमाणे अज्ञान, अंधश्रद्धा, गुलामीवृत्ती, जुनाट कल्पना, रूढी, सामाजिक भेदाभेद, स्त्रियांवरील अन्याय यांनी व्यापलेल्या काळोखावर आगरकर आपल्या वृत्तपत्राने तडाखे हाणत होते. त्या काळी आजही लक्षात घेण्यासारखा इशारा त्यांनी देऊन ठेवला, ''दोन-चार नामांकित वर्तमानपत्रांखेरीज बाकीच्यांची जर स्थिती पाहिली तर वर्तमानपत्र म्हणजे जागोजागच्या बातम्या प्रसिद्ध करण्याचे साधन. याच्यापलीकडे वरील शब्दाचा अर्थ पत्रकर्त्यांच्या मनात कधी येत असेल असे वाटत नाही. अलीकडे तर लहानसहान गावांतूनसुद्धा वर्तमानपत्रे निघू लागली आहेत. छापखाना घालणे व पत्र काढणे हा एक व्यापारच बनल्याने ज्यास विद्येचा संस्कार नाही, अशा मंडळींच्या हातीच वरील दोन अमौलिक साधने पडलेली बहुधा आढळतात.''.

आगरकरांच्या सामाजिक विचारांत इतर अनेक प्रश्नांबरोबर स्त्री-सुधारणेचा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे. कुटुंब व्यवस्थेमध्ये स्त्रियांचे स्थान काय असावे? त्यांची प्रगती कोणत्या पद्धतीने घडवून आणावी? त्यासाठी त्यांना शिक्षण

देणे किती गरजेचे आहे? यांसारख्या अनेक मुद्द्यांचा विचार त्यांनी आपल्या निबंधात अत्यंत सविस्तरपणे मांडला आहे. कुटुंबसंस्था जसजशी आकाराला आली, आपली वाटचाल करीत राहिली, तसतसा स्त्री-पुरुषांच्या कुटुंबातील स्थानात बदल होत गेला. प्रारंभी स्त्री व पुरुष हे दोघेही कुटुंबातील समान दर्जाचे घटक होते. उपजीविकेची साधने जसजशी प्रगत होत गेली, प्राथमिक अवस्थेतील सततची भ्रमंती थांबली; शेती व त्या अनुषंगाने इतर उद्योगांची वाढ झाली; जीवनाला स्थैर्य प्राप्त झाले; तसतसे कुटुंबात पुरुषाचे वर्चस्व वाढू लागले. हळूहळू त्याचे रूपांतर पुरुषसत्तेत झाले. त्याबरोबरच स्त्रीचे कुटुंबातील स्थान कमी प्रतीचे मानले जाऊ लागले. तिचे अस्तित्व ही उपेक्षणीय बाब ठरली. पुरुषाची सेवा करणे, मुलांना जन्म देणे, घर सांभाळणे अशा मर्यादा तिच्या जीवनाला पडल्या. धर्माचा, रूढीचा, घराण्याचा आधार घेऊन वैवाहिक जीवनाची सर्व बंधने स्त्रियांनी पाळली पाहिजेत असा दंडक निर्माण झाला. त्यातूनच प्रौढ विवाह, विषम विवाह रूढ झाले. या सर्व प्रकारच्या अन्यायी व अत्याचारी व्यवहाराला धर्माचा आधार घेण्यात आला. अनीतीच्या सर्व मोजमापाचे परिमाण स्त्रीचे चारित्र्य ठरवण्यात आले. स्त्रीला वैधव्य प्राप्त झाले तर तिच्या हालअपेष्टांना पारावार उरला नाही. त्यामुळेच पती निधनानंतर तिच्यावर सती जाण्याची सक्ती करण्यात आली. सामाजिक व्यवहारातून, शिक्षण-ज्ञानाच्या क्षेत्रातून तिची हाकलपट्टी करण्यात आली. या सर्वांचा परिणाम कुटुंबव्यवस्थेतील स्त्रीच्या जीवनावर झाला. त्यामुळे धर्मकल्पना, रूढी, परंपरा, नीतिकल्पना, कायदा, सामाजिक प्रथा, घराण्याचे संकेत अशा अनेक निर्बंधात स्त्रीला बंदिस्त करण्यात आले. दलितांप्रमाणेच स्त्रीची स्थितीही अनेक शतके पशूवत व गुलामीची करण्यात आली. आगरकरांप्रमाणेच म. फुल्यांनी बंदिस्त स्त्रियांना मुक्त करण्यासाठी आपल्या विचारांनी व प्रत्यक्ष कृतींनी रूढी व खुळचट धर्मकल्पनांवर, पुरुषप्रधान सत्तेवर तुफानी हल्ला चढवला. नव्या शिक्षणाचे, विचारांचे वारे जसे आपल्या देशात पोहोचले तसे स्त्री हा एक विचार करण्याच्या लायकीचा जीव आहे अशी परिस्थिती निर्माण झाली. आगरकर हे अव्वल दर्जाचे सुधारक होते. समाजात पुरुषांइतकाच मोठा विभाग स्त्रियांचा आहे. केवळ संख्येमुळेच नव्हे तर खऱ्या अर्थाने कुटुंब व समाज प्रगतिपथावर न्यायचा असेल तर सुधारणेच्या परिघात स्त्रियांचा प्रामुख्याने समावेश करावा लागेल व त्यासाठी शिक्षणाच्या इतर अंगांबरोबर स्त्री-शिक्षणाचा महत्त्वपूर्ण विचार व व्यवस्था करावी लागणार आहे, असा आग्रह आगरकरांनी आपल्या निबंधांतून व्यक्त केला.

म. फुले-आगरकर ज्या काळात स्त्री-शिक्षणाची मागणी करीत होते तो काळ या मागणीच्या दृष्टीने अत्यंत विरोधी होता. स्त्रियांना शिक्षण देणे म्हणजे सामाजिकदृष्ट्या काहीतरी विपरीत कृत्य करण्यासारखे आहे असे मानले जात होते. स्त्रियांनी आपले कार्यक्षेत्र उंबरठ्याच्या आत आहे असे मानले पाहिजे. त्याचे उल्लंघन करणे म्हणजे धर्मबाह्य, नीतिबाह्य व पापमय कृती करणे असे मानले जात होते. विद्येचे माहेरघर म्हणून ज्या पुणे शहराचा लौकिक वाढला, त्याच शहरात पंडिता रमाबाईंनी छळवाद सहन करावा लागला, तो शिक्षणाच्या कारणावरूनच होय. आगरकरांनी स्पष्ट केले की, हिंदू धर्मात आणि सामाजिक आचारात जेवढे काही निर्दोष असेल त्याला कशाचीही भीती नाही. त्यासाठी मनू अथवा पराशराच्या आधाराची गरज नाही. पण जे सदोष व अहितकारक असेल ते सारे पाश्चात्त्य ज्ञानकुंडात जळून खाक होणार. तेथे एखाद्या मनू अथवा पराशराची काय कथा? ज्या स्मृतिग्रंथांनी स्त्रियांच्या व्यक्तित्वाभोवती शृंखला आवळल्या आहेत, त्या तोडून टाकण्याची नव्या काळाला गरज वाटते. म्हणून स्त्रियांना शिक्षण देणे गरजेचे आहे असे ठाम मत मांडले. एकदा स्त्रियांना शिक्षण देणे गरजेचे आहे हे मान्य केल्यानंतर सामाजिक सुधारणेसाठी स्त्री-पुरुषांना एकत्र शिक्षण देणे, समान शिक्षण देणे कसे आवश्यक आहे, हे आगरकर स्पष्ट करतात. स्त्रियांना शिक्षण दिले तर घरकाम कोण करणार? असा खुळचट प्रश्न जेव्हा त्यांना करण्यात आला तेव्हा ते म्हणतात, "स्त्री-पुरुषांस एकत्र शिक्षण दिल्यामुळे कित्येक पुरुषांस घरी बसून मुले खेळविण्याचे, लुगडी धुण्याचे, भांडी घासण्याचे, स्वयंपाक करण्याचे, दळण-कांडण करण्याचे काम करावे लागले तर त्याला आम्ही काय करावे? यासाठी ही कामे स्त्रियांनीच करावीत हा काही ईश्वरी नियम नाही. तसेच मुले जी होतात ती स्त्रियांना होतात म्हणून त्यांनीच ती कामे केली पाहिजेत असे कोणास सिद्ध करता येणार नाही."

स्त्रियांच्या शिक्षणास केवळ प्राथमिक शिक्षणापर्यंतची मर्यादा घालून चालणार नाही, तर उच्च शिक्षणापर्यंत ते त्यांना द्यावे लागणार आहे. ही आपली भूमिका आगरकरांनी स्पष्ट केली. त्याबरोबर या संदर्भात तथाकथित धर्ममार्तंड, भेकड, मत्सरी, बुद्धिमान काय म्हणतील हेही त्यांनी पुढील रोखठोक शब्दांत सांगितले, "मुलांच्या बरोबर मुलींच्या शिक्षणाविषयीही चर्चा सुरू झाली तर मुलांप्रमाणेच मुलींनाही प्राथमिक शिक्षण जरूर आहे, अशी या स्वनियुक्त लोकप्रतिनिधींची खात्री होण्यास किती वेळ लागेल कोण जाणे. बहुधा साऱ्या मुलींस प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे हे विधान त्यांच्या

पसंतीस पूर्णपणे कधीही उतरणार नाही. पण लोकलाजेस्तव ते त्याला आपली बाह्यात्कारी कबुली दाखवू लागले तरी ज्या वेळेस मुलींस मुलाप्रमाणे मध्यम किंवा वरिष्ठ शिक्षण द्यावे किंवा नाही असा प्रश्न निघेल तेव्हा ते त्याचा निषेध करण्यासाठी आपल्या बुद्धिसामर्थ्याची, लेखनकुशलतेची व वाक्पांडित्याची पराकाष्ठा करून सोडतील याबद्दल आम्हांला शंका नाही. पुढे मागे इतर न्याय्य, अवश्य व कल्याणप्रद गोष्टींप्रमाणे या गोष्टीतही सुधारकांचा वरचष्मा झाल्यावर या हताश, विचारशून्य, भेकड, मूर्ख अथवा आपमतलबी आणि कोडग्या लोकांस आपली डोकी गुडघ्यांत घालून मुळूमुळू रडत बसावे लागेल.''

स्त्रियांना शिक्षण दिल्याशिवाय कुटुंब व समाज यांच्या व्यवस्थेची घडी नीट बसणार नाही याची आगरकरांना खात्री होती. त्यामुळेच स्त्री-शिक्षणाची आवश्यकता पटवून देतांना अत्यंत तर्कशुद्ध, बिनतोड युक्तिवाद त्यांनी मांडला. मुलांच्या शिक्षणाची जेवढी जबाबदारी सरकारला घ्यावी लागणार आहे, तेवढीच नव्हे तर त्यापेक्षाही अधिक जबाबदारी मुलीच्या शिक्षणाची आहे व ती सरकारने घेतली पाहिजे. दीर्घ विचार केला असता मुलीचे शिक्षण कुटुंबास व समाजास कसे हितकारक आहे, हे कोणत्याही सुज्ञ माणसास पटेल. स्त्रीवर अपत्यसंगोपनाची जबाबदारी समाज सोपवतो तेव्हा तिला अक्षरशत्रू ठेवून कसे चालेल? असा सवालही आगरकर विचारतात. आगरकरांच्या काळी अनेक तथाकथित प्रतिष्ठितांचा स्त्री-शिक्षणास विरोध होता. त्यांना स्त्री-शिक्षणाची आवश्यकता वाटत नव्हती. किंबहुना स्त्रियांना शिक्षण दिल्यामुळे त्या बिघडतील, दुराचारिणी होतील, अनीतीकारक वर्तन करतील, परिणामी सर्व समाज बिघडेल अशी भल्याभल्यांना खरी-खोटी भीती वाटत होती. पुढे जसजसा काळ बदलला तसतसे या लोकांना स्त्री-शिक्षणाला उघड विरोध करणे जड झाले. पण त्यांचा विरोध पूर्णपणे संपला असे नाही. त्यांनी स्त्रियांचे शिक्षण वेगळ्या प्रकारचे असावे, वेगळ्या वर्गात असावे, वेगळ्या पद्धतीने दिले जावे असे लंगडे पर्याय सुचवण्यास सुरुवात केली. आपल्या मताला वजन प्राप्त व्हावे यासाठी त्यांनी इंग्लड, अमेरिकेतील समाजपद्धतीची अर्धवट माहिती रंगवून सांगण्यास सुरुवात केली. इंग्लंड, अमेरिकेची म्हणून सांगितली जाणारी उदाहरणे तपासून न बघता त्यावर विश्वास ठेवणे वेडगळपणाचे होईल असा इशारा आगरकरांनी दिला. त्याबरोबरच स्त्री-शिक्षण म्हणजे अनीतीचा आरंभ हे समीकरण तर त्यांनी साफ उडवून दिले.

आगरकरांनी शिक्षणविषयक विचार किती व्यापक अंगांनी केला होता, आणि तो त्यांच्या किती जिव्हाळ्याचा विषय होता, हे स्पष्ट करताना स.

मा. गर्गे म्हणतात, "खरे तर आगरकरांनी आपले सर्व आयुष्य शिक्षणदान आणि शिक्षणप्रसार यासाठीच वाहिले होते. डेक्कन कॉलेजमधून आपले शिक्षण संपवून ते बाहेर पडले. आणि न्यू इंग्लिश स्कूलमध्ये अल्प वेतनावर त्यांनी शिक्षक व्यवसाय पत्करला. त्यानंतर फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रथम प्राध्यापक व नंतर प्राचार्य म्हणून काम केले. वृत्तपत्रीय जीवनातही त्यांनी सतत पंधरा वर्षे समाजाला शिक्षण देण्याचेच व्रत चालवले. या सर्व शिक्षणविषयक प्रयत्नांत त्यांना जे अनुभव आले, समाजाचे जे दर्शन घडले त्यावरून त्यांनी जी जीवनदृष्टी स्वीकारली त्यातही शिक्षणाचेच महत्त्व त्यांनी सातत्याने व विविध प्रकारांनी स्पष्ट केले. साक्षरता सर्वत्र हवी. केवळ साक्षरताच नव्हे तर, प्राथमिक शिक्षणातील संधी समाजातील प्रत्येक स्त्री-पुरुषांस मिळाली पाहिजे. ते सक्तीने दिले जावे हा आगरकरांचा विचार त्यांच्या मृत्यूनंतर पंधरा वर्षांनी म्हणजे १९१० साली गो. कृ. गोखले यांनी पुढे आणला. वरिष्ठ कायदेमंडळात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे असा ठराव त्यांनी मांडला. परकीय सत्तेमुळे त्या वेळी त्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही. भारत स्वतंत्र झाल्यावर १९५० साली राज्यघटनेत सर्व नागरिकांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे अशी तरतूद करण्यात आली. पण ती तरतूद पूर्णपणे अद्यापही अमलात आलेली नाही. आगरकरांचा विचार शंभर वर्षांपूर्वीचा होता. आणि तोही किती खंबीर भूमिकेवर उभारला होता, हे विचार करावयास लावणारे आहे.

लोकशिक्षण म्हणजे तरी काय? आगरकरांनी यासंबंधीही स्पष्टीकरण केले आहे. आणि ते आजही विचारात घेण्याइतके उपयुक्त आहे. ते म्हणतात, "लोकशिक्षणाविषयी विचार करताना गोंधळ होऊ न देण्याविषयी ज्या दोन गोष्टी नेहमी डोळ्यांपुढे ठेवल्या पाहिजेत त्या अशा, लोकशिक्षण म्हणजे उच्च प्रतीचे किंवा धंदे शिक्षण नव्हे. लहानापासून थोरास व गरिबांपासून श्रीमंतास नित्याच्या व्यवहारात घडोघडी उपयोगी पडणारे असे जे बुद्धिविकासक अत्यंत स्वल्प, प्राथमिक शिक्षण. त्याचाच सक्तीच्या शिक्षणात अंतर्भाव केला पाहिजे. कोणत्याही प्रकारच्या धर्ममताशी या शिक्षणाचा बिलकूल संबंध नाही. तसेच या शिक्षणापासून चरितार्थ चालवण्यास उपयोगी पडणाऱ्या कोणत्याही धंद्याचे ज्ञान प्राप्त होत नाही. तसेच अशा प्रकारच्या शिक्षणाविषयी सक्ती करणे म्हणजे अमुक प्रकारच्या शाळांत अमुक प्रकारची फी देऊन अमुक वर्षे मुले पाठवणे असाच केवळ अर्थ नाही, तर अमुक एक शिक्षण अमुक एक वर्षाच्या आत प्रत्येक मुलीस मिळण्याची खबरदारी त्यांच्या आईबापांनी किंवा पालकांनी घेतलीच पाहिजे. न घेतल्यास ते अमुक दंडास पात्र होतील

असा अर्थ आहे. प्रजेचे हित चिंतणाऱ्या प्रत्येक सरकारने असा नियम करून तो अमलात आणावा व त्याकरिता लागेल तेवढा खर्च आनंदाने करावा असे आमचे मत आहे.''

शिक्षणविषयक एवढी स्वच्छ, नि:संदिग्ध आणि आग्रही भूमिका म. फुल्यांचा अपवाद करता आगरकरांच्या काळात अन्य समाजसुधारकाने मांडली नसावी. प्राथमिक शिक्षण म्हणजे धंदे शिक्षण नव्हे, प्राथमिक शिक्षणात त्या काळात तरी लेखन, वाचन आणि साधे अंकगणित यांचा अंतर्भाव केला जात असे. आजही ती कक्षा ओलांडली नाही. असे शिक्षण देशातील प्रत्येक व्यक्तिमात्रास मिळावे. तसेच मुलाला व मुलीला मिळावे आणि त्यासाठी सरकारने लागेल तो खर्च करावा. असे प्राथमिक शिक्षण देणे सरकारचे आवश्यक कर्तव्य आहे. अशी शिक्षणविषयक त्रिसूत्री आगरकरांनी सांगितली.

आपल्या देशात विद्येचा सारा मक्ता ब्राह्मणांकडे असल्याने पिढ्यान्‌पिढ्या इतर सर्व लोक अडाणी राहिले. इंग्रजांनाही आपण वरच्या वर्गातील काही लोकांना सुशिक्षित केले की ते शिक्षण आपोआप तळागाळांतील जनतेपर्यंत येऊन पोहोचेल असा झिरपण्याचा सिद्धान्त मान्य होता. त्याविरुद्ध आगरकरांनी म. फुल्यांप्रमाणे तोफ डागली. आणि प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे आणि ही जबाबदारी सरकारचीच आहे व सरकारला यापासून पळ काढता येणार नाही असे ठणकावून सांगितले. आगरकर म्हणतात, ''आमच्या सांप्रत स्थितीचा जो कोणी शांतपणे विचार करील त्याला लोकशिक्षणाशिवाय आमची स्थिती सुधारण्याचा दुसरा उपाय नाही असे दिसून आल्याशिवाय राहणार नाही. सरकारपाशी ते काम तडीस नेण्याइतके पैसे असोत किंवा नसोत, सरकारने किंवा लोकांनी हे काम मनापासून हाती घेतल्याशिवाय आमची खरी टिकावू व वाढत जाणारी सुधारणा होण्याचा बिलकुल संभव नाही.''

आगरकरांच्या शिक्षणक्षेत्रातील कार्याबद्दल जे गौरव उद्‌गार त्यांच्या चरित्रकारांनी काढले आहेत त्यांपैकी पुढील काही निश्चितच मननीय व आजही मार्गदर्शक ठरणारे आहेत. ''आगरकर हे हाडाचे शिक्षक होते. न्यू इंग्लिश स्कूल ते फर्ग्युसन कॉलेजच्या प्रवासात त्यांनी बारा वर्षे अध्यापनाचे काम केले. आजच्या कॉन्व्हेंट संस्कृतीप्रमाणे शंभर वर्षांपूर्वी इंग्रजीचा विचार आणि मातृभाषेचा तिरस्कार करणारी काही मंडळी होतीच. पण आगरकरांना लोकशिक्षणाची तळमळ आणि समाजाच्या शैक्षणिक गरजांची ओळख होती. म्हणूनच त्यांनी शिक्षण हे मातृभाषेतच असले पाहिजे असा आग्रह धरला.

त्याविषयी ते म्हणतात, "अगोदर देशी भाषांचा अभ्यास होऊ लागण्यात व पुढे त्या भाषांतच अभ्यास होऊ लागण्यात या देशाचे खरे हित आहे. अशी तुमची पक्की खात्री असेल तर युनिव्हर्सिटीचे नाक धरून तिच्याकडून या अप्रिय औषधाचा स्वीकार करवणे अशक्य आहे काय? मातृभाषेचा असा आग्रह धरण्यांत केवळ राष्ट्रवादाची अस्मिता नव्हती तर ती काळाची गरज होती."

# ३. आगरकरांचे अंधश्रद्धा निर्मूलनाबाबतचे विचार

आगरकर हे समाजसुधारक होते. सामाजिक सुधारणा झाली पाहिजे, हे सांगणाऱ्यांना ती का झाली पाहिजे? कशी झाली पाहिजे? इत्यादी अनेक प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतात. ही उत्तरे तर्काला, बुद्धीला व वर्तमानाला पटणारी तर असावी लागतातच परंतु त्यांनी भविष्याची दिशा दाखवणेही आवश्यक असते. अर्थातच सामाजिक सुधारणेचा ध्यास धरणे म्हणजे एखादे स्वप्न पाहणे नव्हे, तसेच ती भाबडेपणाने करायची गोष्ट नव्हे. फुले, आगरकर, आंबेडकर, शाहू महाराज यांसारख्या कोणत्याही समाजसुधारकाने आपल्या कामाला भाबडेपणाने वा भोंगळपणाने हात घातला नव्हता. पिढ्यान्‌पिढ्यांचा रूढींचा गंज जेव्हा समाजमनावर साठला जातो तेव्हा तो दूर करण्यासाठी सुधारणेच्या विचारांना बुद्धिवादाची, वैज्ञानिक दृष्टीची व तेवढ्याच खंबीर कृतीची साथ असावी लागते. आगरकरांच्या विचारसरणीत बुद्धिवाद ही अत्यंत महत्त्वाची बाब होती. त्यांच्या विचारात गतिशीलतेला महत्त्वाचे स्थान होते. विश्व हे स्थितिशील नसून गतिशील आहे. प्रत्येक गोष्टीत बदल होत असतो, तो त्याला थांबवता येत नाही. विचारी माणसांचे काम असते की, बदल समाजहिताचा कसा होईल, तो तसा होण्यासाठी आपण त्याला कसे साहाय्य करायचे? विश्वाच्या गतीत आपली गती मिळवणे यालाच गतितत्त्व असे म्हणतात. सनातनी लोकांना गतितत्त्व मान्य नसते. 'इष्ट असेल ते बोलणार आणि शक्य असेल ते करणार' हा निर्धार अत्यंत पुराणप्रिय, सनातनी लोकांच्या समाजात कोणत्याही विरोधाला न जुमानता आगरकर खणखणीतपणे व्यक्त करत होते. याचे कारण आगरकरांना गतीचे तत्त्व पटले होते. विश्वाचे गतितत्त्व पटले, पण बदल होणारच आहे, तेव्हा आपण काहीही हालचाल करण्याची गरज नाही, असा आपसूकवाद आगरकरांनी स्वीकारला नाही. बदल

जर अपरिहार्य आहे, तर तो होण्यासाठी आपण जाणीवपूर्वक प्रयत्न केला पाहिजे असे आगरकरांचे मत होते.

प्रवाहपतित सनातनी म्हणजे विचार न करता कोणत्याही बदलाला विरोध करणारे व सनातनी सुधारक म्हणजे बदल होणार आहे, आपण कृती करून समाजाचा रोष का ओढावून घ्यायचा असे मानणारे. या दोघांनाही आगरकर एकाच माळेचे मणी समजत. गतीलाही काही नियम असतात, म्हणूनच समाजसुधारण्याच्या कार्यात स्थितीच्या व गतीच्या मर्यादा ओळखूनच गतितत्त्व आखावे लागते. आगरकरांच्या लिखाणात व विचारात या पद्धतीचा अवलंब केलेला दिसतो. थोडक्यात, "कोठेही आदळलात तरी हरकत नाही पण कुठे तरी धावत चला" असला कारभार आगरकरांना मान्य नव्हता. आगरकर हे शास्त्रीय गतितत्त्वाचे पुरस्कर्ते होते.

आगरकरांच्या वैचारिक उदयापूर्वी महाराष्ट्रात एका बाजूने आधुनिक विज्ञानाचा प्रवेश होत होता. पाश्चात्त्य विद्येचा प्रसारही होत होता. युरोपियन संस्कृतीच्या स्वागताची आवश्यकताही व्यक्त केली जात होती. आणि त्याबरोबरच कडव्या धर्मभावनेचे, नव्या विद्येला, नव्या विज्ञानाला आणि त्याच्या अनुषंगाने आकार घेत असलेल्या नव्या संस्कृतीला अत्यंत प्रखरपणे प्रतिकारही केला जात होता. या दोन संस्कृतींच्या, वैज्ञानिक प्रगतीच्या आणि ऐहिक दृष्टिकोनाच्या बाजूने त्यांनी आपले विचार मांडले. त्यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाचे ते एक थोर उद्गाते ठरले.

कोणत्याही समाजात अंधश्रद्धेचा प्रारंभ प्रामुख्याने त्या समाजाच्या धार्मिक जीवनातच होत असतो. धर्माचा उदय विकासाच्या एका विशिष्ट टप्प्यावर झाला. प्राथमिक अवस्थेतील मानव वादळ, पाऊस, वारा, पूर, आग इत्यादी नैसर्गिक घटनांमुळे गोंधळून गेला. गरिबी व अज्ञानामुळे तो भयभीत झाला. तो सुखी व भयमुक्त जीवनासाठी धडपडत होता. या नैसर्गिक घटनांच्या मागे कोणतीतरी एखादी शक्ती असली पाहिजे, अशी त्याची धारणा झाली. धर्माच्या उदयाची समाजजीवनात हीच जागा आहे. या महाकाय शक्तीची आराधना करून तिचा कोप कमी व्हावा म्हणून माणूस विचार करू लागला. या शक्तीला अलौकिक गुण चिटकवू लागला. बळी देण्याने ती शक्ती शांत होईल, यज्ञयागासारख्या विधीने तिला वश करता येईल, प्रार्थना करण्याने ती प्रसन्न होईल अशा समजुतीतून धर्माचा उदय झाला. इंद्र, वरुण, सूर्य, अग्नी व आकाश या पंचमहाभूतांची प्रार्थना यातूनच सुरू झाली. ही प्रार्थना

सुरुवातीला समाजहिताच्या हेतूनेच केली जात होती. आपले जीवन कमी कष्टाचे, सुखाचे व्हावे या भौतिकवादी दृष्टीनेच ती केली जात होती. इष्ट ते प्राप्त व्हावे, अनिष्टांचे निवारण व्हावे ही त्यामागची भावना होती. देव-देवतांना प्रसन्न करून घेण्यासाठी त्याने यज्ञयागाची सुरुवात केली. यज्ञात टाकलेल्या आहुती त्या दैवी शक्तीला मिळतील, त्या प्रसन्न होतील ही भावना त्यामागे होती. आदिम समाजातील माणूस जेव्हा आकाशाकडे पाहत होता, तो स्वर्ग शोधण्यासाठी किंवा देवाचा शोध घेण्यासाठी नव्हे तर धनधान्यांची समृद्धी येण्यासाठी, शेतीला पाणी मिळावे, पावसाचा ढग कोठे आहे याकडे तो पाहत होता. त्याचप्रमाणे अग्नीचा शोध त्याने अग्नीची पूजा करण्यासाठी लावला नाही, तर तिच्या उपयोगाने आपले ऐहिक जीवन सुखी व्हावे यासाठी लावला. या सर्व धडपडीतून बळी देणे, प्रार्थना करणे, यज्ञ करणे यांसारख्या श्रद्धा उदयाला आल्या. निसर्गशक्तीच्या अज्ञानामुळे व त्यांना वश करण्यासाठी केलेल्या पूजापाठामुळे तो श्रद्धाळू बनला. भौतिकवादी दृष्टिकोनाची जागा श्रद्धेने घेतली. श्रद्धापूर्वक करायचे विधी योग्य पद्धतीने सांगणारा एक खास वर्ग तयार झाला. या पुरोहितवर्गाने देव-देवतांची संख्या वाढवली. भौतिकवादाचे पोषण करण्याऐवजी अंधश्रद्धेला खतपाणी घातले, कारण ते त्यांच्या हिताचे होते.

हिंदू धर्मावर आगरकरांनी कडक शब्दात टीका केली आहे. कारण इतर धर्माप्रमाणे हिंदू धर्मातही अनेक खुळचट आचार, समजुती, अंधश्रद्धा यांचे पीक अमाप आहे. हिंदू धर्म मनुष्याच्या सुखी, समृद्ध व वर्तमान जीवनाची फारशी काळजी न वाहता पारलौकिक जीवनावर अधिक भर देतो. माणसाच्या वाट्याला आलेले जीवन व्यर्थ कसे आहे, ते क्षणभंगुर कसे आहे, तो एक पाण्याचा बुडबुडा, मायेचा खेळ आहे, अशा प्रकारे ऐहिक जीवनाबद्दल निराशेचा दृष्टिकोन हिंदू धर्माने निर्माण केला. त्यामुळे जीवनाचा आनंद घेणे; नवनवीन भौतिक साधने निर्माण करणे; व्यक्तिमत्त्व सर्वांगाने समृद्ध करणे असा उत्साह, जोश, आशावाद, हिंदू धर्मातून हद्दपार करण्याचेच जणू जाणीवपूर्वक प्रयत्न झाले. सृष्टीतील संकटांपासून मानवाचे रक्षण करणे हे धर्माचे उद्दिष्ट होते. म्हणजेच धर्म आत्मसंरक्षणाच्या गरजेतून निर्माण झाला होता. माणूस जसजसा शहाणा होऊ लागला; आपल्या सभोवतालच्या सृष्टीच्या विविधांगी परिसराला ओळखू लागला; निरीक्षण करू लागला; विचार करू लागला; तसतसे सृष्टीतील संकटांपासून संरक्षण करण्याचे काही उपायही त्याने शोधून काढले. प्राथमिक अवस्थेतील माणसांचा धर्म अज्ञानावर आधारलेला

होता. त्यामुळे त्याला कोणत्याही घटनेची कार्यकारणमीमांसा करता येत नव्हती. परंतु नंतरच्या काळातही ज्ञानाचे दरवाजे बंद करणे हा धर्माचा गंभीर दोष आहे.

धर्मग्रंथांमध्ये जे सांगितले असेल तेच अंतिम सत्य आहे. त्याची चिकित्सा करायची नाही. धर्माचे नेतृत्व करणारा पुरोहितवर्ग जेव्हा अस्तित्वात आला तेव्हा त्याने धर्मग्रंथ हे पूर्णपणे निर्दोष असल्याची भूमिका घेतली. धर्मग्रंथ मानवनिर्मित आहेत असे सांगितल्यावर लोकांचा त्यावर विश्वास बसणार नाही हे ओळखून हे ग्रंथ अनादी, अपौरुषेय, ईश्वरनिर्मित आहेत व ईश्वर सर्वज्ञानी आहे, असा सिद्धान्त त्यांनी मांडला तेव्हा ईश्वराला शरण जाऊन या ग्रंथाविषयी कसलीही शंका घेऊ नये, नव्हे अशी शंका घेणे पाखंड आहे, पाप आहे असा दबाव जनसामान्यांच्या मनावर, विचारांवर निर्माण केला. या धर्मग्रंथांनी जे जे सांगितले आहे ते ते माणसांनी श्रद्धापूर्वक व अत्यंत नम्रपणे स्वीकारले पाहिजे अशी व्यवस्था निर्माण करण्यात आली. यातूनच ईश्वरावरील अज्ञानी माणसांच्या श्रद्धेच्या काळाच्या ओघात अनेक गोष्टींचे ज्ञान जरी माणसाला झाले तरी श्रद्धेचे अंधश्रद्धेत रूपांतरही झाले.

आगरकरांच्या मते या अवस्थेमुळे जन्माधिष्ठित जातिव्यवस्था व धर्मसंस्था यांच्यामुळे व्यक्तिविकास खुंटला. स्त्री-दलित यांच्यावरील अन्यायच केवळ वाढले असे नाही तर त्यांच्या जीवनास गुलामीची, पशूची अवस्था प्राप्त झाली. आगरकरांचे मन मृदू, संवेदनाक्षम व भावनाप्रधान होते. अन्यायाची तीव्रता अंतःकरणाला जाणवली की, त्यांच्या विचारांना गती मिळे. विचार करताना मात्र ते भावनेच्या आहारी कधीही गेले नाहीत. बुद्धिवादाच्या आधारावर त्यांचा विचार निश्चित झाला. आगरकर समाजाच्या जीवनात ज्या रूढी, अंधश्रद्धा गोंधळ घालत आहेत, त्यावर आक्रमकपणे लिहू लागले. ते ज्या रूढींवर, अंधश्रद्धांवर हल्ला करीत होते त्यांच्यावर त्यांच्याही अगोदर न्या. रानडे यांनी लिहिले होते. मात्र दोघांच्या लिखाणात महत्त्वाचा फरक होता. न्या. रानड्यांनी सुधारणांचा पुरस्कार करताना धर्मग्रंथांचा आधार घेतला होता. परंतु आगरकरांनी हे ग्रंथप्रामाण्य साफ धुडकावून लावले. स्मृतिकारांनी स्त्री-स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी काही वचने लिहिली आहेत का, याचा काथ्याकूट करीत न बसता स्त्री-स्वातंत्र्य ही कल्पना बुद्धीला पटल्यानंतर कोणाच्याही विरोधास न जुमानता तिचे समर्थन व स्वीकार केला पाहिजे, अशी आगरकरांची भूमिका होती. वेदउपनिषदादी ग्रंथांचे प्रामाण्य, अगर थोर व्यक्तींच्या शब्दांचे प्रामाण्य  अशा कुबड्या आधाराला घेऊन सुधारणा समाजाच्या गळी उतरवणे

आगरकरांना योग्य वाटत नव्हते. आगरकरांच्या एकूण लेखनामध्ये आणि विचारामध्ये विवेकशीलता, बुद्धिप्रामाण्य, वैज्ञानिकता यांचे महत्त्व विशद केलेले जसे दिसते तसेच धर्म, रूढी, परंपरा यांच्या प्रामाण्याला विरोध केलेलाही दिसून येतो. त्यांच्या काही निबंधांचा जरी आपण वानगीदाखल आढावा घेतला तरी आगरकरांचा अंधश्रद्धाविरोध किती प्रखर व व्यापक स्वरूपाचा होता याचा आपणास प्रत्यय येऊ शकतो.

'आमचे दोष आम्हांस कधी दिसू लागतील?' या निबंधात आगरकर स्पष्ट करतात की, देशाभिमान जरूर असावा. परंतु आज आमची सर्वच क्षेत्रांत जी घसरण चालू आहे, ती थांबवून पुढे जाण्याचा विचार करण्याऐवजी आम्ही पूर्वी कसे श्रेष्ठ होतो, पुढारलेले होतो, युरोपियन कसे मागासलेले होते, यांचाच जेव्हा घोष केला जात होता तो कसा चुकीचा आहे, हे स्पष्ट करण्यासाठी आगरकरांनी हा निबंध लिहिला. पूर्ववैभवाचे अनाठायी 'गुणगान' करण्याचे आम्ही सोडले नाही तर आज आमच्यात कोणते दोष आहेत, त्यांची कशी वाढ होत चालली आहे हे आपणास कळणार नाही असे आगरकरांना वाटत होते. हिंदू धर्मात 'गाय' पावित्र्याचे, देवत्वाचे प्रतीक मानली जाते. एवढेच नव्हे तर हिंदू-मुस्लिमांच्या दंग्या-धोप्यांमागचे ते एक प्रमुख कारण मानले जाते. तेव्हा गाईला आपण प्रारंभापासून, इतिहास काळापासून पवित्रच मानले, तिच्या संरक्षणाची नेहमीच काळजी वाहिली असे समजणे ही एक अंधश्रद्धा होय. वस्तुस्थिती अशी आहे की आमच्या इतिहासाचा जर मागोवा घेतला तर, "प्रसंग विशेषी गाईचादेखील समाचार घेण्यास आम्ही मागेपुढे पाहत नव्हतो. आम्हीही पूर्वी गोमांस भक्षक होतो. केवळ गतवैभवाचे गाणे लावले म्हणजे आपले दोष झाकले जाणार नाहीत अथवा आपली सुधारणाही होणार नाही." म्हणून आगरकर म्हणतात, "लिहिता वाचता येणाऱ्या लोकांत ज्यांना दुसऱ्या देशाविषयी कमीत कमी माहिती आहे असे कोणी लोक असतील तर ते हिंदू लोक होत. त्यांना स्वत:चा इतिहास लिहिण्याची आवश्यकता कधीही वाटली नाही, व लिहिण्याची अक्कल आली नाही. इतकेच नाही तर दुसऱ्यांचे इतिहास अवलोकन करून त्यापासून आपली सुधारणा करण्याची पर्वाही त्यांनी कधी केली नाही." थोडक्यात, पुराण कल्पनांवर, मतलबी धर्मग्रंथांवर आम्ही एवढी श्रद्धा ठेवली की, तिचे रूपांतर अंधश्रद्धेत झालेले आमच्या लक्षात आले नाही. त्यामुळे केवळ जीवनरक्षणाशिवाय आमच्या हातून काही झाले नाही. जवळ जवळ दोन हजार वर्षांचा कालखंड आम्ही गतिहीन अवस्थेत घालवला.

आगरकरांनी सुधारकांचे बोलके व कर्ते सुधारक असे दोन वर्ग पाडून एका निबंधात त्यांच्या वैशिष्ट्यांची चर्चा केली आहे. "ज्या वेळेस काही केले तरी समाजातील बहुतेक लोक चांगल्या गोष्टींचा विचार करावयाचे नाहीत इतकेच नाही तर जो ती करण्यास प्रवृत्त होईल त्याचा ते छळ करण्यासही सोडीत नाहीत, अशी स्थिती असते तेव्हा आपल्या विचाराप्रमाणे वागून, छळ सोसून, मरण्यासही जे तयार असतात त्यांना कर्ते सुधारक म्हणता येईल." परंतु ज्ञानप्रसारामुळे लोकांस जेव्हा समज आलेली असते, तेव्हा लोकांपासून अलग न होता, त्यांच्याशी सतत संघर्ष न करता, जे सामोपचाराने वागतात अशा सुधारकांना आगरकर बोलके सुधारक असे म्हणतात. आगरकरांच्या काळी सुधारकांचे हे दोन वर्ग स्पष्ट झाले, त्यांच्या मते त्या वेळी बोलके सुधारक निघण्याचीच जास्त अनुकूलता आहे. लो. टिळक हे 'कर्त्या' सुधारकांचे प्रतिनिधी मानले जात होते. मुलीच्या विवाहाचे वय १६ वर्षे असावे असे त्यांनी सांगितले परंतु प्रत्यक्ष विवाहाची वेळ येऊन ठेपली तेव्हा ते सोळावरून चौदावर आले. म्हणजे प्रत्यक्ष कृती करण्याची वेळ येते, तेव्हा या वर्गाच्या सुधारकांचा पोकळपणा स्पष्ट होतो. समाजात या दोन वर्गांशिवाय सुधारणा-निंदकांचा वर्ग मोठा असतो. त्यांचेही वागणे पहिल्या दोन वर्गांसारखेच आहे. आपण समाजाचे संरक्षणकर्ते आहोत, समाजाचे स्थैर्य टिकवण्याची आपल्यावर जबाबदारी आहे, अशा वल्गना ते करीत असतात. परंतु प्रत्यक्षात मात्र औषधांच्या निमित्ताने मदिरा सेवन करतात, साहेबांशी शेकहॅण्ड करतात, लांबच्या प्रवासात आपल्या स्नानसंध्येला फाटा देतात. त्यांच्या अनिष्ट कामांचा पाढा वाचताना आगरकर म्हणतात, "स्त्रियांस मंत्रोपदेश करण्याच्या निमित्ताने त्यांना व्यभिचारात गोवून टाकणारे, पोथीपुढच्या तांदुळाच्या गाठोड्यावर लक्ष ठेवणारे, लोकांना नीतीच्या गोष्टी सांगून परक्यांच्या घरात हवा तसा अनाचार करणारे, भस्माचे लांबलचक पट्टे, मुद्रांचे छाप, दर्भांच्या मुष्टी, शालजोड्यांचे लपेट, रुद्राक्षांच्या माळा इत्यादींनी सजून नाना प्रकारांची भजने गात, जीवात्मा-परमात्मांची चर्चा करीत बायाबापड्यांना व अज्ञानी लोकांनी फसविणारे दांभिक काही कमी नाहीत."

'न करत्याचा वार शनिवार' या निबंधातही आगरकरांनी आपल्याला पटलेल्या सुधारणा प्रत्यक्ष कृतीत आणताना तथाकथित सुधारकांकडून व सुशिक्षित मध्यमवर्गाकडून ज्या सबबी सांगितल्या जातात, त्यांचा समाचार घेतला आहे. खरे म्हणजे, बऱ्याच लोकांना आपल्या अंधश्रद्धा सोडवत नाहीत. त्यामुळे एखादा समाजसुधारणेचा प्रसंग आला म्हणजे, त्यांच्याकडून युक्तिवाद

केले जातात. त्यांचा मुख्य रोख असा असतो की, सुधारकाने उतावीळ होऊ नये. शक्यतो आपण करू इच्छितो त्या घटनेला शास्त्राधार जर दाखवता आला तर समाज त्या गोष्टी स्वीकारतो. पण हे नेहमीच सत्य असते असे नाही. पुनर्विवाहाच्या पद्धतीची चर्चा करताना, सुधारकाने जातिभेद मोडावेत, हिंदू धर्मशास्त्रातील वेडगळ विवाहपद्धतीचा त्याग करावा, गणगोत पाहू नये अशा प्रकारचे युक्तिवाद केल्यामुळे पुनर्विवाहाला मान्यता मिळत नाही. असा दावा बरीच मंडळी करीत होती. आगरकरांच्या मते पुनर्विवाह करणाऱ्याला तो योग्य वाटला, त्याच्या बुद्धीला तो प्रकार पटला म्हणून त्यांनी तो केला. यामध्ये त्यांना लोकांची मदत मिळणार नाही. त्यांच्यावर बहिष्कार टाकला जाणार आहे. त्यांना अनेक प्रकारचा छळ सोसावा लागणार आहे. हे सर्व स्पष्ट झाल्यानंतर "जातिभेद, विवाहविधी, गणगोत, वगैरे प्रकार ईश्वराने निर्माण केले नसून माणसांच्या अज्ञानांतून ते जन्माला आले आहेत." हे ज्यांना पटले त्यांनी लोकांची खुशामत का करावी? शास्त्राधाराच्या पाठिंब्याची व्यर्थ धडपड का करावी? अशा प्रकारे जो विचार करून पुनर्विवाहाचा निर्णय घ्यावयास निघतो, त्यास समाजाने जर थोडीशी जरी मदत केली असती तर त्यानेही समाजाची पर्वा केली असती. जो समाज विवेकावर आधारलेल्या कृतीस नकार देतो व शास्त्राधाराचा बागुलबोवा उभा करतो, त्या समाजात आपल्या कृतीमुळे फूट पडेल याची काळजी त्याने वाहण्याची जबाबदारी त्याच्यावर नाही. असे आगरकरांचे म्हणणे होते. रूढी, परंपरा, अंधश्रद्धा मोडताना आपली कृती योग्य की अयोग्य याचा निर्णय विवेकाधिष्ठित असतो, असावा लागतो. त्याला शास्त्राचा आधार धुंडाळून काढण्याची गरज नाही. अशा आधाराची मागणी करणे हा पुराणप्रिय मंडळींचा एक डाव असतो.

आगरकर ज्या अंधश्रद्धांवर प्रहार करीत होते, त्यांचे त्यांना अनेक प्रसंगी समाजात दर्शन घडले होते. अशा घटनांवर ते अत्यंत चिकित्सकपणे विचार करून नंतर ते आपले टीकास्त्र सोडीत होते. विशेषतः स्त्रियांच्या संदर्भातील अशा गोष्टींचा, अंधश्रद्धांचा, रूढींचा समाचार घेताना त्यांच्या लेखणीला एक आगळीच धार चढत असे. मुंबईतील एका वृत्तपत्राने बातमी दिली; मुंबईत एक इसम मरण पावला, त्यामुळे त्याच्या पत्नीस एवढे दुःख झाले की तिनेही जीव दिला. त्याबरोबरच या स्त्रीचा साध्वी म्हणून गौरव करण्यात आला. तिच्यावर वृत्तपत्रांतून गौरवपर लिखाण प्रसिद्ध झाले. या घटनेकडे आगरकर एका वेगळ्या दृष्टिकोनातून पाहतात. त्यांचा दृष्टिकोन विवेकावर आधारलेला, अंधश्रद्धेला विरोध करणारा होता. समाजामध्ये बळजबरीने पतीच्या निधनानंतर

सती जाण्यास भाग पाडणाऱ्या अघोरी कृतीविरुद्ध होता. त्यामुळेच त्यांनी प्रश्न केला की, नवऱ्याच्या मरणाची बातमी ऐकून जी स्त्री मरणाला कवटाळते ती पहिल्या नंबरची साध्वी व जिला प्राण घालवण्यासाठी अफूसारख्या एखाद्या विषारी द्रव्याची किंवा आत्महत्या करण्यासाठी विहिरीची प्रार्थना करावी लागते, ती नंबर दोनची साध्वी काय? पती मेला की संसार असार झाला, जगण्याचे कारण राहिले नाही, असे स्त्रियांस वाटून त्यांना सहज मृत्यू यावा किंवा त्यांना आत्महत्या तरी करून घ्यावी अशी अंधश्रद्धा समाजात कौतुकाने जोपासली जात होती. असा विचार फक्त स्त्रीच्या संदर्भातच केला जात होता, पुरुषाला हा निकष लावला जात नव्हता. कारण उघड होते की, ही रूढी, पुरुषांच्या हिताची होती. त्यांच्या बाजूने व त्यांनीच पाडली होती. म्हणून आगरकर विचारतात की, "एकाने दुसऱ्याकरता सहज मरणे, बुद्ध्या मारून घेणे, किंवा नाही ते हाल सोसणे हे इष्ट असेल तर, स्त्री मेल्यावर पुरुषानेही तिच्याबद्दल प्राण सोडणे, प्राणहत्या करणे किंवा वैधव्यव्रताचे सेवन करणे प्रशस्त होईल किंवा झाले असते! पण असे काहीही समाजात होत नाही. सर्व रूढी स्त्रियांवर लादल्या जातात. त्यांचे श्रद्धेतून अंधश्रद्धेत रूपांतर होते."

## विवाहकाळ व संभोगकाळ

इंग्रज सरकारने स्त्रियांच्या संदर्भात काही सुधारणा करण्याचा तो काळ होता. त्या सुधारणांपैकी एक म्हणजे, संमतीचे वय वाढवण्याचे बिल. हे बिल पास होणे म्हणजे सरकारने हिंदू धर्मावर आक्रमण करणे असे काही धर्ममार्तंड सांगत होते. धर्माची ढाल पुढे करून अनेक अहितकारक रूढी, परंपरा तशाच राहाव्यात असा या लोकांचा आग्रह होता. इतरेजनांना खरा धर्म म्हणजे काय? एखादी नवी कल्पना अथवा सुधारणा रूढीच्या विरुद्ध आहे म्हणजे ती धर्माच्या विरुद्ध आहे असे वाटत होते. आचारा-विचारासंबंधी खऱ्या धर्मशास्त्राने काय विशद केले आहे, याची चौकशीही सामान्य माणसे करीत नव्हती. वस्तुस्थिती अशी होती की, धर्मशास्त्रांतही एवढ्या परस्पर विरोधी गोष्टींचे समर्थन केले आहे की, सतीवर होणाऱ्या अत्याचारास धर्मशास्त्रांतून आधार दाखवता येतो. याचा अर्थ असा की, आचार-विचार समाजाच्या कल्याणासाठी ठरवले होते. किंवा त्यांचे तसे स्वरूप राहिले होते असे नाही. बालवयात विवाह झालेली मुलगी शरीराने किंवा मनाने समंजस होण्याअगोदरच तिच्यावर रानटी पद्धतीने झडप घालून संभोगाची हाव पूर्ण केली जात होती. कोणत्याही समंजस माणसाला केवळ विवाह झाला म्हणजे

असा रानटीपणा करण्याची परवानगी दिली आहे असे म्हणता येणार नाही. हा क्रूरपणा स्पष्ट दिसत असतानाही तथाकथित बुद्धिवादी व आपल्या रानटी लालसेचे समर्थन करणारे धर्ममार्तंड मात्र याबाबतीत स्त्रीच्या बाजूने नवा विचार करण्यास तयार नव्हते. म्हणून आगरकर म्हणतात, "ज्या गोष्टीविषयी ज्या ऋषीचे किंवा ज्या स्मृतीचे मत अनुकूल असेल तो ऋषी किंवा स्मृती त्या गोष्टींच्या संबंधाने आम्ही प्रधान मानणार! ज्या अर्थी हवी ती गोष्ट धर्मदृष्ट्या प्रशस्त आहे असे म्हणणारा धर्माचार्य किंवा शब्दचलाखीने ती तशी आहे असे भासवणारा टीकाकार कोणत्याही देशात हव्या त्या वेळी पैदा होण्यास कधीच पंचाईत पडणार नाही, त्या अर्थी विवाहित स्त्रीशी हव्या त्या वेळी संभोग करण्यास कोणाचे तरी वचन आमच्या धर्मशास्त्रांतून काढून देता येणार नाही. असे कसे होणार? लोकांना जो आचार रूढ असेल, तदनुसार एखादा संस्कृत अनुष्टुभ रचून तो जुन्या पोथीत घुसडून देणे सहज शक्य आहे. अशा धार्मिक लबाड्यांमुळे आमच्या धर्मशास्त्राची गती नंदीबैलाच्या झुलीसारखी झाली आहे."

'सोवळ्याची मीमांसा' या निबंधातही आगरकर सोवळ्याच्या जुनाट रूढीवर आपले टीकास्त्र सोडताना दिसतात. या संदर्भात ते म्हणतात की, जे लोक अशा आचारांचे विचारांशिवाय अनुकरण करीत असतात त्यांच्या मनात हे योग्य आहे काय? या प्रसंगाला हे उचित आहे काय? असे कधीही येत नाही. पूर्वापार चालत आलेल्या गाढ श्रद्धांनी, हवे तर अंधश्रद्धांनी मागून आलेले लोण डोळे मिटून पुढे पोहोचवणे एवढेच त्यांच्या दृष्टीने धर्मकर्तव्य असते. हिंदू धर्माचीच काय पण कोणत्याही धर्माची इमारत विश्वास-श्रद्धा यांच्या पायावर उभी असते. धर्म, रूढी, आचार, अंधश्रद्धा यांच्या संदर्भात बुद्धिवादाचे नाव काढले की, धर्ममार्तंडांच्या अंगावर काटा उभा राहतो. ही चर्चा आगरकरांनी उपस्थित केली त्यास कारण घडले. बंगाल प्रांतात भाजीसाठी आणलेले मासे पातेल्यात झाकून ठेवलेले असले व त्यास एखाद्या लहान मुलाने स्पर्श केला की ते विटाळले जातात अशी सोवळ्याच्या संदर्भातील हास्यास्पद समजूत होती. या हास्यास्पद सोवळ्या-ओवळ्याची प्रथा ब्राह्मण जातीतच आहे. सोवळे म्हणजे पावित्र्य व ओवळे म्हणजे अंमगल अशी आपली समजूत झाली आहे. एकदा या दृष्टीने दैनंदिन जीवनातील विविध घटनांकडे पाहण्याची सवय जडली म्हणजे कशा हास्यास्पद रूढी निर्माण होतात हे पाहण्यासारखे आहे. ब्राह्मणांच्या दृष्टीने हरिणाचे कातडे पवित्र, त्यामुळे त्याचा तुकडा जानव्यात अडकवला जातो. पूजा करण्यासाठी आसन

म्हणून हरणाचे अथवा वाघाचे कातडे मंगल मानले जाते. श्रावण महिन्यात गाईचे मूत्रप्राशन पवित्र मानले जाते. परंतु त्या गाईचे कातडे हरीण अथवा वाघ यांच्या योग्यतेचे का मानायचे नाही? याचे उत्तर कोणी देत नाही. नव्या धोतरास विटाळ नाही, कापसाच्या लहानसहान वस्तूंस विटाळ नाही, कुंकवामध्ये रंगवले की, सूतपुतळ्या विधवांनासुद्धा वापरता येतात, परटाने खळ लावलेल्या कपड्यांवर पाण्याचा शिंतोडा मारला की ते सोवळे होतात. हरभऱ्याची डाळ भिजवून वाटली की ती फराळाला चालते, पण ती जर जात्यात दळली तर चालत नाही. दवाखान्यांत कोणत्याही माणसाने कसलेही औषध दिले तर चालते. पण सोडावॉटर प्यायले की ब्राह्मणाला कलंक लागतो. अशा अनेक भाकडकथा, बावळट समजुती सोवळ्या-ओवळ्यांच्या संदर्भात सांगता येतील. या असल्या कल्पनांमुळे हास्यास्पदता उत्पन्न तर होतेच परंतु समाजात भेदभाव निर्माण होतो. अमुक एक वर्ग इतरांपेक्षा श्रेष्ठ कारण तो सोवळे-ओवळे पाळणारा. त्यातून हिंदू धर्मामध्ये ब्राह्मणाशिवाय इतर वर्णांच्या लोकांच्या ठिकाणी अनेक बाबतीत अपवित्रता व अस्पृश्यता मानली गेली. मुसलमान, इंग्रज या राज्यकर्त्या व अधिकारी-वर्गाचा स्पर्श चालतो, त्यांच्याशी हस्तांदोलन करताना ओवळ्याचा विचार येत नाही. परंतु समाजाची सेवा करणारे, अंगमेहनत करणारे, स्वच्छता करणारे अनेक जातींतील लोक मात्र आम्ही अस्पृश्य मानतो. अशा खोटारड्या धर्मकल्पनांची, अंधश्रद्धेची हजेरी आगरकरांनी या निबंधाप्रमाणे इतरत्रही अनेक ठिकाणी घेतली आहे.

धर्माच्या नावाखाली आचरटपणाचे चाळे करण्याचा पारंपरिक सण म्हणजे होळी. अलीकडे या सणाचा प्रभाव आपणास कमी झाल्याचे दिसत असले तरी, तो पूर्णपणे प्रभावहीन झाला आहे असे म्हणता येणार नाही. आगरकरांच्या काळी महाराष्ट्रात हा सण अत्यंत बीभत्स पद्धतीने केवळ धर्माच्या नावाखाली साजरा केला जात होता. 'पांचजन्याचा हंगाम' या लेखात आगरकरांनी या आचरट बीभत्स अंधश्रद्धेच्या रूढींवर कोरडे ओढले आहेत. माघ पौर्णिमेपासून प्रत्येक दिवसागणीक तापमान वाढावे त्याप्रमाणे लोक या उत्सवात सहभागी होत व फाल्गुन पौर्णिमेला होळीची पूजा करून याचा उच्चांक गाठला जात असे. या संपूर्ण काळात सर्वत्र बोंबाबोंब, शिव्यांचा व अश्लील चाळ्यांचा भडीमार होत असे. बरे हा उत्सव होळीपूजनाने संपतोच असे नाही. त्याचे वर्णन करताना आगरकर म्हणतात, "या उत्सवाचा शेवट येथे होता तरीदेखील फार चांगले झाले असते. पण आमचे हिंदू लोक धर्माला खूष राखण्यासाठी फार उत्कंठ असल्यामुळे या राक्षसी, रानटी देवीचा ते पूर्ण पाच दिवस मोठ्या

थाटात उत्सव करतात! तमाशाच्या छकडी, वेश्यांची गाणी, रंगाची शिंपणी या संबंधाचा अप्रशस्तपणा असावा त्याहून वाईट आहे, पण कित्येक ठिकाणी धुळवडीच्या दिवशी जो समारंभ होतो त्यापुढे हा अप्रशस्तपणा सूर्यापुढे काजव्यासारखा फिका पडतो. लहान-मोठे गृहस्थ होळीच्या राखेत शेण, माती व त्याहूनही घाण अशी द्रव्ये मिसळून तयार केलेल्या खातेऱ्यांत पंचामृताने आपआपली अंगे नखशिखांत माखून घेतात व टेंपररी वराहस्वरूप कित्येक मोठ्या हौसेने धारण करतात.''

या अंधश्रद्धेचे समर्थनही मोठ्या आवेशाने केले जात असे. काही समर्थकांचे म्हणणे असे की, होळीमध्ये दूध, तूप, पोळ्या जाळल्याने जो सुवासिक धूर होतो, त्यामुळे वातावरणातील सूक्ष्म कृमिकीटक नाश पावून हवा शुद्ध होते. काहींच्या मते नेहमी चांगले बोलणे, असभ्य शब्द, शिव्या न देणे, एकमेकांची असभ्य टिंगलटवाळी न करणे हे तर चालतच असते. परंतु त्यामुळे मनावर एक प्रकारचा दबाव येतो व तो नाहीसा करण्याचा मार्ग म्हणजे होळीचा सण होय. एवढेच नव्हे तर या बीभत्स सणाला धर्माधार दाखवून देण्यासाठी धर्ममार्तंड धावून येतात. पण त्यांच्या लक्षात येत नाही किंवा ते लक्षात घेत नाहीत, की शिमगा हे खऱ्या धर्मश्रद्धेचे लक्षण नव्हे, हा हिंदू धर्मावर फार मोठा डाग आहे.

अशीच गोष्ट ग्रहणाची आहे. इंग्रज आले, त्याबरोबरच नवी विद्या, विज्ञान आले, नवी साधने आली, शिक्षणाला गती मिळाली. सृष्टिक्रमाचे चक्र आम्हाला समजले नाही. खगोलशास्त्रीय घटनांची सत्यता बुद्धीला पटली तरी मन मात्र अंधश्रद्धेच्या विळख्यातून मुक्त होऊ शकले नाही. आजही एकविसाव्या शतकात अशा कितीतरी अंधश्रद्धा केवळ अशिक्षितांकडूनच नव्हे तर शिक्षितांकडून, उच्चवर्णीयांकडून मोठ्या गाजावाजाने पाळल्या जातात. एकीकडे विज्ञान एवढे प्रगत झाले याची आपण चर्चा करतो आणि दुसरीकडे नवनव्या अंधश्रद्धा, खुळचटपणाच्या गोष्टी आजही पाहिजे तेवढ्या केल्या जातात. नवनवी व्रतवैकल्ये, विधी, उपचार, उपवास यांची रेलचेल अजूनही आपल्या समाजातून कमी झालेली नाही. आगरकर सतर्क होते. ते आपल्या सभोवताली जे जे अनिष्ट घडते त्याकडे केवळ पाहून आजच्या तथाकथित सुशिक्षितांप्रमाणे मूग गिळून गप्प राहू शकले नाहीत. सूर्यग्रहण अथवा चंद्रग्रहण का व कसे होते हे खगोलशास्त्रीय सत्य आता स्पष्ट झाले आहे. त्याचा धर्माशी, मंगल-अमंगलाशी, पूजा-विधींशी काहीही संबंध नाही. त्यामुळे काही दैवी घटना घडतात, उत्पात होतात असे काही नाही. हे सूज्ञ लोकांना समजत

असूनही त्या संदर्भातील गैरसमज दूर करण्यासाठी ही मंडळी पुढे का येत नाहीत? असा प्रश्न करून आगरकर म्हणतात, "आपल्या इकडील तत्त्ववेत्त्यांत आणि शास्त्रज्ञांत एक मोठा दोष दिसून येतो. तो हा की, त्यांना आपल्या समजुतीप्रमाणे आचरण करण्याची उत्कट इच्छा किंवा धैर्य होत नाही." त्यामुळेच आमच्या देशात भास्कराचार्यांसारखे शास्त्रज्ञ होऊन गेले, त्या देशात अजूनपर्यंत सूर्य किंवा चंद्रग्रहण झाले असता; थंड पाण्यात बुड्या मारून बसणे, उपवास करणे, दान देणे, असले प्रकार चालतात. हे प्रकार आजही नवनव्या स्वरूपात दिसतात. तसेच शास्त्रज्ञ म्हणवणारे काही जण सत्तेपुढे मान तुकवून ज्योतिषाला शास्त्र विषयाची पदवी देतात. पुरोहितपणाचे अभ्यासक्रम विद्यापीठात सुरू करतात. थोडक्यात, आगरकरांनी त्यांच्या काळच्या समाजस्थितीकडे पाहून "आमचे अजून ग्रहण सुटले नाही" असे उद्‌गार काढले ते आजही गैरलागू आहेत असे म्हणता येणार नाही.

# ४. भारतीय कला व तिचा विकास

आगरकरांना आपण ओळखतो ते समाजसुधारक म्हणून. सामाजिक सुधारणा म्हणजे विकासाला आड येणाऱ्या जुनाट, कालबाह्य रूढी, आचारविचार, अंधश्रद्धा, भ्रामक प्रतिष्ठा यांना विरोध. त्याबरोबरच काळाशी सुसंगत, प्रगतिशील, आचार-विचारांची स्थापना. कोणत्याही समाजसुधारकाला इतर क्षेत्रांतील नेत्याप्रमाणे लोकानुनय करता येत नाही. आगरकरांची तर प्रतिज्ञाच होती की, "इष्ट असेल ते बोलणार आणि शक्य असेल ते करणार." त्यामुळे पुराणमतवादी, प्रतिगामी, रूढिग्रस्त लोकांच्या दृष्टीने कोणताही सुधारक[१] हा टीकेचा केंद्रबिंदू असतो. आगरकरांनाही हे सर्व प्रहार सहन करावे लागले. परंतु समाजामध्ये सुधारणा घडवून आणण्याची तीव्र तळमळ असल्यामुळे त्यांनी जनसामान्यांचा, अज्ञानी लोकांचा कधीही तिरस्कार केला नाही. ज्या समाजमनांत सुधारणा घडवून आणण्याची इच्छा, ईर्षा निर्माण करायची त्याचा तेजोभंग करणे सुधारणेच्या दृष्टीने कधीही योग्य ठरत नाही. इंग्रजी विद्या, भाषा, संस्कृती यांच्या जोरदार मुसंडीमुळे आपला समाज प्रारंभी भांबावून गेला. शिक्षणाच्या साहाय्याने कालांतराने तो थोडासा स्थिरावला, सावरला. परंतु सावरलेल्या या समाजाच्या मनात आपण अत्यंत मागासलेले, रानटी आहोत. विद्या, कला, संस्कृती, आचार, विचार यांची आपल्याजवळ कसलीही परंपरा नाही. इतर मानवी समाजाला देण्यासारखे आपल्याजवळ काही नाही. या प्रकारचा न्यूनगंड तयार झाला. न्यूनगंडाने पछाडलेला समाज नव्या वाटचालीला कसा तयार होणार? आगरकरांनी हे ओळखले. आपल्या समाजमनाला उभारी यावी, त्याचा आत्मविश्वास व आत्मभान जागे करता यावे, याकरिता त्यांना आपल्याजवळही इतर समाजाला देण्यासारखे काहीतरी आहे; नव्हे ती आपल्या अभिमानाची व अस्तित्वाची ठेव आहे. हे त्यांनी

आपल्या 'भारतीय कला' या विषयावरील चार निबंधांत मांडले आहे. अर्थात येथे कलाशास्त्राचा इतिहास लिहिण्याचा आगरकर प्रयत्न करीत नव्हते. तर आपल्याजवळही इतरांच्या तुलनेने काहीतरी देण्यासारखे, सांगण्यासारखे, जपण्यासारखे आहे याची त्यांना जाणीव करून द्यायची होती.

या उद्देशानेच त्यांनी 'भारतीय कलांचे पुरातत्त्व' या विषयावर निबंध लिहिले. या मर्मग्राही निबंधात त्यांनी पुराणग्रंथांचा आधार घेऊन, बिनतोड युक्तिवाद सादर करून, विविध प्रकारचे पुरावे व उदाहरणे देऊन भारतीय कलांची परंपरा व इतिहास कसा प्राचीन आहे; तो आपला ठेवा कसा आहे; सध्या या संदर्भात काय अडचणी आहेत; आपण आपल्या प्राचीन कलांची जोपासना कशी केली पाहिजे हे सविस्तरपणे व अत्यंत प्रवाही अशा भाषाशैलीत स्पष्ट केले आहे. इतिहास हे एक असे साधन आहे की, त्याची जर विकृत स्वरूपात आपणास हवी तशी मांडणी केली तर ती समाजात विखार, तिरस्कार व द्वेष निर्माण करू शकते. त्यामुळे समाज दुभंगण्याचा धोका निर्माण होतो. आज आपण आपल्या देशात इतिहास-विकृतीकरणाचा धोका अनुभवत आहोत. इतिहासातील घटनांचे, संचिताचे अवाजवी उन्नयन केले तर वर्तमानाचा विसर पडतो, नव्हे वर्तमानाच्या आव्हानाकडे पाठ फिरवून गतकाळात रममाण होण्याची व परिणामी त्या समाजाची अधोगतीकडे जाण्याची वाटचाल सुरू होते. आपल्या देशातील पुराणमतवाद्यांनी व शब्दप्रामाण्य मानणाऱ्यांनी याचा अनुभव दीर्घ काळ आपल्या समाजाला घ्यायला लावला आहे. आगरकर हे दोन्हीही धोके ओळखून होते. कोणताही समाज अथवा संस्कृती दीर्घ काळ काळाचे आव्हान स्वीकारून टिकते तेव्हा निश्चितपणे तिच्यामध्ये काही बळ असते. फार झाले तर काळाच्या ओघात त्याचे विस्मरण होते किंवा आत्मविश्वासाच्या अभावामुळे त्याचे भान येऊ शकत नाही. भारतीय कलांच्या संदर्भात आगरकरांनी हे नेमकेपणाने ओळखले होते. तरीही, त्यांचा विशेष हा की, 'जुन्या ग्रीक किंवा रोमन लोकांच्या इतिहासाइतका आमचा इतिहास आनंदजनक किंवा उत्साहजनक नाही, हे प्रत्येक नि:पक्षपाती हिंदूस कबूल केले पाहिजे', परंतु त्याबरोबरच आगरकरांनी ठामपणे सांगितले की यहुदी, इजिप्शीयन, पार्शी, मुस्लीम, संस्कृतीच्या तुलनेत आपणही कमी नाहीत याचे भान ठेवणे गरजेचे आहे. राज्यलोभाने आपण इतरांवर चालून जाऊन प्राणसंहार घडवून आणला नाही. परंतु आपल्याजवळ नीती, औदार्य, अनुकंपा इत्यादी मानसिक गुण होते. त्याबरोबरच काव्य, चित्र, गायन, वादन इत्यादी ललितकलांचा तसेच दुर्गरचना, गृहरचना, मूर्तिकला, पाषाणखनन इत्यादी

शिल्पकलांचा येथे उदय झाला. त्यांचा विकास झाला. त्यामुळे या कलांच्या संदर्भात आपण इतरांना काही देऊ शकतो, सांगू शकतो.

या कलांची आपणाकडे दीर्घ परंपरा आहे, या समाधानावर आगरकर गतवैभवाचे गाणे गात बसले नाहीत. काळ बदलला, इतर क्षेत्रांत जशा विज्ञान-तंत्रज्ञानाने नव्या नव्या गोष्टी आणल्या, तसाच प्रकार या कलाक्षेत्रातही घडून आला. वाफेच्या शक्तीचा क्रांतिकारक शोध लागल्यामुळे त्याचा प्रभाव शिल्पकलेतही घडून आला. आमचे कलाकार व कारागीर हाताच्या साहाय्याने प्रचंड कष्ट उपसून कलाकृतींना आकार देत होते. आता प्रगत देशात हाताची जागा यंत्राने घेतली. यंत्रापुढे हात दुर्बल ठरला. आपण विचार करायचा तो याचा की, आपल्या कलेच्या दीर्घ परंपरेला यंत्राचे साहाय्य मिळवून देणार की नाही? या यंत्रांचा उपयोग आपण सहज करू शकतो. कारण यंत्राने जी करामत करायची असते ती प्रथम हाताने साधावी लागते. दुर्बिणीने डोळसाच्या दर्शनशक्तीस साहाय्य होते, परंतु आंधळ्यास तिचा काहीएक उपयोग नाही. आपण आंधळे नाही आहोत. आपणास कलेच्या दीर्घ काळाच्या परंपरेची नजर आहे. आपण हस्तकलेत प्रवीण आहोत, त्यामुळे यंत्रकला आपणाला सहज साधणार आहे. या चर्चेचे तात्पर्य सांगताना आगरकर म्हणतात, "अर्वाचीन विस्तृत यंत्रकला युरोपियन लोकांप्रमाणे आम्हांस अवगत नाही, व ती त्यांच्यापासूनच आम्ही शिकली पाहिजे, हे जरी आम्ही प्रांजळपणे कबूल करतो. ती साध्य होण्यास ज्या हस्तकलाप्रावीण्याची आवश्यकता असते, ती हस्तकलाही आम्हांस युरोपियन लोकांपासून उचलली पाहिजे, हे मत आम्हांस मान्य नाही. तथापि आम्ही लवकर जागे झालो नाही तर युरोपीय यंत्रकला आम्हांस साध्य होणार नाही. इतकेच नाही, तर सुमारे तीन हजार वर्षांच्या परिश्रमाने येथे उदयास आलेली जी आमची भव्य हस्तकला तिचाही लोप होईल." या प्राचीन हस्तकलांचा लोप होऊ नये म्हणून काय करावे लागेल याचाही आगरकरांनी विचार केला होता. त्या संदर्भात ते म्हणतात, "ज्यांना कोणाला शक्य असेल त्यांनी युरोपातून यंत्रे आणून त्यावर येथे माल तयार करावयास हवा. त्याबरोबरच आपली जुनी हस्तकला टाकाऊ नाही तर ती टिकाऊ आहे याची जाणीवपूर्वक खात्री निर्माण केली पाहिजे. तसेच या कलेत आपले जे कलाकार निष्णात आहेत, त्यांना अर्वाचीन यंत्रकला शिकविली पाहिजे. थोडक्यात आपल्या हस्तकलेचा युरोपियन लोकांच्या यंत्रकलेशी सहयोग झाला पाहिजे."

प्राचीन काळी या हस्तकला कोणत्या हेतूने जन्माला घातल्या गेल्या? या प्रश्नाचीही चर्चा आगरकर करतात. याबाबतीत त्यांचे मत असे आहे की, जेव्हा आमच्याकडे यंत्राचा प्रसार नव्हता, त्या काळी मूठभर राजे-रजवाडे, धनिक लोक हजारो कारागिरांच्या अथक श्रमांतून या कलांची निर्मिती केवळ आपल्या सुखासाठी व ऐषआरामासाठी करत असत. त्यासाठी येथील तरबेज कारागीर वर्षानुवर्षे राबत असत. या कलाकृतींचा उपयोग सर्वसामान्यांना करता येत नव्हता व जे त्यांचा उपभोग घेत होते, त्यांना या हस्तकलांना यंत्रांची जोड देऊन कारागिरांचे श्रम, वेळ वाचवावी अशी दृष्टी नव्हती. आज जर आपण या कलांना यंत्राची जोड दिली तर, या कला आपण सर्वसामान्य गरिबांच्या उपयोगाच्या करू शकतो. कारण इतिहासाची अशी साक्ष आहे की, ज्या देशात लोकांना आपल्या उपजीविकेसाठी अतिरिक्त कष्ट करावे लागतात, त्यांना रिकामा वेळ मिळत नाही तेथे या कलांची निर्मिती व वाढ होऊ शकत नसते. म्हणजेच कलांच्या विकासासाठी आर्थिक सुबत्ता असावी लागते. त्याप्रमाणे औद्योगिक व नैसर्गिक साधनसंपत्तीची उपलब्धताही गरजेची असते. आपल्या खंडप्राय देशात या साधनांची उपलब्धता इतरांपेक्षा अधिक होती व आहे. गरज आहे ती डोळसपणाची. यंत्राची जोड देण्याची.

म्हणून आगरकर म्हणतात, "प्रथम हिंदुस्थानच्या बाह्य स्वरूपांकडे क्षणभर लक्ष द्या. येथे कशाची वाण आहे काय? उष्ण, शीत किंवा समशीतोष्ण कटिबंधात पैदा होणारी प्रत्येक चीज येथे हवी तितकी सापडते. थंड व डोंगरी प्रदेशात होणाऱ्या वस्तू देण्यास हिमालय आहे, सुपीक प्रदेशातील वस्तुंच्यासाठी सिंधू व गंगेची खोरी आहेत, तांबड्या व काळ्या जमिनीतील व खारट आणि खडकाळ प्रदेशातील उत्पन्नांसाठी आपणाला विस्तृत समुद्रकिनारा लाभलेला आहे. विविध वनस्पती, पशू-पक्षी यांनी आपली भूमी संपन्न आहे. अशा या संपन्न भूमीतील लोकांना आरंभी चरितार्थ चालवण्याची पंचाईत पडली नसावी. त्यामुळेच प्राचीन काळी येथे ज्ञानवृद्धी व कलावृद्धीकडे लोक आकृष्ट झाले असावेत."

भारतीय कलांची निर्मिती किती जुन्या काळापासून होत आहे, या प्रश्नाची चर्चा करताना आगरकरांनी रामायण, महाभारत, मनुस्मृती इत्यादी ग्रंथांचा आधार घेतला आहे. इसवीसनाच्या पूर्वी मनुस्मृती हा ग्रंथ लिहिला गेला असावा असे त्यांचे मत आहे. हा ग्रंथ कलेचा इतिहास अथवा महिमा सांगण्यासाठी लिहिला नाही. परंतु या ग्रंथात ज्या ज्या विषयांची चर्चा आहे त्या चर्चेच्या ओघात अप्रत्यक्षपणे कला व कारागिरी यांचा अनेक वेळा उल्लेख आहे.

त्यावरून मनुस्मृतीच्या पूर्वीपासून आपल्याकडे या कलांची परंपरा होती असे आगरकरांचे मत आहे. त्यामुळे आजच्या कला आम्ही मुसलमान किंवा ग्रीक लोकांपासून घेतल्या आहेत, आमच्याजवळ या क्षेत्रात काहीही नव्हते असा सूर लावणे योग्य नाही. मनुस्मृतीच्या अनेक अध्यायांतील अनेक श्लोकांचा उल्लेख करून आगरकर सांगतात की, मंदिर, मूर्तींची निर्मिती, मंदिराच्या परिसरात तलाव, हौद, विहिरी, पूल, तट, डोंगरी प्रदेशात किल्ल्यांची उभारणी, सपाट प्रदेशात भव्य राजवाडे, कोठारे, हत्यारखाने, प्रवासासाठी रथ, खटारे, गाड्या, लोकर, ताग, कापूस यांची विविध रंगांतील वस्त्रे, अलंकारात पोवळे, मोती, रत्ने, विविध प्रकारची कर्णभूषणे, आरामासाठी आसने, मंच, बिछाने, अत्तरे, विविध प्रकारचे दिवे, हस्तिदंत व शिंगे यांपासून बनवलेल्या विविध कलात्मक वस्तू या सर्वांचा उल्लेख मनुस्मृतीमध्ये येतो. त्याबरोबरच तांबे, रूपे, सोने इत्यादी धातूंची नाणी प्रचारात होती याचीही साक्ष पटते. मनुस्मृतीमध्ये उल्लेख केलेल्या विविध कलात्मक वस्तूंची जशी नोंद आहे, त्याचप्रमाणे या वस्तू बनवणाऱ्या कलाकारांची व कारागिरांचीही दखल मनुस्मृतीने घेतली आहे. सुतार, बुरूड, लोहार, सोनार, शिंपी, कोष्टी, तेली, साळी इत्यादी कारागिरांची नोंद केली आहे. मनुस्मृतीचा काळ म्हणजे वर्णव्यवस्थेचे कठोर समर्थन करण्याचा काळ. या सर्व कारागिरांचाही खालच्या जातीत समावेश करण्यात येत असे. मात्र ते निर्माण करीत असलेल्या कलात्मक वस्तूंचे मोल व महत्त्व लक्षात घेऊन त्यांच्या ज्या हातांनी या वस्तू जन्माला आल्या तो त्यांचा हात मात्र पवित्र मानला जात असे. हा ग्रंथ कलेचा इतिहास अथवा महिमा सांगण्यासाठी लिहिला नाही. परंतु या ग्रंथातील नोंदींचा आधार घेऊन आगरकर भारतीय कलांचे पुराणत्व भारतीय माणसांच्या मनावर ठसवू पाहत होते. मनुस्मृतीच्या काळात येथे तांबे, रूपे, सोने यांची नाणी केवळ प्रचारात होती असे नव्हे तर ती अगदी निर्दोष स्वरूपाची होती असे आगरकरांचे मत आहे. त्याचप्रमाणे या कालखंडात हिंदुस्थानचा परदेशाशी मोठ्या प्रमाणात व्यापार चालू होता, त्यामुळे या देशांबरोबर दळणवळणही सुरू होते. आगरकर शेवटी निष्कर्ष काढतात की, आज सुमारे तीन हजार वर्षे हिंदुस्थानच्या कला आणि कारागीर बहुतेक अंशी आहेत तसे आहेत; त्यांना ग्रीक लोकांनी किंवा मुसलमानी लोकांनी विशेषसे दुखावलेलेही नाही व सुधारलेही नाही व थोडी काळजी घेतल्यास आणखी अनेक शतके त्या कला आणि कारागीर तसेच तगून राहतील! पण हे घडावे कसे? इंग्रजांनी आणलेल्या बाष्पशक्तीपुढे आमच्या हातकारागिरांनी टिकाव धरावा कसा? याला एकच उपाय दिसतो.

तो हा की, आमच्या हस्तकौशल्याचा युरोपीय बाष्पशक्तीशी व यंत्रणशक्तीशी विवाह होऊन त्यांच्या समागमापासून उत्पन्न झालेली संताने जिकडे तिकडे फडकू लागली पाहिजेत!

मनुस्मृतीप्रमाणेच आगरकरांनी कलांचे प्राचीनत्व स्पष्ट करण्यासाठी रामायण व महाभारत या दोन पुराणग्रंथांचा आधार घेतला आहे. आपल्याकडे या प्राचीन वाङ्मयाचा अभ्यास अभ्यासकाच्या हेतूने करण्याऐवजी, कोणी पोथीपुढील तांदुळाच्या लोभाने, तर कोणी बिदागीसाठी करतात. अलीकडच्या काळात केवळ परीक्षा पास होण्यासाठी या ग्रंथांचा अभ्यास केला जातो. परंतु या ग्रंथांकडे इतिहासदृष्टीने पाहून त्यांचा अभ्यास करायला पाहिजे असा आगरकरांचा आग्रह आहे. कारण अशा अभ्यासामुळे भारतीय आर्यांच्या पौराणिक काळातील स्थितीचे प्रत्येक बाबतीत विश्वसनीय, मनोरंजन व बोधावह असे चित्र काढता येईल. त्याबरोबर आगरकर हेही स्पष्ट करतात की, रामायण व महाभारत हे इतिहास-ग्रंथ नाहीत, मात्र त्यांच्याकडे ऐतिहासिक दृष्टीने पाहता येणे शक्य आहे. आगरकर आपल्या विषयासंदर्भात रामायणाचा अभ्यास कसा करत होते, हे वानगीदाखल म्हणून पुढील एका उदाहरणावरून स्पष्ट होते, "रामायणाच्या दुसऱ्या कांडातील एकोणिसाव्या अध्यायांत अयोध्येतील लोक भरतासह रामाचा शोध लावण्यास निघाले आहेत त्याचे वर्णन आहे. यात प्रत्येक धंद्यातील लोक असून धंद्याच्या महत्त्वाच्या अनुरोधाने त्यांच्या रांगा लावल्या आहेत. यात अग्रस्थान जवाहिऱ्यांना आहे, त्यानंतर कासार, हस्तिदंती काम करणारे, गंधी, सोनार, कोष्टी, लोकर विणणारे, सुतार, पितळेचे काम करणारे; चितारी, वाद्ये व शस्त्रे तयार करणारे, तांबट पुतळे तयार करणारे, स्फटिक व कांचकाम करणारे या अनुक्रमाने कारागिरांचा समावेश करण्यात आला आहे." यावरून आगरकर असा निष्कर्ष काढतात की, "रामायणात धंद्यांची जी यादी दिली आहे तीच कोणी झाले तरी आज करील. तेव्हा काय सिद्ध होते की, रामायण काली या भारतभूमीत जे धंदे चालत होते तेच अद्यापही चालत आहेत व ग्रीक लोकांच्या आणि मुसलमान लोकांच्या स्वाऱ्यांनी त्यांत म्हणण्यासारखा फरक झाला नाही. पुढे इंग्रजांनी आपल्या देशावर दीडशे वर्षे राज्य केले. त्यामुळे आमच्या अंतर्बाह्य स्थितीत अनेक बदल घडून झाले. परंतु मुसलमानांच्या पाच-सहाशे वर्षांच्या राज्यकारभारांनी असा आमूलाग्र बदल आमच्या जीवनात व कलांत झालेला नाही."

या विषयावरील आपल्या चौथ्या निबंधात आगरकरांनी वेद ग्रंथांचा आधार घेतला आहे. त्यांनी या ग्रंथांकडेही इतिहासदृष्टीने पाहिले आहे. आपल्या

विवेचनाच्या साहाय्यासाठी श्री. शं. पां. पंडित यांच्या 'वेदार्थयत्ना'चे अनेक अंक उपयोगात आणले आहेत. त्यात वेदांत उल्लेख आलेल्या अनेक कला व कारागिरांची यादी दिली आहे. त्याचप्रमाणे ॲप्युलिअसच्या 'फ्लारिडा'या ग्रंथाचा आधार घेऊन तसेच नेबुचाड्नेझर या राजाने आपल्या देशात कलेच्या मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी हिंदुस्थानातील अनेक वस्तूंचा कसा उपयोग करून घेतला याची सविस्तर माहिती दिली आहे. या सर्व चर्चेचा सारांश असा की, कला व कारागिरीची आमची परंपरा संपन्न व प्राचीन आहे, त्यांचा अभिमान बाळगावा व त्यांचा विकास घडवून आणावा.

# ५. आगरकरांचे व्याकरणविषयक विचार

आगरकर व्याकरणकार नव्हते, प्रबोधनकार होते. शिक्षण, कला, धर्म, राजकारण इत्यादी विषयांवर त्यांनी आपले विपुल विचार मांडले. मतभेद झाला तेव्हा आपल्या मित्राच्या—लो. टिळकांच्या—विरोधात त्यांनी एक प्रकारे वैचारिक संघर्षच उभा केला. संपादक व सुधारक या नात्याने ते विविध विषयांवर अत्यंत अभ्यासपूर्ण व तळमळीने लेखन करीत. या विविध विषयांच्या व्यापात त्यांनी व्याकरणावर का लिहिले, असा प्रश्न प्रथमदर्शनी पडण्याची शक्यता आहे. असंख्य लेखांबरोबरच आगरकरांनी 'आमचे डोंगरीतील १०१ दिवस', 'विकारविलसित' व 'वाक्यमीमांसा आणि वाक्यांचे पृथक्करण' अशा तीन ग्रंथांची निर्मिती केली. व्याकरणावरील शंभर पानांच्या पुस्तकाला आगरकरांनी प्रस्तावना लिहिली आहे. या प्रस्तावनेत व्याकरणावर आपण का लिहितो आहोत हे स्पष्ट केले आहे. आपण या लेखनास का प्रवृत्त झालो, हे सांगताना आगरकर म्हणतात, "एक तर मराठी भाषेस उत्तरोत्तर उन्नत अवस्था येत येणार आहे. अशी खातरी झाली असल्यामुळे व दुसरे, सध्या दुसऱ्या एखाद्या विषयापेक्षा याच विषयांवर चार पाने लिहिता येतील असे वाटल्यामुळे मराठी वाक्यांची थोडीबहुत मीमांसा करून त्यांचे पृथक्करण करण्याच्या कामाला मी हात घातला." व्याकरणाचे महत्त्व विशद करताना ते म्हणतात, "निरनिराळ्या धंद्यातील लोकांना आपले धंदे नीट चालविण्यास ज्याप्रमाणे त्यास योग्य अशा हत्यारांचे साहाय्य घ्यावे लागते, त्याप्रमाणे वक्त्यास व लेखकांस शास्त्रीय विचार व मनोविकार हे श्रोत्यांस व वाचकांस थोडक्यांत आणि सुलभ रीतीने समजाविण्यासाठी व्यवस्थित वाक्यरचना व विस्तृत शब्दसमूह ज्या भाषेत आहेत त्याची मदत घ्यावी लागते."

साहित्यिक व शास्त्रज्ञ आपल्या भावना व विचार व्यक्त करीत असताना नवनवीन शब्द निर्माण करीत असतात. या नवनवीन शब्दांची वर्गवारी, त्यांच्या अर्थाचा शोध हे काम व्याकरणकार व कोषकार करीत असतात. भाषेस सुलभता व सौकर्य आणण्याचे काम व्याकरणामुळे होते. आगरकरांच्या काळी या विषयावर फारशी ग्रंथनिर्मिती होत नव्हती, उलट या संबंधात प्रामुख्याने दोन गैरसमज होते. एक म्हणजे आपल्या देशात अठरापगड जाती व त्यांच्या भाषा आहेत. या सर्व भाषांचे वेगळेपण नाहीसे करून त्यांची एकच एक इंग्रजीसारखी भाषा बनवावी. दुसरे म्हणजे आपल्याकडे मराठी भाषेत अत्यंत अल्प प्रमाणात ग्रंथनिर्मिती होत असताना अशा प्रकारच्या भाषा विषयाच्या कामात आपली मर्यादित शक्ती खर्च करू नये. आगरकरांना ही दोन्हीही मते मान्य नव्हती. या संदर्भात ते म्हणतात, "या देशांत इंग्रजी भाषेचा अभ्यास उत्तरोत्तर वाढत गेला तर त्यांपासून देशी भाषा मागे पडण्याचा संभव नाही. इतकेच नाही, तर उलट त्यांस उत्तेजन येणार आहे, असा आमचा ग्रह झाला आहे. तेव्हा हिंदुस्थानातील पुढे सरसावलेल्या इतर भाषांप्रमाणे मराठी भाषेसही उन्नत अवस्था प्राप्त होऊन तीत उपयुक्त व मनोरंजक ग्रंथसंग्रह दिवसेंदिवस अधिकाधिक होत जावा असे वाटू लागले आहे." आगरकरांचा हा आशावाद किंवा मराठी भाषेसंबंधीचा अभिमान भाबडा किंवा अवाजवी होता असे आज कोणालाही म्हणता येणार नाही. आज आपल्या देशात विविध भाषांतून ग्रंथनिर्मिती होत आहे या दर्जेदार ग्रंथनिर्मितीची दखल घेणाऱ्या संस्था आज राष्ट्रीय स्तरांवर काम करीत आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपण भाषावार प्रांतरचनेचे धोरण स्वीकारून त्या त्या प्रांतांच्या भाषांना प्रोत्साहन दिले आहे. शिक्षणाचा प्रसार जसजसा वाढत आहे तसतसे अगदी तळाचे समाजविभाग मोठ्या जोमदारपणे ग्रंथनिर्मिती करीत आहेत. मराठी भाषेच्या बाबतीत तर अभिमान वाटावा अशी स्थिती निर्माण झाली आहे. दलित, आदिवासी, ग्रामीण, कामगार अशा विभागांतून केवळ कसदारच नव्हे तर साहित्य अकादेमीसारख्या मान्यवर संस्थेने कौतुक करावे अशी ग्रंथनिर्मिती होत आहे. मराठी भाषेला आज अनेकानेक, नवनवीन साहित्यप्रवाह जोमदार बनवत आहेत. जीवनाच्या विविध अंगांचे दर्शन घडवणारी अभूतपूर्व अशी ग्रंथनिर्मिती होत आहे.

आगरकरांपूर्वी व्याकरणावर प्रामुख्याने दादोबा पांडुरंग, कृष्णशास्त्री चिपळूणकर, कृष्णशास्त्री गोडबोले यांनी ग्रंथनिर्मिती केली होती. आगरकरांनी ज्यांचा उल्लेख केला आहे, त्यांच्या जोडीला आणखी एक नाव असणे

आवश्यक आहे, असे व्याकरणकार प्रा. अर्जुनवाडकर यांचे मत आहे. ते म्हणतात, "रेव्हरंड गणपतराव नवलकर यांनी या विषयावर ग्रंथलेखन केले आहे. निदान आगरकरांना हे पुस्तक माहीत नसावे." आपल्या व्याकरणावरील ग्रंथास बेनच्या इंग्रजी व्याकरण ग्रंथाचे झालेले साहाय्य, त्याबरोबरच इतर अनेक पंडितांच्या ग्रंथांत वाक्यार्थमीमांसा केली गेली; त्यांचाही मला उपयोग झाला, अशी स्पष्ट कबुली आगरकर देतात. इतर अभ्यासकांचे या विषयांतील मोठेपण व त्यांचा आपल्या ग्रंथनिर्मितीस झालेला लाभ आगरकर जेवढ्या नम्रपणे मान्य करतात, तेवढ्याच नम्रपणाने व आत्मविश्वासाने सांगतात की, हे सर्व लेखन माझ्याकडून होईल तेवढे वाचनीय करण्याचा प्रयत्न केला आहे. ते पुढे म्हणतात, "फक्त मराठी भाषेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यास, किंवा पुढे ज्यांना इंग्रजी भाषेचा व व्याकरणाचा अभ्यास करावयाचा आहे, अशासही हे पुस्तक उपयोगी पडावे अशी माझ्याकडून मी त्याची रचना केली आहे." आगरकरांनी व्यक्त केलेला हा आशावाद सार्थ आहे. कारण, साधारणपणे व्याकरणासारख्या कठीण विषयाचे लेखन, सोप्या सुलभ भाषेत असत नाही. त्यातही या विषयाची मांडणी मनोरंजक पद्धतीने व नर्म विनोदी शैलीने केलेली सहसा पाहावयास मिळणार नाही. याबरोबरच मुद्दा स्पष्ट करणारी विपुल उदाहरणे आगरकरांनी अत्यंत चटकदार शैलीत दिली आहेत. या विषयावर मराठीत प्रथमच चर्चा होत असल्यामुळे, यात कांही ठिकाणी पाल्हाळ तर काही ठिकाणी अपुरेपणा असणार आहे याचीही त्यांना जाणीव होती.

या ग्रंथाच्या प्रस्तावनेत आगरकरांनी वाक्यमीमांसेचा विचार मांडला, त्यातही व्याकरणविषयक संज्ञा स्पष्ट व निश्चित करण्यासाठी त्यांनी वाक्याविषयी सामान्य विचार सविस्तरपणे विशद केला आहे. वाक्याचे उद्देश व विधेय म्हणजे काय हे स्पष्ट करताना नाम व क्रियापद या पदाच्या व्याख्या देऊन, आगरकर म्हणतात, "वाक्यात दोनच शब्द असले तर त्यापैकी एक उद्देश आणि दुसरे विधेय या सदराखाली आलाच पाहिजे. पण वाक्यात दोनच शब्द असतात किंवा असावेत असा मुळीच नियम नाही. किंबहुना बोलण्यात व लिहिण्यात आपण ज्या वाक्यांचा उपयोग करतो, त्यांत बहुधा दोहोंपेक्षा अधिक शब्द असतात. शिवाय आपल्या मनातील प्रत्येक विचार दोन शब्दांच्याच वाक्यांनी व्यक्त करण्याचा प्रयत्न केला तर बोलणे व लिहिणे फार वाढेल. सगळा अर्थ समजावून देण्यासाठी दोन शब्दांची हवी तशी वाक्ये रचण्यात फार त्रास पडेल व इतके करूनही दुर्बोधता आल्याशिवाय राहणार

नाही. म्हणून वाक्यात दोहोंपेक्षा अधिक शब्द योजण्याचा प्रघात पडला आहे व तो अगदी स्वाभाविक आहे.'' यानंतर आगरकरांनी विशेषण व क्रियाविशेषण म्हणजे काय याची सविस्तर चर्चा केली आहे. तसेच वाक्यपृथक्करणाच्या दृष्टीने उद्देश व विधेय यामध्ये वाक्यांतील शब्दांची कशी वर्गवारी करावी हे स्पष्ट केले आहे. या चर्चेचा निष्कर्ष काढताना आगरकर म्हणतात, ''वाक्यांत वर्णित वस्तू जोपर्यंत एकच आहे व वर्णित क्रियाही एकच आहे, तोपर्यंत दुसरे कितीही शब्द आले तरी त्या सर्वांस त्याच्या अर्थाच्या अनुरोधाने उद्देशाच्या किंवा विधेयाच्या वर्गात टाकता येते. अशा तऱ्हेने वाक्यांची जी व्यवस्था लावली जाते त्याला वाक्यपृथक्करण असे म्हणतात.''

या पुढील भागात क्रियाविशेषण, उभयान्वयी अव्यय, शब्दयोगी अव्यय व सर्वनाम यांची चर्चा करण्यात आली आहे. सामान्यत: उभयान्वयी अव्यये वाक्ये जोडणारे शब्द आहेत अशी त्यांची व्याख्या केली जाते. यामध्ये आगरकरांनी थोडी भर घातली आहे. उभयान्वयी अव्यये दोन वाक्ये तर जोडतातच, पण ती नुसते शब्द जोडीत नाहीत, तर कधी कधी समान शब्दही एकमेकांस जोडून देतात. त्यांचे मुख्य काम वाक्ये जोडणे हे आहे. काही व्याकरणकारांच्या मते उभयान्वयी अव्यये नेहमी वाक्येच जोडतात, शब्द कधी जोडीत नाहीत. या मताशी आगरकर सहमत नाहीत. त्यांनी अशी उदाहरणे देऊन काही स्थळी उभयान्वयी अव्ययांनी फक्त शब्दच जोडले आहेत हे स्पष्ट केले आहे. असाच सूक्ष्म विचार त्यांनी नाम व सर्वनाम यांच्या संदर्भात केला आहे. ते म्हणतात, ''खुद्द सर्वनामांस नामाप्रमाणे अर्थ नाही. पुढे किंवा मागे सांगितलेल्या नामांच्या ऐवजी जेव्हा त्यांचा उपयोग केलेला असतो तेव्हाच ती अर्थवाहक होतात. ज्या नामाबद्दल सर्वनाम योजायचे, ते नाम सर्वनामाच्या अगोदर येऊन गेले असल्यास, त्या नामांशी त्याचा जो संबंध असतो त्यास पूर्वसंबंध असे म्हणतात, पण तेच नाम त्यांच्या मागून आले असल्यास त्याच्याशी त्याचा जो संबंध असतो त्याला उत्तरसंबंध म्हणतात.''

सर्व विवेचनाचा सारांश सांगताना आगरकर स्पष्ट करतात की नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, क्रियाविशेषण, शब्दयोगी अव्यय व उभयान्वयी अव्यय असे व्याकरणकारांनी शब्दाचे मुख्य सात वर्ग केले आहेत. भाषेत त्या त्या अर्थाच्या शब्दांची आवश्यकता पडत असल्यामुळे सर्व सुधारलेल्या भाषांत त्यांची उत्पत्ती आपोआप झाली आहे व ते व्याकरणकारांनी केले नाहीत. या सात वर्गांशिवाय उद्‌गारवाची अथवा केवलप्रयोगी अव्यय हा शब्दाचा आठवा वर्ग. या वर्गात सुखदु:खादी उद्‌गार प्रकट करणारे शब्द यांचा समावेश

होतो. या शब्दांस व्याकरणात फारसे महत्त्व नाही. कारण एक तर ते क्वचित येतात, आणि काहीतरी विधान करणे हे जे वाक्याचे मुख्य काम आहे, त्यास यांच्या साहाय्याने म्हणण्यासारखी मदत होत नाही. काही व्याकरणकारांच्या मते शब्दांच्या आठ जाती न मानता त्या दोन किंवा तीन मानाव्यात व यामध्ये या सर्व जातींचा समावेश करावा. दादोबा पांडुरंग, कृष्णशास्त्री चिपळूणकर, कृष्णशास्त्री गोडबोले या आगरकरपूर्व व्याकरणकारांचे काहीसे असेच मत होते. हीच पद्धत इंग्रज व्याकरणकारांनी स्वीकारलेली आहे. आगरकर मात्र शब्दांचे सात वर्ग करावेत या मताचे आहेत. यासाठी त्यांनी या चर्चेचा त्यांचा संक्षिप्त वर्गानुक्रम खालीलप्रमाणे सांगितला आहे :

१. बाह्य इंद्रियांनी किंवा मनाने ज्ञेय अशा वस्तूंची नावे म्हणजे नाम.

२. असल्या वस्तूविषयी विधान करणारे मुख्य शब्द म्हणजे क्रियापद.

३. पहिल्या वर्गातील शब्दांचा अर्थ वाढवून त्यांची व्याप्ती मर्यादित करणारे शब्द म्हणजे विशेषण.

४. दुसऱ्या वर्गातील शब्दांचा अर्थ वाढवून त्यांची व्याप्ती मर्यादित करणारे शब्द म्हणजे क्रियाविशेषण.

५. पहिल्या वर्गातील शब्दांच्या जागी येणारे स्वतंत्रार्थ शून्य शब्द म्हणजे सर्वनाम.

६. नामार्थक शब्दांशी योग करून घेऊन क्रियाविशेषणाचा अर्थ उत्पन्न करणारे व त्या नामांचा क्रियापदाशी अन्वय लावून देणारे शब्द म्हणजे शब्दयोगी अव्यय.

७. दोन शब्द किंवा दोन वाक्ये जोडणारे शब्द म्हणजे उभयान्वयी अव्यय.

'वाक्यमीमांसा भाग पहिला' या प्रकरणात आगरकरांनी वाक्याविषयी विशेष विचार मांडला आहे. या प्रकरणाच्या सुरुवातीलाच आगरकरांनी, "एका शब्दानेसुद्धा वाक्य होऊ शकते उदाहरणार्थ, उजाडणे" या काही व्याकरणकारांच्या विचारांशी विरोध नोंदवला आहे. आपण या मताला विरोध का करतो, हे स्पष्ट करताना आगरकर म्हणतात, "वाक्य हे विचाराचे बाह्यांग आहे. मनापुढे दोन पृथक कल्पना उभ्या असल्याशिवाय विचार चालत नाही, हे खरे आहे. तर दोन शब्दांशिवाय वाक्य होऊ शकेल, हे म्हणणे व्यर्थ आहे. जे कोणी आग्रहाने असे म्हणत असतील त्यांना वाक्य आणि शब्द

यांतील भेदच समजत नाही, असे म्हणावे लागेल.'' काहीतरी अर्थाचा बोध करून देणे, हे शब्दाचे काम होय, तर काहीतरी विधान करणे हे वाक्याचे काम होय. हे जर लक्षात घेतले तर आगरकर म्हणतात त्याप्रमाणे एका शब्दाचे वाक्य होऊ शकत नाही. अशा प्रकारे आगरकरांनी या प्रकरणात सुरुवातीलाच शब्द आणि वाक्य यांतील फरक सविस्तरपणे नोंदवला आहे. त्यांच्या मते शब्द आणि वाक्य यांतील भेद व वाक्याचे बाह्य स्वरूप यांची चांगली फोड केल्याशिवाय वाक्यमीमांसेचा पुढील भाग सोपा होऊ शकत नाही.

आगरकरांनी पुढे आणखी एका वादग्रस्त प्रश्नाची चर्चा केली आहे. काही वेळा कर्ता आणि उद्देश व क्रियापद आणि विधेय हे एकमेकाला पर्यायी शब्द आहेत असा समज होतो. परंतु आगरकरांच्या मते हा समज बरोबर नाही. कर्ता हा सर्वत्र वाक्यमीमांसेमध्ये उद्देश असेलच असे नाही. अनेक वाक्यांत क्रियेच्या वास्तविक कर्त्यापेक्षा उद्देश वेगळेच असते. उद्देश ठरवताना वाक्यांत कोणत्या वस्तूविषयी विधान केले आहे. याचा निर्णय जपून करावा लागतो. तसेच कर्त्याप्रमाणे उद्देशाची अमुक एक विभक्ती असली पाहिजे, असा आग्रह धरता येणार नाही. उद्देश कोणत्याही विभक्तीत असू शकेल. संस्कृत व्याकरणात प्रयोगविचार ज्या पद्धतीने केला आहे अगदी तशीच पद्धत मराठी व्याकरणाला लावता येत नाही. वास्तविक पाहता, वाक्याद्वारे दुसऱ्यास आपल्या मनातील विचार कळवताना निरनिराळ्या विभक्तींचा उपयोग करण्यात येतो. मराठी व्याकरणाच्या पृथक्करणाचे बाह्य स्वरूप इंग्रजी व संस्कृत वाक्यांच्या पृथक्करणापेक्षा थोडेसे वेगळे आहे.

मराठीतील विभक्तींचा विचार आगरकरांनी पुढीलप्रमाणे मांडला आहे. ज्या वस्तूविषयी विधान करायचे असेल त्या वस्तूला प्रथमा विभक्तीचे प्रत्यय लावावेत. द्वितीया विभक्तीचे मुख्य काम कर्म दर्शवणे. तृतीया विभक्तीवरून कोणत्याही क्रियेच्या कारणाचा, साधनाचा व कधी कधी कर्त्याचा बोध होतो. क्रियेची दिशा, हेतू व अशाच प्रकारचे दुसरे अर्थ दाखवण्यासाठी चतुर्थी विभक्ती उपयोगी पडते. पंचमी विभक्तीने बहुधा क्रियेचा उगम किंवा उद्‌भवस्थान दाखवले जाते. षष्ठी विभक्ती शुद्ध विशेषणार्थक आहे. स्वामित्व दाखवणे हे तिचे मुख्य काम आहे. सप्तमी विभक्तीने क्रियेचे स्थान आणि स्थिती यांचा बोध होतो. विभक्तीच्या विचारात संबोधनाचा विचार करण्याची फारशी गरज नाही, असे आगरकरांचे मत होते. आद्य मराठी व्याकरणकारांनी 'प्रयोगा'संबंधी मराठीची जी व्यवस्था लावली, त्या संदर्भात आपले वेगळे मत नोंदवताना आगरकर म्हणतात, ''संस्कृतात कर्तरी, कर्मणी आणि भावी हे जे वाक्याच्या

प्रयोगांचे संस्कृत व्याकरणकारांनी तीन भेद केलेले आहेत ते मराठी वाक्यांना लावताना आद्य मराठी व्याकरणकारांनी संस्कृत भाषा मराठीहून किती पूर्ण आहे व तिची वाक्यरचना मराठीतील वाक्यरचनेपेक्षा किती व्यवस्थित आहे, हे जितक्या काळजीने पाहायला पाहिजे होते, तितक्या काळजीने न पाहिल्यामुळे, मराठी प्रयोगांचे विभाग करून त्यांस नावे देण्यात फारच गोंधळ झाला आहे.''

या पुस्तकाच्या दुसऱ्या भागात आगरकरांनी वाक्यभेदाचा विचार केला आहे. सुरुवातीला वाक्याच्या रूपावरून व्याकरणात वाक्याचे विधानार्थक, प्रश्नार्थक, आज्ञार्थक असे तीन भेद होतात हे स्पष्ट केले आहे. वाक्यपृथक्करणासाठी वाक्यमीमांसक वाक्यांच्या अर्थावरून तीन भेद करतात. त्यास शुद्ध, मिश्र आणि संयुक्त वाक्य असे म्हणतात. शुद्ध वाक्याचे संक्षिप्त स्वरूप सांगताना आगरकरांनी पुढील मुद्दे मांडले आहेत.

१. **शुद्ध वाक्य :** ज्या वाक्यात एकच उद्देश व एकच पूर्ण क्रियापद असते, त्यास शुद्ध वाक्य असे म्हणतात.

२. **उद्देश :** नाम, सर्वनाम, धातुसाधितनाम किंवा दुसरा कोणताही नामार्थक शब्द शुद्ध वाक्यात उद्देश होऊ शकत नाही.

३. **विधेय क्रियापद :** शुद्ध वाक्यातील क्रियापद पूर्ण पाहिजे. त्यास काळ, अर्थ, पुरुष इत्यादींसाठी लागणारे प्रत्यय किंवा होणारे रूप झाले असले पाहिजे. येथे सकर्मक क्रियापद कर्म असते.

४. **उद्देशाचा व कर्माचा विस्तार :** उद्देश व कर्म ही नामे किंवा नामार्थक शब्द असल्यामुळे त्या उभयतांच्या विशेषणांनी किंवा विशेषणार्थक शब्दांनी विस्तार होतो.

५. शुद्ध वाक्यांतील नामाचा विस्तार विशेषणांनी, समानाधीकरण पदांनी, अव्ययांत नामांनी व धातुसधितांनी आणि विभक्तीत नामांनी आणि धातुसाधितांनी होतो.

**मिश्र वाक्य :** मिश्र वाक्यात एक मुख्य उद्देश आणि एक मुख्य विधेय असून दोन किंवा अधिक क्रियापदे असतात, अशी मिश्र वाक्याची व्याख्या देऊन आगरकर मिश्र वाक्याचे शुद्ध वाक्याहून असलेले वेगळेपण स्पष्ट करताना म्हणतात, ''जर एखाद्या शुद्ध वाक्यांत नामाच्या, विशेषणाच्या किंवा क्रियाविशेषणाच्या जागी एखाद्या शब्दाची, अथवा क्रियापदाव्यतिरिक्त

शब्दसमूहाची योजना करायची सोय नसल्यास क्रियापदयुक्त शब्दसमूह घालण्याची आवश्यकता असली तर त्या वाक्याचे शुद्धत्व नाहीसे होऊन ते मिश्र वाक्य बनते.

**संयुक्त वाक्य :** दोन अथवा अधिक (शुद्ध अथवा मिश्र) वाक्यांनी झालेले जे वाक्य त्यास संयुक्त वाक्य म्हणतात. "वारा आला आणि पाऊस गेला", "ज्याबद्दल आनंद मानावा असे काही झाले नाही व ज्याबद्दल खेद मानावा असेही काही झाले नाही." या दोन वाक्यांपैकी पहिले दोन शुद्ध वाक्यांनी झालेले व दुसरे दोन मिश्र वाक्यांनी झालेले संयुक्त वाक्य आहे. पाहिजे तर एक शुद्ध व एक मिश्र अशा दोन वाक्यांनीही संयुक्त वाक्य करता येईल. संयुक्त वाक्याचे शुद्ध संयुक्त वाक्य, मिश्र संयुक्त वाक्य, उभयसंयुक्त वाक्य असे उपभेद करता येतील. इंग्रजी वाक्यमीमांसेत असले उपभेद केलेले नाहीत व असली नावेही दिलेली नाहीत.

आगरकरांनी हा सविस्तर वाक्यविचार आपल्या अध्यापनाचा एक भाग म्हणून जसा केला होता, त्याप्रमाणे आपल्या भाषेच्या अभ्यासात विद्यार्थ्यांना सुलभपणे मार्गदर्शक होईल या हेतूनेही केलेला होता. त्यामुळेच त्यांनी या सविस्तर विचारात संस्कृत व इंग्रजी वाक्य व व्याकरणव्यवस्थेशी मराठी वाक्य व व्याकरणव्यवस्थेच्या संदर्भात आपली तुलनात्मक मते मांडली आहेत. हे विचार व्यक्त करताना ज्या मुद्द्यांशी आपण सहमत होऊ शकत नाही त्यांचा स्पष्टपणे उल्लेख केला आहे. तसेच आपले मत मांडताना अनेक उदाहरणांचा उपयोग करून सविस्तर विवेचन केलेले आहे. हे करताना आपले विवेचन शक्यतो पाल्हाळीक होणार नाही याचीही दक्षता घेतलेली आहे. आपली मांडणी विद्यार्थ्यांना अधिक स्पष्ट व्हावी यासाठी प्रत्येक मुद्द्याच्या विवेचनानंतर त्याचा सारांश दिला आहे. तसेच अधिक उपयुक्त ठरतील, अशी परिशिष्टे जोडली आहेत.

आगरकरांनी वाक्यमीमांसेचे आपल्या ग्रंथात अशा काळात सविस्तर विवेचन केले की, ज्या काळापूर्वी मराठी या विषयाचा फारसा अभ्यास झालेला नव्हता. एवढेच नव्हे तर यावर काही लेखन करणे म्हणजे काळाचा अपव्यय मानले जात होते. तसेच आगरकरांनंतरही या विषयासंदर्भात वेगळेपण प्रस्थापित करणारे लेखनही फारसे झाले नाही. अर्थात आगरकरांचे या विषयासंदर्भातील सर्व विचार पुढील व्याकरणकारांना जसेच्या तसे पूर्ण मान्य आहेत असे म्हणता येणार नाही. त्यांच्या विचारांवर काहींनी आक्षेप घेतले

आहेत. त्यांत प्रामुख्याने कृ. श्री. अर्जुनवाडकर यांच्या आक्षेपासंदर्भात थोडासा विचार करून आपण आगरकरांच्या या विषयावरील चर्चेचा समारोप करीत आहोत.

श्री. अर्जुनवाडकरांच्या मते वाक्यपृथक्करण हा विषय व्याकरणाचा भाग तर नाहीच, पण तो व्याकरणाशी सर्वस्वी असंबंधित असा आहे. श्री. अर्जुनवाडकर यांच्या या मताचा परामर्श घेताना 'आगरकर वाङ्मय भाग ३चे' संपादक म्हणतात, "माझ्या समजुतीप्रमाणे वरील लेखांत ('मराठी व्याकरणाची बांधिलकी' या लेखात) त्यांनी एकमेव कारण दिले आहे आणि ते म्हणजे वाक्यपृथक्करण हा विषय मूळचा तर्कशास्त्रातला, व्याकरणातला नव्हे. आणि त्याचा प्रवेश इंग्रजी व्याकरणात झाला आहे म्हणून तो मराठी व्याकरणात आणला आहे. श्री. अर्जुनवाडकरांनी दिलेले हे कारण पटण्यासारखे नाही. कारण एखादा विषय मुळात एका शास्त्रात असला म्हणून तो अन्य कुठल्याही शास्त्रात प्रविष्ट होऊ शकत नाही, असे म्हणणे अनर्थक ठरेल. विशेषत: जेथे दोन शास्त्रांचा अभ्यासविषय एकच भाषा हा आहे, अशा तर्कशास्त्र व व्याकरण या शास्त्रांमध्ये देवाणघेवाण होणे अपरिहार्य आहे. एवढेच नव्हे तर ते परस्परांना उपकारक होणेही अतिशय संभाव्य आहे. अनेक शास्त्रे दोन किंवा अधिक शास्त्रांच्या सीमाप्रदेशातील असतात. भाषेचा अभ्यास करणारी तर अनेक शास्त्रे आहेत. व्याकरण, तर्कशास्त्र, अर्थमीमांसा, तत्त्वज्ञान, काव्यशास्त्र, मानसशास्त्र इत्यादी एकाच विषयाशी संबंध असणारी दोन शास्त्रे त्या विषयाचा भिन्न अंगांनी, भिन्न दृष्टिकोणातून अभ्यास करणार आणि त्यामुळे त्या अभ्यासातून त्या विषयाची अनेकविध दर्शने घडणार हे उघड आहे." असा अभिप्राय देऊन या क्षेत्रातील आगरकरांच्या कामगिरीचे महत्त्व विशद करताना म्हटले आहे की, "या पुस्तकात आगरकरांच्या प्रतिभेचा आणखी एक पैलू दिसून येतो. वास्तविक व्याकरण हा काही त्यांच्या अभ्यासाचा प्रमुख विषय नव्हता. परंतु प्रसंगोपात ज्या विषयाला त्यांनी हात घातला त्यांत त्यांनी काहीतरी विशेष करून दाखविले. मराठी व्याकरणकारांच्या मालिकेत आगरकरांना मानाचे स्थान मिळाले आहे ते उगाच नव्हे."

# ६. आगरकरांचे साहित्यविषयक विचार

प्रबोधनकार, पत्रकार आगरकरांनी आपल्या कामातून वेळ काढून ज्याप्रमाणे वाक्यपृथक्करण, वाक्यमीमांसा यांसारख्या व्याकरण विषयांवर ग्रंथलेखन केले त्याचप्रमाणे 'डोंगरीच्या तुरुंगातील आमचे १०१ दिवस', शेक्सपिअरच्या 'हॅम्लेट' या नाटकाचे 'विकारविलसित' हे भाषांतर व 'विविध विषय संग्रह' या नावांचे ग्रंथ लिहिले. या त्यांच्या ग्रंथसंपदेवरून आगरकर साहित्याकडे कोणत्या दृष्टीने पाहत होते, त्यांची साहित्याविषयी भूमिका व विचार काय होते, याची आपणास कल्पना येऊ शकते. 'डोंगरीच्या तुरुंगातील आमचे १०१ दिवस' हे आगरकरांचे प्रसिद्ध झालेले पहिले पुस्तक. तसेच मराठी साहित्यात कैद्यांच्या जीवनावर अनुभवकथन करणारे, निरीक्षण नोंदवणारे हे पहिलेच पुस्तक मानावे लागेल. या ग्रंथाचा विषय काहीसा आत्मनिवेदनाचा, काहीसा समाजशास्त्रीय आणि चिकित्सक असा आहे. हे आत्मनिवेदन लिहीत असताना आगरकर व टिळक हे दोघे तुरुंगवासाची शिक्षा भोगीत होते. आगरकरांची प्रकृती दम्याने ग्रासली होती व तुरुंगातील हालअपेष्टांनी खंगली होती. परंतु या आत्मनिवेदनात कोठेही प्रकृतीची, अडचणींची अथवा हालअपेष्टांची तक्रार दिसून येत नाही. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत लिहिलेल्या या आत्मनिवेदनात कसलीही कटुता आढळून येत नाही. उलट या स्थितीत त्यांनी व्यक्त केलेल्या विचारांची विविधता, सखोलता, प्रांजळपणा व प्रसंगी नर्मविनोद हे सर्व गुणविशेष आपणास थक्क करणारे आहेत. समान ध्येयाने प्रेरित झालेल्या या दोन उत्साही, त्यागी आणि धडाडीच्या मित्रांना तुरुंगवासाच्या निमित्ताने निवांत वेळ मिळाला. त्याचा उपयोग आपल्या वैयक्तिक बाबींच्या विचारांसाठी न करता देशासंबंधीच्या विचारात, त्याची चर्चा करण्यासाठी केला. आपण देशसेवेचे जे काम हाती घेतले आहे, त्याकडे

तटस्थपणे पाहण्याचा, त्यातील गुण-दोष न्याहाळण्याचा, पुढील बेत आखण्याचा निवांतपणा त्यांना मिळाला होता. आपल्याला झालेल्या शिक्षेची कारणमीमांसा आगरकरांनी तटस्थपणे केली असून त्यातून त्यांची न्यायनिष्ठुर वृत्ती दिसून येते. जनतेस ही शिक्षा चुकीची व अन्यायाची वाटत होती, परंतु आगरकर म्हणतात, "न्यायाधीश आणि पंच आपले फैसले पुराव्याच्या आधाराने करतात. लोकांचे फैसले त्यांच्या मनोविकाराप्रमाणे चालतात." तुरुंगातील वातावरण, तेथील अधिकारी, विविध प्रकारचे कैदी, त्यांना मिळणाऱ्या शिक्षा, अन्न इत्यादींसंबंधी आगरकरांनी अत्यंत प्रत्ययकारी व समग्र चित्र रेखाटले आहे. परंतु अशाही परिस्थितीत त्यांना लिहिण्या-वाचण्याची जेव्हा परवानगी मिळाली तेव्हा त्यांनी या संधीचा उपयोग करून शेक्सपिअरच्या 'हॅम्लेट'चे मराठी भाषांतर केले.

तुरुंगातील कैद्यांची दु:खे व हाल पाहून आगरकरांना अतिशय दु:ख होत असे. कधी कधी त्यांना रडू येई. परंतु काही वेळा "मधून मधून डांबीस कैद्यांना फटके देताना ते पाहण्यासाठी सर्वांना एकत्र बोलाविले जात असे, त्या वेळेस ते फटके पाहूनही थोडीबहुत सखेद करमणूक होत असे." अशी मनाची अवस्था आगरकर शब्दबद्ध करतात. तुरुंगातील स्त्री-कैद्यांचे केले जाणारे हाल, त्यांचे केस कापून संन्याशाच्या गोट्याप्रमाणे त्यांच्या डोक्यांची केलेली अवस्था पाहून आगरकरांना संताप येत असे. या पुस्तकात आत्मनिवेदनपर वर्णने अगदी तुरळकच आहेत. गुन्हेगार गुन्हे का करतात? त्यांना तुरुंगात कसे वागवले जाते? कसे वागवले पाहिजे? क्रूर शिक्षेचे परिणाम किती घातक ठरू शकतात? इत्यादी अनेक प्रश्न आगरकर उभे करतात आणि आपल्या चिंतनपर स्वभावाप्रमाणे त्यांची उत्तरे देतात. 'तुरुंगात जो जातो तो पक्का डांबीस असतो' हा समज कसा खोटा आहे, हे ते पटवून देतात. तुरुंगातील स्थितीत सुधारणा कशी करावी, हे समजावून सांगण्यासाठी आगरकर हर्बट स्पेन्सरच्या 'Prison Ethics' या पुस्तकाची शिफारस करतात. या पुस्तकात लेखकाने माणसातील चांगुलपणावर विश्वास असलेला ओबारमारसारखा सूज्ञ व मायाळू अधिकारी अत्यंत राक्षसी वृत्तीच्या कैद्यांना माणसांत कसे आणू शकतात, हे दाखवले आहे. एकूणच गुन्हे, गुन्हेगार, कैदी, तुरुंग यासंबंधी आपले चिंतन नोंदवताना आगरकर म्हणतात, "कोणत्याही देशातील एकंदर तुरुंगाची आणि त्यातील लोकांची संख्या कमी होत जाणे, हे त्या देशाच्या वाढत्या सुधारणेचे चिन्ह होय. मनुष्यतेला कलंक आणणारे अपराध ज्या देशात घडून येत असतात त्या देशातील सुधारणा कितीही प्रबळ असली तरी तीत

काही हशील नाही... कोणत्याही देशातील दुराचारी लोक त्या देशाच्या सार्वजनिक विपत्तीला आणि दुर्लौकिकाला कारण होतात."

'विकारविलसित' हे आगरकरांनी शेक्सपिअरच्या 'हॅम्लेट' या नाटकाचे केलेले मराठीतील भाषांतर. या नाटकाच्या सुरुवातीलाच आगरकर म्हणतात की, "ग्रंथनिर्मिती लोकांच्या आवडीनिवडीवर आणि गरजेवर अवलंबून असते. बाजारात ज्या मालाचा खप आहे तो माल उपलब्ध होत असतो. आपल्या श्रमाचे फळ मिळाले पाहिजे, ही ग्रंथकर्त्याची इच्छा असते. त्यामुळे अर्थप्राप्ती होणार नाही, अशी पुस्तके जन्मास येण्याचा संभव कमी असतो." हॅम्लेटचे भाषांतर करताना केवळ गाजलेली कलाकृती आहे व तिचे आपण भाषांतर करीत आहोत, एवढाच मर्यादित हेतू आगरकरांचा नसावा. कारण आपण हे भाषांतर का करीत आहोत, हे विशद करताना ते प्रारंभीच म्हणतात की, "शेक्सपिअरचे अनुपमेय बुद्धिवैचित्र्य, असामान्य कल्पनाशक्ती, अद्वितीय वर्णनचातुर्य, अवर्णनीय अनेक स्वभावांचे ज्ञान यांविषयी ज्याला आपल्या वाचकांस परिचय करून द्यावयाचा असेल त्याने त्याच्या नाटकाची हवी तशी फाडाफाड केल्याने त्याचा हेतू कसा तडीस जाईल?" असा प्रश्न उपस्थित करून परकीय भाषेतील साहित्यकृती आपल्या भाषेत आणताना बरेच गैरसमज लेखकांच्या व वाचकांच्या मनात असतात, असे आगरकरांचे मत आहे. शेक्सपिअरसारख्या महान साहित्यिकाच्या अलौकिक कलागुणांचे ज्ञान मराठी वाचक-रसिकांना करून द्यायचे असेल तर त्या नाटकातील पाश्चिमात्य रीतिरिवाज ज्यांना मराठीत आणणे अप्रशस्त वाटत असेल किंवा वाचकांना आवडणार नाहीत असे वाटत असेल, त्यांनी इंग्रजी-मराठी विचार एकत्र करून 'गंगाजमनी' पुस्तक वाचकांच्या गळ्यात बांधण्यापेक्षा, धमक असल्यास शेक्सपिअरच्या नाटकातील फक्त कथानक घेऊन आरंभापासून अखेरपर्यंत एक स्वतंत्र नाटक लिहिणे अधिक चांगले."

एखाद्या कलाकृतीचे मुळापासून भाषांतर न करण्यामागे दोन कारणे सांगितली जातात, असे आगरकरांना वाटते. ती कारणे म्हणजे १. इंग्रजी शब्दास मराठी शब्द शोधून काढण्यास मारामार व तसे करण्यात होणारा त्रास, २) लोकांना अप्रिय होणाऱ्या परकीय रीतींचे वर्णन केल्याने येणारे दूषण. .या दोन्ही कारणाच्या संदर्भात मराठी लेखकांचे गैरसमज असल्यामुळे व कष्ट घेण्याची तयारी नसल्यामुळे "शेक्सपिअरच्या अमुक नाटकांवरून मराठी पद्धतीला जुळेल अशा रीतिने हे भाषांतर केले आहे, असा शेरा प्रस्तावनेत ठोकून दिला की मग मूळ ग्रंथात हवा तसा गोंधळ घालण्यास

भाषांतरकार मोकळा होतो.'' म्हणून आपल्या या भाषांतरामागची भूमिका स्पष्ट करताना आगरकर सांगतात की, ''आम्ही ज्या नाटकासंबंधाने, आपले रीतीरिवाज, मराठी रूढी, मराठी रीती व देशकालमानानुरोध घेऊन बसलो तर दुसऱ्यांची रीती व दुसरे देशकालमानानुरोध हे आम्हांस कसे समजणार? 'हॅम्लेट' ही महान कलाकृती आहे. त्यामुळे शेक्सपिअरच्या विश्वव्यापी कल्पनाशक्तीला इंग्लंडचेच काय पण कोणत्याही राष्ट्राचे रीतिरिवाज पुरे पडणार नाहीत. त्याने नवीन कल्पनासृष्टी निर्माण केली आहे. म्हणूनच आपल्याहून भिन्न आचारांचे चित्र नाटकरूपाने वारंवार आपल्या डोळ्यांपुढे आल्याने आपल्या विचारांतील एकदेशीयता गळून पडेल व सर्वांस सुखकारक असा आनंद मिळेल. ज्या नाटकात किंवा कादंबऱ्यांत आमच्या रीतिरिवाजाचे वर्णन आहे त्याच चांगल्या, हा दुराग्रह चांगला नाही. विचाराने क्षुद्र बुद्धी लयाला जाते व मन विस्तृत होते. आणि विश्व हेच एक कुटुंब आहे, अशी मनाची स्थिती होते, हाच साहित्यापासून होणारा अलौकिक आनंद आहे. त्यामुळेच कालिदासासारख्या महाकवीच्या 'अभिज्ञान शाकुंतल' या अभिजात कलाकृतीचे अनेक परकीय भाषांत भाषांतर होऊ शकले. थोडक्यात, महान कलावंताच्या प्रतिभेला राष्ट्राच्या सीमा रोखू शकत नाहीत, हे स्पष्ट करताना आगरकर म्हणतात, ''शेक्सपिअर, कालिदास, भवभूती यांसारखे जे महाकवी आहेत, त्यांचा प्रतिभाविहंग उंच उड्डाण करून अव्याहत गतीने आकाशपंथी हव्या तेवढ्या भराऱ्या मारू लागला म्हणजे त्याच्या खालून राष्ट्रेच्या राष्ट्रे आणि खंडेच्या खंडे निघून जातात.''

या प्रस्तावनेत आगरकरांनी आणखी एका साहित्यिक मुद्द्याचा परामर्श घेतला आहे. तो म्हणजे नाटक-कादंबऱ्यांत पात्रानुरूप भाषा योजावी की सर्वत्र शुद्ध भाषा असावी? या प्रश्नांचे उत्तर देताना आगरकर म्हणतात, ''पात्रानुरोधाने चांगली-वाईट भाषा घालण्याचे एकंदरीत नफ्यापेक्षा नुकसान अधिक आहे. कारण अशिक्षित पात्राच्या तोंडी कोणती भाषा घालावी? हा प्रश्न आहे. उदाहरणार्थ, आपला महाराष्ट्र देश खूप मोठा आहे. येथे अशिक्षितांच्या तोंडी एकच भाषारूप नाही. म्हणून नाटक-कादंबऱ्यांच्या पुस्तकात एकच एक व्याकरणशुद्ध भाषा असावी. मात्र रंगभूमीवर एखाद्या अशिक्षित पात्राच्या ठिकाणी भारदस्त भाषा योजून जर रसभंग होणार असेल तर तेवढ्यापुरता भाषारूपात फेरफार करण्यास हरकत नाही.'' या मुद्द्याचा समारोप करताना आगरकर म्हणतात की, '' 'विकारविलसित' हे भाषांतर वरील चर्चेत आलेल्या सर्व नियमांप्रमाणे झाले आहे, असा माझा दावा नाही.

हे नाटक लिहिण्यामागचा मुख्य हेतू या नाटकाचे प्रयोग व्हावेत हा होता. त्यामुळे मराठी रंगभूमीवर त्यात आवश्यक ते फेरफार करावे लागले. मात्र कोणत्याही महत्त्वाच्या ठिकाणी आपण फेरफार करताना शेक्सपिअरला काडीएवढेही दुखवले नाही.''

या चर्चेनंतर आगरकरांनी प्रत्येक महाकवी श्रेष्ठ मानला जातो म्हणजे त्याची कलाकृती पूर्णपणे निर्दोष असते, या मताशी असहमती दर्शवून काही चर्चा केली आहे. ते म्हणतात, ''शेक्सपिअर मोठा कवी खरा, कदाचित त्याच्या तोडीचा दुसरा नाटककार नसेलही, परंतु एवढ्यावरून त्याच्या कृतीला दोषाचा लेशही नाही, हे आम्हांला मान्य करता येत नाही.'' शेक्सपिअरच्या मोठेपणात इतर घटकही साहाय्यभूत आहेत, हे आगरकर स्पष्ट करतात. ग्यॉरीक नावाच्या प्रतिभाशाली नटामुळे शेक्सपिअरचे बुद्धिवैचित्र्य खऱ्या अर्थाने लोकांस कळले. शेक्सपिअरने ३५ नाटके लिहिली, परंतु त्यांपैकी ३४ नाटकांच्या मूळ गोष्टी त्यांनी दुसऱ्या पुस्तकांतून घेतल्या. पण त्यांना नवा आकार, नवे स्वरूप त्याने दिले. हे त्याच्या महान प्रतिभेचे यश होते.

## शेक्सपिअर एलिझाबेथच्या काळातला

त्या काळी स्पेन्सर, राले, जॉन्सन, बेकन, बरले, हूकर असे एकापेक्षा एक महान बुद्धिमान व प्रतिभावंत होऊन गेले. त्याचे कारण असे महान प्रतिभावंत एखाद्या देशात जन्माला येण्यास जी स्थिती असावी लागते, ती इंग्लंडची होती. अशा शेक्सपिअरच्या अव्वल कलाकृतीचे भाषांतर मराठी वाचकांना आनंददायी ठरावे, या हेतूनेच आगरकरांनी केले. आगरकरांच्या मते नाटककाराची बुद्धी परिपक्व असेल तर तो बाह्य स्वरूपाकडे विशेष लक्ष देत नाही. या नाटकाच्या लेखनात शेक्सपिअर असाच दिसतो. त्याचे लक्ष यमक, प्रास जुळवण्याकडे नाही, पात्रांची भाषणे प्रसंगानुरूप झाली आहेत की नाही याकडे नाही, प्रवेश व अंक यांच्या जुळणीकडे त्याचे विशेष भान नाही. शेक्सपिअरचे कौतुक करावे असे जे दोन गुण आगरकर या संदर्भात सांगतात, ते असे : ''त्याने जी प्रकृती हाती धरली तिच्या अंत:करणातील अत्यंत गूढ विचार सगळेच्या सगळे बाहेर यावेत, इतका तो त्या प्रकृतीशी, पात्रांच्या स्वभावाशी एकरूप झाला आहे. तसेच सहस्रनाम हे त्यालाच योग्य आहे. कारण त्याच्याएवढे अनेक स्वभावाचे ज्ञान दुसऱ्या कोणत्याही कवीत क्वचित दिसून येईल.'' या सर्व प्रस्तावनेच्या निमित्ताने आगरकर एका अभिजात कलाकृतीची समीक्षा करताना दिसतात. त्यांची ही समीक्षा केवळ

शेक्सपिअरच्या महान प्रतिभेचे भक्त बनून कौतुक करणारे नाही. त्यांनी कौतुक केले आहेत. परंतु त्याचबरोबर त्यामागील कारणे दिली आहेत. आपण आपल्या भाषांतरात कसे बदल केले? का केले? याचेही अत्यंत सविस्तर वर्णन आगरकरांनी केले आहे. या प्रस्तावनेत व्यक्त केलेल्या मतांवरून अभिजात परभाषीय साहित्यकृतींचे भाषांतर कसे करावे, हे आगरकर सांगताना दिसतात.

'कवि, काव्य आणि काव्यरती' या निबंधात आगरकरांनी साहित्यनिर्मितीचे स्वरूप, साहित्याचे प्रयोजन यांसारख्या मूलभूत अशा काव्यशास्त्रातील संकल्पनांचा, काव्यलक्षणांचा सविस्तरपणे विचार केला आहे. आगरकरांची काव्यविषयक भूमिका स्पष्ट करणारा असा हा निबंध आहे. आगरकरांनी त्यांच्या काळात काव्यविषयक प्रश्नांची जी चर्चा केली ती आजही कालबाह्य झालेली नाही. ही चर्चा करताना आगरकांना जे विचारांती पटले ते अगदी स्वच्छ व स्पष्टपणे विशद केलेले दिसते. महाकवी म्हणून जगन्मान्य ठरलेल्या शेक्सपिअरसंबंधी चर्चा करताना ज्याप्रमाणे आगरकर स्पष्ट भूमिका घेतात तसेच येथेही दिसून येते. या निबंधाच्या प्रारंभीच त्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, इंग्लंडच्या राजकारणात आपल्या आयुष्याची ५० वर्षे व्यग्र असलेल्या ग्लॅडस्टनला एखादे दिवशी 'होमर' वाचण्याची इच्छा का होते? जगज्जेता अलेक्झांडर आपल्या शस्त्राबरोबर सफॉक्लीजची नाटके का बाळगत होता? स्वराज्यनिर्मितीच्या कामात अक्षरश: बुडून गेलेला शिवाजी सवड काढून कथाश्रवण का करीत होता? 'उत्तररामचरित' या अजरामर कलाकृतीच्या कर्त्याचे नाव आजही प्रेमाने का घेतले जाते? किर्लोस्करांच्या सौभद्रचा प्रयोग पाहण्याकरिता नाट्यवेड्यांच्या झुंडीच्या झुंडी का लोटतात? शाळा-कॉलेजच्या अभ्यासक्रमात काव्याचा अभ्यास का केला जातो? या सर्व प्रश्नांची उत्तरे काव्याचे अलौकिकत्व, काव्याचे प्रयोजन स्पष्ट करणारी आहेत. कवी काव्यनिर्मिती का करतो व रसिक त्या काव्याकडे आकृष्ट का होतो, या मूलभूत प्रश्नांचा म्हणजे काव्यलक्षणातील काव्यप्रयोजनाचा आगरकरांनी कवी व रसिक यांच्या अंगाने येथे उल्लेख केला आहे.

ही चर्चा पुढे नेताना आगरकर काव्याच्या विविध वैशिष्ट्यांचा विचार करतात. ही वैशिष्ट्ये अलौकिक अशा आनंदनिर्मितीस कशी कारणीभूत झाली आहेत, याची तपासणी आगरकरांनी केली आहे. काव्यात पद्यरचना असते, ती लयबद्ध व कर्णमधुर अशी असते, त्यामुळेच काव्यवाचनापासून आनंद होतो, असे काहींचे मत आहे. तर काही जण यावर आक्षेप घेणारेही असतात.

त्यांचा आक्षेप असा असतो की, केवळ पद्यरचना असल्यामुळे काव्य आनंददायी होत नाही. *कारण 'अमरा'सारखा ग्रंथ पद्यात रचलेला आहे म्हणून* त्याला कोणी काव्य म्हणत नाही. किंवा मानवी स्वभावाचे अथवा निसर्गाच्या विविध रूपांचे वर्णन काव्यात असते, म्हणून ते काव्य ठरत नाही. कारण वैद्यकशास्त्रातील ग्रंथांत वनस्पतींच्या गुणांचे, धर्माचे तसेच मानवी शरीराचे व स्वभावाचे वर्णन पद्यात केले असेल तर ते काव्य ठरत नाही.

आगरकर म्हणतात की, काही गद्यरचनेतही काव्यगुण असतात. काव्य मानवी स्वभावाचे व सृष्टीचे यथार्थ वर्णन करते, हेसुद्धा खरे आहे. ही काव्याच्या अनेक वैशिष्ट्यांपैकी काही वैशिष्ट्ये आहेत, हेही खरे. परंतु त्यामुळे ते काव्य ठरते, असे नाही. तसेच काव्यवाचनापासून आनंद होतो, हेही निर्विवाद आहे. परंतु काव्याचे खरे स्वरूप लक्षात येण्यास मनुष्याच्या मनोधर्मांचा विचार करण्याची गरज आहे. जागृत अवस्थेतील मनाचा जो व्यापार चालतो, त्याचे संवेदना, इच्छा व ज्ञान या वर्गात विभाजन करता येते. त्यापैकी संवेदना ही काव्याशी संबंधित आहे. संवेदना अनुकूल व प्रतिकूल अशा दोन स्वरूपाच्या असतात. पहिल्या प्रकारच्या संवेदनेपासून सुखाची तर दुसऱ्या प्रकारच्या संवेदनेपासून दु:खाची प्राप्ती होत असते. काव्यवाचनापासून रसिकाला अनुकूल संवेदना होतात, कारण काव्याची रचना अंत:करणाला हात घालत असते. अशा संवेदना ज्ञान करून देण्यासाठी नसतात. मृदुता किंवा रमणीयता हा काव्याचा प्रधान गुण असतो. तर काठिण्य किंवा कर्कशता हा शास्त्रीय ग्रंथांचा प्रधान गुण असतो. म्हणूनच काव्य या शब्दात सुखद संवेदना निर्माण करणाऱ्या कविता, नाटक, कादंबरी यांचा तर कवी या शब्दात अशा प्रकारची निर्मिती करणाऱ्या सर्वांचा समावेश होतो. साहित्यनिर्मितीमध्ये बाह्य किंवा अंतर्गत अशा दोनपैकी कोणतीतरी सृष्टी असते. त्यावरच प्रतिभेच्या साहाय्याने कवितेचे एक काल्पनिक जग जन्माला येत असते. म्हणूनच काव्यात काव्यवस्तूचे हुबेहूब वर्णन असते व कलात्मक सत्यही असते. परंतु शास्त्रीय ग्रंथात ज्या पद्धतीने सत्याचे निरूपण केलेले असते, त्यापेक्षा वेगळी रीत काव्याची असते.

काव्याचे प्रयोजन स्पष्ट करताना आगरकर सांगतात की, मनुष्याच्या दु:खाचा परिहार व सुखाची वृद्धी करण्याचे सामर्थ्य काव्यात असते. ज्ञान हे सुखाचे मुख्य साधन आहे, त्याला जोपर्यंत नूतन स्वरूप येत नाही, तोपर्यंत ते काव्यविषय होऊ शकत नाही. शास्त्रीय ज्ञानाच्या वाढीबरोबर काव्यरचनेला उतरती कळा लागते हे मेकॉलेचे मत खोडून काढताना आगरकर म्हणतात की, "काव्यास अलीकडे जे मांद्य आले आहे, त्याचे कारण अर्वाचीन ज्ञानप्रसार नव्हे तर, अर्वाचीन ज्ञानप्रसारामुळे काव्यवस्तू करण्याजोगे जे नवे विषय उत्पन्न

शेक्सपिअरच्या महान प्रतिभेचे भक्त बनून कौतुक करणारी नाही. त्यांनी कौतुक तर केले आहेच, परंतु त्याबरोबर त्यामागील कारणे दिली आहेत. आपण आपल्या भाषांतरात कसे बदल केले? का केले? याचेही अत्यंत सविस्तर वर्णन आगरकरांनी केले आहे. या प्रस्तावनेत व्यक्त केलेल्या मतांवरून अभिजात परभाषीय साहित्यकृतींचे भाषांतर कसे करावे, हे आगरकर सांगताना दिसतात.

'कवि, काव्य आणि काव्यरती' या निबंधात आगरकरांनी साहित्यनिर्मितीचे स्वरूप, साहित्याचे प्रयोजन यांसारख्या मूलभूत अशा काव्यशास्त्रातील संकल्पनांचा, काव्यलक्षणांचा सविस्तरपणे विचार केला आहे. आगरकरांची काव्यविषयक भूमिका स्पष्ट करणारा असा हा निबंध आहे. आगरकरांनी त्यांच्या काळात काव्यविषयक प्रश्नांची जी चर्चा केली ती आजही कालबाह्य झालेली नाही. ही चर्चा करताना आगरकांना जे विचारांती पटले ते अगदी स्वच्छ व स्पष्टपणे विशद केलेले दिसते. महाकवी म्हणून जगन्मान्य ठरलेल्या शेक्सपिअरसंबंधी चर्चा करताना ज्याप्रमाणे आगरकर स्पष्ट भूमिका घेतात तसेच येथेही दिसून येते. या निबंधाच्या प्रारंभीच त्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, इंग्लंडच्या राजकारणात आपल्या आयुष्याची ५० वर्षे व्यग्र असलेल्या ग्लॅडस्टनला एखादे दिवशी 'होमर' वाचण्याची इच्छा का होते? जगज्जेता अलेक्झांडर आपल्या शस्त्राबरोबर सफॉक्लीजची नाटके का बाळगत होता? स्वराज्यनिर्मितीच्या कामात अक्षरश: बुडून गेलेला शिवाजी सवड काढून कथाश्रवण का करीत होता? 'उत्तररामचरित' या अजरामर कलाकृतीच्या कर्त्याचे नाव आजही प्रेमाने का घेतले जाते? किर्लोस्करांच्या सौभद्रचा प्रयोग पाहण्याकरिता नाट्यवेड्यांच्या झुंडीच्या झुंडी का लोटतात? शाळा-कॉलेजच्या अभ्यासक्रमात काव्याचा अभ्यास का केला जातो? या सर्व प्रश्नांची उत्तरे काव्याचे अलौकिकत्व, काव्याचे प्रयोजन स्पष्ट करणारी आहेत. कवी काव्यनिर्मिती का करतो व रसिक त्या काव्याकडे आकृष्ट का होतो, या मूलभूत प्रश्नांचा म्हणजे काव्यलक्षणातील काव्यप्रयोजनाचा आगरकरांनी कवी व रसिक यांच्या अंगाने येथे उल्लेख केला आहे.

ही चर्चा पुढे नेताना आगरकर काव्याच्या विविध वैशिष्ट्यांचा विचार करतात. ही वैशिष्ट्ये अलौकिक अशा आनंदनिर्मितीस कशी कारणीभूत झाली आहेत, याची तपासणी आगरकरांनी केली आहे. काव्यात पद्यरचना असते, ती लयबद्ध व कर्णमधुर अशी असते, त्यामुळेच काव्यवाचनापासून आनंद होतो, असे काहींचे मत आहे. तर काही जण यावर आक्षेप घेणारेही असतात.

त्यांचा आक्षेप असा असतो की, केवळ पद्यरचना असल्यामुळे काव्य आनंददायी होत नाही. कारण 'अमरा'सारखा ग्रंथ पद्यात रचलेला आहे म्हणून त्याला कोणी काव्य म्हणत नाही. किंवा मानवी स्वभावाचे अथवा निसर्गाच्या विविध रूपांचे वर्णन काव्यात असते, म्हणून ते काव्य ठरत नाही. कारण वैद्यकशास्त्रातील ग्रंथांत वनस्पतींच्या गुणांचे, धर्माचे तसेच मानवी शरीराचे व स्वभावाचे वर्णन पद्यात केले असेल तर ते काव्य ठरत नाही.

आगरकर म्हणतात की, काही गद्यरचनेतही काव्यगुण असतात. काव्य मानवी स्वभावाचे व सृष्टीचे यथार्थ वर्णन करते, हेसुद्धा खरे आहे. ही काव्याच्या अनेक वैशिष्ट्यांपैकी काही वैशिष्ट्ये आहेत, हेही खरे. परंतु त्यामुळे ते काव्य ठरते, असे नाही. तसेच काव्यवाचनापासून आनंद होतो, हेही निर्विवाद आहे. परंतु काव्याचे खरे स्वरूप लक्षात येण्यास मनुष्याच्या मनोधर्मांचा विचार करण्याची गरज आहे. जागृत अवस्थेतील मनाचा जो व्यापार चालतो, त्याचे संवेदना, इच्छा व ज्ञान या वर्गात विभाजन करता येते. त्यापैकी संवेदना ही काव्याशी संबंधित आहे. संवेदना अनुकूल व प्रतिकूल अशा दोन स्वरूपाच्या असतात. पहिल्या प्रकारच्या संवेदनेपासून सुखाची तर दुसऱ्या प्रकारच्या संवेदनेपासून दु:खाची प्राप्ती होत असते. काव्यवाचनापासून रसिकाला अनुकूल संवेदना होतात, कारण काव्याची रचना अंत:करणाला हात घालत असते. अशा संवेदना ज्ञान करून देण्यासाठी नसतात. मृदुता किंवा रमणीयता हा काव्याचा प्रधान गुण असतो. तर काठिण्य किंवा कर्कशता हा शास्त्रीय ग्रंथांचा प्रधान गुण असतो. म्हणूनच काव्य या शब्दात सुखद संवेदना निर्माण करणाऱ्या कविता, नाटक, कादंबरी यांचा तर कवी या शब्दात अशा प्रकारची निर्मिती करणाऱ्या सर्वांचा समावेश होतो. साहित्यनिर्मितीमध्ये बाह्य किंवा अंतर्गत अशा दोनपैकी कोणतीतरी सृष्टी असते. त्यावरच प्रतिभेच्या साहाय्याने कवितेचे एक काल्पनिक जग जन्माला येत असते. म्हणूनच काव्यात काव्यवस्तूचे हुबेहूब वर्णन असते व कलात्मक सत्यही असते. परंतु शास्त्रीय ग्रंथात ज्या पद्धतीने सत्याचे निरूपण केलेले असते, त्यापेक्षा वेगळी रीत काव्याची असते.

काव्याचे प्रयोजन स्पष्ट करताना आगरकर सांगतात की, मनुष्याच्या दु:खाचा परिहार व सुखाची वृद्धी करण्याचे सामर्थ्य काव्यात असते. ज्ञान हे सुखाचे मुख्य साधन आहे, त्याला जोपर्यंत नूतन स्वरूप येत नाही, तोपर्यंत ते काव्यविषय होऊ शकत नाही. शास्त्रीय ज्ञानाच्या वाढीबरोबर काव्यरचनेला उतरती कळा लागते हे मेकॉलेचे मत खोडून काढताना आगरकर म्हणतात की, "काव्यास अलीकडे जे मांद्य आले आहे, त्याचे कारण अर्वाचीन ज्ञानप्रसार नव्हे तर, अर्वाचीन ज्ञानप्रसारामुळे काव्यवस्तू करण्याजोगे जे नवे विषय उत्पन्न

झाले आहेत, त्यांचा अर्वाचीन कवी काव्यरचनेत उपयोग न करता प्राचीन कवींच्या काव्यविषयांवर फिरून फिरून लिहितात हे आहे. तसेच हेही लक्षात घेतले पाहिजे की, प्रत्येक शतकात महाकवी निर्माण होत नसतो. कवी जे सत्य सांगत असतो ते शास्त्रीय सत्याप्रमाणे गूढ नसते. काव्यात जे सत्य मांडायचे असते त्याची निवड करताना कवीला खूप सायास पडतात. काव्यांत वर्णिलेली सत्ये नेहमी अनुकूल संवेदना निर्माण करणारी असली पाहिजेत, हे खरे असेल तर काव्यात दु:ख पर्यवसायी नाटकांचा समावेश कधीच करता येणार नाही. दुष्काळात अन्न न मिळाल्यामुळे होणाऱ्या यातनांचा अनुभव आणि त्या यातनांच्या वर्णनाचे वाचन किंवा श्रवण यात खूप अंतर आहे. तरवारीसारख्या शस्त्राचे मर्मापर्यंत चरचर कापीत जाणे आणि फक्त अंगाला चाटणे, यात जो फरक आहे, तो प्रत्यक्ष सुखदु:खात आणि त्याच्या चित्रात आहे. कवीची सारी करामत हुबेहूब चित्र काढण्यात आहे, मूळ उत्पन्न करण्यात नाही. कवीचे मन फोटोग्राफ घेण्यासाठी तयार केलेल्या भिंगाप्रमाणे असते. ज्याप्रमाणे हवा तेवढा प्रकाश अनुकूल असला म्हणजे पाहिजे त्या पदार्थाचे हुबेहूब प्रतिबिंब त्या भिंगावर पाडता येते. अशीच काव्यनिर्मितीची प्रक्रिया असते. कल्पना प्रज्वलित होऊन कल्पनाविषयांशी तादात्म्य होणे यातच कवीचा आणि काव्यरसिकांचा आनंद आहे.'' कवी, काव्य, रसिक या संदर्भातील अशा लहानसहान बाबींचा आगरकरांनी एखाद्या मान्यवर काव्यसमीक्षकांसारखा सखोल विचार या निबंधात केला आहे.

## आगरकरांच्या वाङ्‌मयीन कार्याचे मूल्यमापन

सातारा जिल्ह्यातील एका खेड्यात जन्मलेल्या आगरकरांना जन्मापासून गरिबीचीच साथ लाभली. त्यामुळेच शिक्षणाची उत्कट इच्छा असणाऱ्या आगरकरांना कोकण, विदर्भ असा प्रवास करीत, अत्यंत अडचणीच्या परिस्थितीवर मात करीत पुणे येथे पदवीपर्यंतचे शिक्षण मिळवता आले. या सर्व धडपडीनंतरही त्यांना अल्प आयुष्य लाभले. शिक्षण घेताना व पुढे शिक्षक, पत्रकार, समाजसुधारक या भूमिका यशस्वीपणे पार पाडताना आगरकरांचा विद्याव्यासंग वाढत गेला. आगरकरांनी विविध विषयांवर अव्याहतपणे अत्यंत प्रभावी असे लेखन केले. त्यांचे शेकडो निबंध त्यांचा वैचारिक आवाका, सामाजिक कार्याची तळमळ, देशप्रेम स्पष्ट करतात. वृत्तपत्रातील या प्रचंड लेखसंग्रहांबरोबर त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी व मातृभाषेवरील प्रेमामुळे जगप्रसिद्ध अशा 'हॅम्लेट' नाटकाचे भाषांतर केले. या भाषांतरातही त्यांची चिकित्सक दृष्टी, मराठी भाषेला व मराठी माणसाला

व्यापक अनुभव यावा; त्याचा संकुचितपणा, साचलेपणा नाहीसा व्हावा हा ध्यास स्पष्ट होतो. अनेक वर्षांच्या कष्टांनंतर, गरिबीच्या यातना सहन केल्यानंतर त्यांना शिक्षण पूर्ण करता आले. या शिक्षणावर सुखाने वैवाहिक जीवन जगण्याएवढी बऱ्यापैकी नोकरी त्यांना सहज मिळाली असती. परंतु या ध्येयवादी तरुणाने समाज व देशासाठी त्याकडे पाठ फिरवली आणि पुन्हा आपल्या खडतर प्रवासाला सुरुवात केली. अपत्यनिधनाचे दु:ख, दम्यासारख्या विकाराने शरीराची होणारी झीज व सभोवतालच्या प्रतिगाम्यांनी केलेला मानसिक छळ या सर्वांना निर्भीडपणे झुगारून आगरकरांनी जोमदारपणे अत्यंत कसदार व प्रभावी असा लेखनप्रपंच केला. त्यांच्या लेखनाने अमूल्य अशी देशसेवा केली. आजही त्यांच्या वाङ्मयीन कार्याचा प्रभाव आणि मार्गदर्शकत्व टिकून आहे. त्यांच्या वाङ्मयीन कार्याचे मूल्यमापन आजच्या सामाजिक, राजकीय, प्रबोधनात्मक व पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना निश्चितच उपयुक्त ठरणारे आहे. यातील काही ठळक वैशिष्ट्यांचा वेध घेण्याचा आपण येथे अल्पसा प्रयत्न करणार आहोत.

१. 'केसरी' व 'सुधारक' यामध्ये लेखनरूपाने व्यक्त झालेले पत्रकार आगरकर हे प्रबोधनकार होते. बुरसटलेल्या विचारांच्या जंजाळातून समाजाला बाहेर काढावे, यासाठी सामाजिक सुधारणांचा विचार आपल्या इच्छेप्रमाणे व स्वतंत्रवृत्तीने समाजापुढे मांडण्यासाठी त्यांनी पत्रकारिता केली. संपादक म्हणून लेखन करताना त्यांनी कोणाचेही दडपण मान्य केले नाही, मिंधेपणा पत्करून त्यांनी कोणाच्याही भीडेखातर एक अक्षरही प्रसिद्ध केले नाही. कसल्याही प्रलोभनाला बळी न पडता त्यांनी आपली लेखणी लखलखीतपणे चालवली. तत्कालीन गतिशून्य व उद्योगशून्य समाजमनाला चालना देताना मूळ भारतीयत्व न सोडता पाश्चात्त्य नवीन शिक्षणाचा व त्याबरोबर येणाऱ्या नवीन कल्पनांचा त्यांच्या लेखनाने प्रसार केला. समाजाची उन्नती अगोदर की व्यक्तीची, असा विकल्प मांडणाऱ्यांना आजही आगरकरांचे लेखन समाज आणि व्यक्ती यांच्या हितसंबंधाचा व्यापक अर्थ समजावून देते. म्हणून ते एके ठिकाणी म्हणतात, "ज्यांच्या मनात समाजात राहून आपली उन्नती करून घ्यावी, अशी उत्कट इच्छा असेल त्याने अगोदर समाजाची उन्नती करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. समाजच खाली खाली जात असेल तर हाच वर कोठून येणार?" त्यांच्या समाजसुधारणेच्या ध्येयाला वाहिलेल्या वृत्तपत्रातील लेखनातून, "टाकातून अर्थबोधक अक्षरे काढण्याचे सामर्थ्य असेल व ती वाचण्यास निदान

एक इसम तयार असेल तोपर्यंत आपली लेखणी समाजसुधारणेचे कार्य करीत राहील" हा दुर्दम्य निर्धार दिसून येतो. आपला हेतू स्वच्छ असेल व आपण कर्तव्यभावनेतून लिहीत असू तर लोकानुनय करण्याची गरज पडत नाही. त्यामुळेच आगरकरांचे वाङ्मय, समाजमनाला गुळगुळीत सांगण्याच्या भानगडीत पडत नाही किंवा धर्मभावनेचा बाऊ करून ते आपले विचार लपवत नाहीत. टिळकांना राजकीय असंतोषाचे जनक व आगरकरांना समाजसुधारक म्हणण्याची आपली रीत आहे. यातून आगरकरांनी राजकीय सुधारणेकडे लक्ष दिले नाही असे ध्वनीत होते. परंतु आगरकरांचे लेखन स्पष्ट करते की, समाजसुधारणा, आचार सुधारणा, राजकीय सुधारणा हे काही वेगवेगळे प्रांत नाहीत. केवळ व्यवस्थेकरिता त्यांचे तसे वर्गीकरण केले आहे.

२. आपल्या देशाविषयीचा प्रखर अभिमान त्यांच्या वाङ्मयातून व्यक्त होतो. पर्वत, नद्या, सरोवरे, समुद्र, हवा-पाणी, फुले, पशू-पक्षी, शेती व शेतकरी, कला व कारागीर-कलाकार, भव्य उत्तुंग मंदिरे इत्यादी अनेक घटकांनी संपन्न झालेल्या आपल्या देशाचे विलोभनीय चित्र त्यांच्या लेखणीने रेखाटले आहे. केवळ नेत्रदीपक तेवढे दाखवणे आगरकरांच्या लेखणीला मान्य नव्हते. त्यामुळे रूढी-परंपरा, अंधश्रद्धा, पोथीनिष्ठा, धर्माच्या नावाखाली चाललेली लूट व सभ्यपणा, स्त्री-शूद्रांचा होणारा छळवाद व या सर्वांच्या विरोधात त्यांच्या लेखणीची झुंज आपल्याला ठळकपणे दिसते. हिंदुस्थानातील दारिद्र्याचे आगरकरांना अत्यंत दुःख वाटत असे. या देशाची प्रगती व्हावी, विकास व्हावा याबद्दलची अंतःकरणाला भिडणारी तळमळ त्यांच्या वाङ्मयातून दिसून येते. भारताचे दारिद्र्य नष्ट व्हावे, स्वातंत्र्य मिळावे, या देशाचा व्यापार या देशातील लोकांच्याच हातात यावा, अशी आगरकरांची इच्छा होती. जन्माधिष्ठित जातिव्यवस्था व धर्मसंस्था यामुळे व्यक्तिविकास कसा खुंटला आहे, याचे सडेतोड वर्णन आगरकर करतात. यात जोपर्यंत बदल होत नाही, तोपर्यंत समाजाला सुख लाभणार नाही, हे ते निक्षून सांगतात. परिवर्तनाची आवश्यकता एकदा मनाला पटल्यावर मग निष्कारण मृदू शब्द वापरून आगरकर आत्मवंचना करीत नाहीत.

३. आगरकरांच्या वाङ्मयात व विचारात बुद्धिप्रामाण्य, व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक समता, ऐहिक जीवनसमृद्धी आणि विज्ञाननिष्ठा या प्रमुख मूल्यांचा समावेश होतो. या सर्वांतून एक व्यापक मानवतावादी दृष्टी

त्यांच्या विचारांतून व्यक्त होते. त्यांचा मानवतावाद दयाबुद्धीवर अथवा धर्मवादावर आधारलेला नव्हता, तर त्याला समतेची आणि विज्ञाननिष्ठेची भक्कम बैठक होती. स्पेन्सर, मिल यांसारख्या तत्त्ववेत्त्यांचा, गिबनसारख्या इतिहासकाराचा, फ्रेंच राज्यक्रांतीचा, रुसो, व्हॉलतेर, दिदेरो, मोर्ले इत्यादी लेखकांचा आगरकरांवर प्रभाव होता. आगरकरांच्या लेखनातून आपणाला ठळकपणे बुद्धिप्रामाण्य दिसून येते. न्याय-अन्याय, सत्य-असत्य, योग्य-अयोग्य हे ठरवण्याचा निकष आगरकरांचे वाङ्मय आपणाला सांगते. आपली स्वत:ची बुद्धी हीच नीतिमूल्यांचे निकष ठरवण्यासाठी सर्वश्रेष्ठ मार्गदर्शक असते, असे आगरकरांचे सांगणे होते. या संदर्भात ते म्हणतात, "पूर्वेतिहास आणि पूर्वाचार हे पुन्हा पुन्हा पुढे आणून त्यांचे फिरून अवलंबन करा, असे सांगत न बसता अलीकडील न्यायाच्या भात्यातून तीव्र बाण काढून त्यावर संपात केला पाहिजे. कोणतेही आचार घालण्यास पूर्वीच्या ऋषीस जितका अधिकार आहे, तितकाच आम्हांसही आहे." आगरकरांच्या वाङ्मयातून पुन्हा पुन्हा हे स्पष्ट होते की, आचाराची इष्टानिष्टता ठरवण्यासाठी बुद्धी हेच एकमेव प्रमाण आहे. आज बुद्धीला अगम्य वाटणाऱ्या घटना बुद्धीच्या प्रयोगशील वृत्तीनेच हळूहळू उलगडू शकतील, असा त्यांचा विश्वास होता.

४. आगरकरांचे वाङ्मयीन लेखन जसे बुद्धिप्रामाण्यवादाचा पुरस्कार करते तसेच ते विज्ञाननिष्ठ भौतिकवादी विचारांची बांधिलकी मानते. निसर्गाचे चमत्कार पाहून त्याला शरण जाण्याचा विचार त्यांनी अमान्य केला. कारण ज्याला आपण चमत्कार मानतो, तो निरीक्षणाने, अनुभवाने, प्रयोगाने मानवी बुद्धीस आकलन होऊ शकतो. अशी विज्ञानदृष्टी त्यांच्या अनेक लेखांमधून व्यक्त झाली आहे. विज्ञाननिष्ठा भौतिकाला दूर सारून अध्यात्म्याची कधीही वकिली करीत नसते. आगरकरांनी ऐहिकसुखवादाची कल्पना स्पष्ट करताना सांगितले, सुखवादासाठी भोवतालच्या निसर्गशक्तीचा आणि मानवी प्रयत्नांचा मेळ घातला पाहिजे. मनुष्याचे ऐहिक सुखसंवर्धन होणे हे प्रमुख कार्य आहे. सुखाच्या वाढीमुळे व्यक्तीला महत्त्व येते आणि ती व्यक्ती आपल्यापरीने भोवतालच्या परिस्थितीवर मात करून इहलोकीच्या सुखाची वाढ करते. ऐहिक सुखवर्धन म्हणजे केवळ ख्यालीखुशालीची चैन नव्हे, त्याबरोबरच ऐहिक सुखसंवर्धन म्हणजे प्रयत्नवादाचा पुरस्कार आणि परलोकवादाचा धिक्कार आगरकरांच्या लेखांत दिसून येतो.

५. विषयांची विविधता हा आगरकरांच्या वाङ्मयाचा नजरेत भरणारा विशेष आहे. आगरकरांच्या सामाजिकक्षेत्राविषयीच्या लेखनात प्रबोधनाचे महत्त्व, लोकशिक्षणाचा पुरस्कार, निर्भीड सत्यकथन, आधी राजकीय की सामाजिक, कालबाह्य रूढींवर टीका, समाजहित, कुटुंबात स्त्रीचे स्थान, स्त्री-शिक्षणाला अग्रक्रम, बालविवाहाला विरोध, पुनर्विवाहाचा पुरस्कार, एकत्र शिक्षण, लोकसंख्येला आळा, ब्राह्मण्य, जातिभेदावर टीका, विषमतेविरुद्ध बंड, वर्णव्यवस्थेला नकार इत्यादी अनेकविध विषयांचा समावेश होतो. तर राजकीय विषयांत स्वातंत्र्य, राष्ट्रसभेचे कार्य आणि महत्त्व, शासनसंस्था, इंग्रज नोकरशाही, हिंदू-मुसलमानांचा प्रश्न इत्यादी मुद्दे येतात. आगरकरांचा आर्थिक विचार दारिद्र्य, आधुनिक यंत्रयुग, महाराष्ट्राचा व्यापार, शेती व शेतकरी यांची चर्चा करतो.

६. आगरकरांच्या वाङ्मयीन शैलीबद्दलही विचार करावा लागतो, एवढी ती प्रभावी आहे. त्यांची भाषाशैली अत्यंत ओजस्वी आहे. विचार सुसंगत आणि मार्मिक आहेत. आपला मुद्दा पटवून देण्यासाठी त्यांनी व्यवहारातील सर्वसामान्यांना परिचित असणाऱ्या उदाहरणांचा उपयोग केला आहे. नदीच्या प्रवाहाचे निरीक्षण करताना आपल्या लक्षात येते की डोंगर-दऱ्यांतून हा प्रवाह वेगवान असतो, तर सपाट मैदानी प्रदेशात तो संथ असतो. आगरकरांच्या भाषेचा ओघ असाच आहे. आगरकरांकडे केवळ एक वृत्तपत्रकार म्हणून पाहणे न्याय्य ठरणार नाही. ते एक प्रभावी पत्रकार तर होतेच, परंतु तेवढेच विचारवंत, प्रतिभाशाली लेखकही होते. त्यामुळेच त्यांच्या लेखनात अगदी सहजगत्या संदर्भ दिलेले दिसतात. सुटसुटीत अशी शब्दरचना आणि त्यामुळे वाक्यास प्राप्त झालेला ओघ आपणास पाहावयास मिळतो. त्यांच्या कोणत्याही वाक्यात त्यांच्या शैलीचे वेगळेपण जाणवते. कारण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यात पडलेले दिसते. प्रसिद्ध साहित्यिक वि. स. खांडेकर आपल्या 'आगरकर : व्यक्ती आणि विचार' या ग्रंथात म्हणतात, "आगरकरांच्या लेखनाचा जो चिरकालीन परिणाम झाला तो मराठी निबंधावर नाही, तर काव्य, विनोद व कथा या ललित वाङ्मयाच्या तीन प्रमुख प्रकारांवर... केशवसुत हे आधुनिक मराठी कवितेचे जनक गणले जातात. त्यांच्या अनेक तेजस्वी कवनांना आगरकरांच्या लिखाणापासूनच स्फूर्ती मिळाली. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे मराठी विनोदाचे निर्माते. त्यांच्या बुद्धीचे

पोषण आगरकरांनी केले नसले तरी तिच्या विकासाला वळण लावण्याचे श्रेय आगरकरांनाच द्यावे लागेल. या दृष्टीने 'सुदाम्याच्या पोह्या'तला 'शिमगा' हा विनोदी लेख आगरकरांच्या 'पांचजन्याचा हंगाम' या निबंधाशी ताडून पाहण्यासारखा आहे. आगरकरांनी 'सुधारक' काढला तेव्हा महात्म्याला शोभण्यासारखे 'कृत्य' असा त्यांचा हरिभाऊ आपट्यांनी जो गौरव केला त्याचा उगम नुसत्या कौतुकयुक्त आदरात नव्हता. हरिभाऊंचे कादंबरीलेखन 'सुधारक' सुरू होण्यापूर्वी झालेले असले तरी ज्या विशाल व भावपूर्ण दृष्टीने त्यांनी पुढे आयुष्यभर सामाजिक कथालेखन केले, तिचा सुंदर आविष्कार प्रथमत: 'पण लक्षात कोण घेतो' या कादंबरीतच झाला. 'सुधारक' १८८८त निघाला आणि हरिभाऊंनी या कादंबरीचे लेखन १८८९त सुरू केले. पुढे दोन पिढ्या मराठी ललित वाङ्मयातल्या सर्व प्रतिभावान लेखकांनी सामाजिक सुधारणेचा कैवार घेतला ही काही योगायोगाची गोष्ट नाही. आगरकरांच्या भावनायुक्त निबंधांचे संस्कारच या परिवर्तनाच्या मुळाशी होते.''

७. आगरकरांच्या वाङ्मयाचा पुढील पिढ्यांवर जो संस्कार, परिणाम झाला, तो स्पष्ट करताना थोर विचारवंत श्री. ग. प्र. प्रधान लिहितात, ''आगरकरांनी जे विचार निबंधांतून मांडले त्याचेच वेगळे स्वरूप हरिभाऊ आपट्यांच्या सामाजिक कादंबऱ्यांत आपणास पाहावयास मिळते. महर्षी अण्णासाहेब कर्व्यांसारख्या समाजसुधारकाला आगरकरांच्या लेखनांतून प्रेरणा मिळाली. नंतरच्या पिढीतील सर्व पुरोगामी लेखक व कार्यकर्ते आगरकरांना आपले स्फूर्तिस्थान मानतात. आगरकरांचे सर्व निबंध वाचल्यानंतर वाचकांच्या मनावर मुख्य ठसा उमटत असेल तर तो त्यांच्या संवेदनशील सात्त्विक अंत:करणाचा व प्रयोगनिष्ठ बुद्धिवादाचा. आधुनिक काळातील ज्ञानाचे स्वागत करताना शास्त्रीय दृष्टिकोण म्हणजे काय, हे आगरकरांनी बरोबर जाणले होते. विज्ञानाच्या प्रगतीमुळे जुन्या ग्रंथांचे प्रामाण्य नष्ट झाले आहे. जुनी समाजरचना कोलमडत आहे, हे त्यांनी स्पष्टपणे लोकांच्या नजरेस आणले. जीवनात नव्या निष्ठा निर्माण करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. व्यक्तिजीवनाला जखडून टाकणाऱ्या साखळ्यांवर घण घातले. उपेक्षितांचे अंतरंग उघडे करून समाजापुढे ठेवले. आत्मसंतुष्ट समाजाला अपराधित्वाची जाणीव करून दिली. विचारांचा दीप लावल्यावर कृती करण्याची आवश्यकता प्रतिपादन

केली. मराठी मनाची कवाडे उघडून नव्या विचारांचा प्रकाश आत आणला व जीवनाच्या उदात्त क्षितिजांचे दर्शन घडवून समाजाला त्या दिशेला पावले टाकावयास लावले.''

८. आगरकरांच्या चरित्राचे लेखक प्रा. आळतेकर त्यांच्या वाङ्‌मयीन थोरवीचे वर्णन पुढीलप्रमाणे करतात, ''महाराष्ट्रातील एक अत्यंत थोर पुरुष व मराठीतील एक उत्कृष्ट लेखक या दोन्ही नात्याने आगरकरांचे स्थान अढळ आहे. त्यांची लेखनरीती अंत:करणापासून उत्पन्न झाली आहे. त्यामुळे तीत वक्तृत्व हा जसा गुण आहे त्याचप्रमाणे कधी कधी अतिशय लांबलचक वाक्यरचना हा दोषही आढळतो. पण त्यांची भाषा ओजस्वी, तेजस्वी व निरनिराळ्या रसांना प्रसंगानुरूप अनुकूल अशी आहे. इंग्रजी कल्पनांना सुंदर मराठी अन्वर्थक शब्दांत व्यक्त करण्याची हातोटी त्यांना फार उत्कट साधली होती... आगरकरांचा विशेष हा की बहुजन समाजाला कळणाऱ्या भाषेत त्यांनी आपले लेख लिहिले व बहुजन समाजापासून ते केव्हाही पृथक झाले नाहीत. समाजात राहून समाजाची सुधारणा करणे, या तत्त्वावर त्यांचा अढळ विश्वास होता व आपले म्हणणे खरे व कल्याणकारक असल्यास आज ना उद्या समाज आपले ऐकेल, असा त्यांना भरवसा होता. त्यांची लेखनपद्धती विशेष आकर्षक होती. तिच्यातील टवटवीतपणा अद्यापही कायम आहे. मराठी वर्तमानपत्रांना उदयकाल येण्यास ज्यांचे श्रम कारणीभूत झाले त्यात आगरकरांची प्रामुख्याने गणना करावी लागेल.''

९. मराठी वृत्तपत्रसृष्टीतही आगरकरांचे स्थान कसे महत्त्वाचे आहे, हे स्पष्ट करताना प्रा. ग. प्र. प्रधान म्हणतात, ''मराठीत गंभीर विषयावरील निबंध लिहून त्यांनी एक नवा वाङ्‌मयप्रकार रूढ करण्यास मदत केली. विचारांची तर्कशुद्ध मांडणी, सुबोधता व जीवनातील महत्त्वाच्या प्रश्नांची उद्‌बोधक पण सामान्य वाचकांस समजेल अशी चर्चा, हे आगरकरांच्या निबंधांचे विशेष आहेत. वृत्तपत्रांचे संपादक म्हणून लोकशिक्षणाचे जे ध्येय आगरकरांनी सतत डोळ्यांसमोर ठेवले, त्यामधूनच या वाङ्‌मयप्रकाराचा त्यांनी आश्रय केला. वृत्तपत्राच्या अग्रलेखात सत्यप्रियता, भारदस्तपणा, मार्मिक विचार, मनोरंजक विवेचनपद्धती व सडेतोड मतप्रतिपादन यांचा एक आदर्श निर्माण करून आगरकरांनी मराठी वृत्तपत्रसृष्टीत फार मोठी सेवा बजावली आहे.''

१०. आगरकरांच्या मृदू, संवेदनशील मनोवृत्तीचा प्रभाव त्यांच्या वाङ्मयात स्पष्टपणे प्रतिबिंबित झाला आहे. त्यांचे मन मृदू, संवेदनाक्षम व भावनाशील होते. अन्यायाची तीव्रता अंत:करणाला जाणवली की त्यांच्या विचारांना गती मिळे. विचार करताना मात्र ते भावनेच्या आहारी कधीही जात नसत. बुद्धिवादाच्या आधाराने त्यांचा विचार निश्चित झाला की, तो मांडताना त्याला भावबळाची जोड मिळे व त्यामुळे त्यांचे वैचारिक लिखाण रुक्ष न होता वाचकांच्या अंत:करणाला स्पर्श करी. त्यांच्या शैलीतून हा त्यांचा स्वभाव पुरेपूर व्यक्त झालेला आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या भाषेप्रमाणे आगरकरांची भाषा डौलदार नव्हती व टिळकांच्या शैलीचा रेखीवपणा व भारदस्तपणा त्यांच्या भाषेत नव्हता. काहीशी विस्कळीत, मधून मधून लालित्याची छटा असलेली, विचार व्यक्त करताना अर्थगंभीर व दोषाविष्कारण करताना आवेशयुक्त, उपरोधिक व सामर्थ्यवान असे काहीसे संमिश्र स्वरूप त्यांच्या भाषेचे होते. हे सर्व असूनही त्यांच्या वृत्तीत जो अभिजात खेळाडूपणा होता त्यामुळे त्यांचे वार तीव्र असले तरी अधर्मयुद्धाचे नसत. एवढेच नव्हे तर गंभीर स्वरूपाचे लेखन करीत असतानाही समाजातील विसंगतीची एकीकडे अत्यंत रागाने हजेरी घेताना दिसत तर त्याच वेळी त्या विसंगती पाहून हसू येण्याइतका खेळकरपणा त्यांची लेखणी लीलया व्यक्त करताना दिसते. आगरकरांनी एका लेखात कालिदासापेक्षा भवभूती आपणास अधिक आवडतो असे म्हटले आहे. त्यांची ही आवड पटण्यासारखी आहे. कारण भवभूतीच्या साहित्यात जीवनातील कारुण्याची प्रचिती तीव्रतेने जाणवते व दुसरे म्हणजे भवभूतीच्या साहित्यात कालिदासाच्या तुलनेने अभिजातपणा कमी असला तरी त्याच्या प्रतिभेची भरारी मात्र अत्यंत उत्तुंग असे. आगरकरांच्या शैलीतही मधून मधून अशी कल्पनेची उत्तुंग भरारी दिसते.

# गोपाळ गणेश आगरकर यांचा जीवनपट

| | |
|---|---|
| १४ जुलै १८५६ | आगरकरांचा जन्म |
| १८६८ | कऱ्हाड येथे इंग्रजी तीन इयत्ता पूर्ण केल्या |
| १८६९ | कऱ्हाड येथे मुन्सिफाच्या कचेरीत उमेदवारी |
| १८६९ | शिक्षणासाठी रत्नागिरी येथे दाखल |
| १८७१ | रत्नागिरी येथे पाचव्या इयत्तेपर्यंत शिक्षण पूर्ण केले. |
| १८७२ | कऱ्हाडला परत व कम्पाउंडरची नोकरी |
| जून १८७२ | शिक्षणासाठी अकोल्याला दाखल |
| १८७५ | प्रवेश परीक्षेत उत्तीर्ण |
| १८७६ | पुणे येथे डेक्कन कॉलेजात प्रवेश, पुणे वक्तृत्वोत्तेजक सभेचे बक्षीस, डेक्कन कॉलजचे बक्षीस, 'वऱ्हाड समाचार' साप्ताहिकात लेखन |
| १८७७ | अंबूताई फडके (उंब्रज) यांच्याबरोबर विवाह |
| १८७८ | बी.ए. परीक्षा उत्तीर्ण. डेक्कन कॉलेजात फेलो |
| १८७९ | डेक्कन कॉलेजात एम.ए. चा अभ्यास, टिळकांशी मैत्री |

| | |
|---|---|
| जानेवारी १८८० | न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना, पुणे |
| १८८१ | एम. ए. उत्तीर्ण, न्यू इंग्लिशमध्ये शिक्षक |
| २ जानेवारी १८८१ | 'मराठा' इंग्रजी साप्ताहिकाचा आरंभ संपादक : टिळक |
| ४ जानेवारी १८८१ | 'केसरी' साप्ताहिकाची सुरुवात संपादक : आगरकर |
| १७ मार्च १८८२ | विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे निधन |
| १८८२ | कोल्हापूर प्रकरणात टिळक-आगरकरांना शिक्षा |
| १८८२ | २६ ऑक्टोबरपर्यंत डोंगरीच्या तुरुंगात |
| १ जानेवारी १८८४ | फर्ग्युसन कॉलेजची स्थापना |
| १८८४ | डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना |
| १८८५ | राष्ट्रीय सभेत प्रतिनिधी म्हणून उपस्थित |
| २५ ऑक्टोबर १८८७ | 'केसरी'चे संपादकत्व सोडले |
| १८८८ | 'सुधारक' साप्ताहिक सुरू केले |
| १८९२ | फर्ग्युसनच्या प्राचार्यपदी नेमणूक |
| १५ फेब्रुवारी ते १५ मार्च १८९५ | प्रकृतिस्वास्थ्यासाठी हवापालट—अकोला |
| १७ जून १८९५ | गोपाळ गणेश आगरकरांचे निधन |

*(राष्ट्रीय चरित्रमाला : गोपाळ गणेश आगरकर, स. मा. गर्गे या ग्रंथामधून)*

# संदर्भ ग्रंथ


१. आगरकर वाङ्मय, खंड १, संपादक : म. गं. नातू

२. आगरकर वाङ्मय, खंड २, दि. य. देशपांडे

३. आगरकर वाङ्मय, खंड ३, प्रकाशक : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

४. आगरकर लेखसंग्रह, संपादक : ग. प्र. प्रधान, साहित्य अकादेमी

५. गोपाळ गणेश आगरकर, स. मा. गर्गे, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

६. आगरकर दर्शन, मॉडर्न बुक डेपो, पुणे

७. संपूर्ण आगरकर, निबंध संग्रह भाग १, प्रा. मा. दो. अळतेकर, आगरकर प्रकाशन मंडळ, पुणे

८. शोध : बाळ गोपाळांचा, प्रा. य. दि. फडके

९. आगरकर : विचार व कार्य, श्री. वि. स. खांडेकर

१०. प्रि. गोपाळ गणेश आगरकर, संपादक : राष्ट्रीय चरित्रमाला

११. सुधारकाग्रणी गोपाळ गणेश आगरकर, प्रसाद कुलकर्णी, प्रबोधन प्रकाशमाला, वर्ष सहावे



124282
31-3-08

## आपला वैचारिक वारसा पुढे नेणारी प्रकाशने

✧ **जोतिबा फुले आणि स्त्री-मुक्तीचा विचार**
डॉ. गेल ऑम्व्हेट / २० रु. (चौथी आवृत्ती)

✧ **महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य** / प्रा. तानाजी ठोंबरे / २० रु. (चौथी आवृत्ती)

✧ **महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ**
डॉ. अशोक चौसाळकर / २० रु. (तिसरी आवृत्ती)

✧ **जोतिरावांची समता-संकल्पना** / भास्कर लक्ष्मण भोळे / २० रु. (तिसरी आवृत्ती)

✧ **महात्मा फुले आणि सांस्कृतिक संघर्ष** / भारत पाटणकर / २० रु. (चौथी आवृत्ती)

✧ **महात्मा फुले आणि धर्म** / प्रा. आ. ह. साळुंखे / २० रु. (पाचवी आवृत्ती)

✧ **म. विठ्ठल रामजी शिंदे यांचे आर्थिक आणि सांस्कृतिक विचार**
पी. डी. दिघे / ३० रु. (दुसरी आवृत्ती)

✧ **म. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या राजकीय व सामाजिक चळवळी**
तानाजी ठोंबरे / ३० रु.

✧ **म. विठ्ठल रामजी शिंदे यांचे बहुजनवादी राजकारण** / भा. ल. भोळे / ५० रु.

✧ **म. विठ्ठल रामजी शिंदे यांचे धर्मविषयक विचार** / अशोक चौसाळकर / ३० रु.
(महाराष्ट्र शासनाचा २००२-२००३ सालचा उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार)

✧ **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार**
प्रा. म. द. देशपांडे / ३० रु. (चौथी आवृत्ती)

✧ **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय चळवळी**
कृष्णा मेणसे / ३० रु. (चौथी आवृत्ती)

Library IIAS, Shimla
MR 891.46 T 368 A

✧ **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निवडक भाषणे (भाग पहिला)**
संपादन : विजय सुरवाडे / २[illegible]

## 'आगरकर विचारमाले'तील प्रकाशने

00124282

✧ **आगरकरांचे धर्मचिंतन** / भास्कर लक्ष्मण भोळे

✧ **आगरकरांचे राजकीय विचार** / डॉ. अशोक चौसाळकर

✧ **आगरकरांचे सांस्कृतिक आणि साहित्यविषयक विचार** / प्रा. तानाजी ठोंबरे

✧ **आगरकरांचे स्त्रीविषयक विचार** / माया पंडित (आगामी)

✧ **आगरकरांचा समाजविचार** / किशोर बेडकीहाळ (आगामी)